

DOWN AND OUT IN PARIS AND LONDON
GEORGE ORWELL
भाग १
पॅरिस
वृषाली जोशी

# पॅरीस

## मूळ लेखक – जॉर्ज ऑर्वेल

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# पॅरीस


लेखक : जॉर्ज ऑर्वेल

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237


प्रकाशन : १४ जानेवारी २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जॉर्ज ऑर्वेल



हा ब्रिटीश लेखक असून त्याचे मूळचे नाव इरीक आर्थर ब्लेअर असे होते. पण तो जॉर्ज ऑर्वेल या टोपण नावानेच प्रसिद्ध आहे. तो इंग्लिश कादंबरीकार निबंधकार, पत्रकार व टीकाकार होता. त्याने त्याचे विचार स्पष्टपणे गद्यात लिहिले आहेत. तो निरंकुश राजवटीच्या वा एकतर्फी वर्चस्वाच्या विरुद्ध होता व लोकशाही समाजवादाच्या बाजूने होता. तो २५ जून १९०३ रोजी जन्मला व २१ जानेवारी १९५० साली लंडन येथे वारला. ॲनिमल फार्म ही व्यंगात्मक प्रहसन असलेली त्याची कादंबरी प्रसिद्ध आहे.

# लंडन आणि पॅरीस

Down And Out In London And Paris

By George Orwell

बेघर, बेकार व पैशांशिवाय लंडन व पॅरीसमध्ये

ओहो, नुकसानकारक त्रास, गरीब अवस्था, कविवर्य

# पॅरीस



# I

गोल्डन रुस्टर रस्ता, पॅरीस, सकाळचे सात, रस्त्यावरून भयानक गुदमरलेल्या किंकाळ्यांची मालिका.

खाणीसमोर असलेल्या लहानशा हॉटेलची मालकीण, मॉन्स बाईसाहेब तिसऱ्या मजल्यावर रहाणाऱ्या माणसाशी बोलण्यासाठी, बाहेर फूटपाथवर आली आहे. तिच्या पायात शेतकऱ्याचे पारंपारिक बूट आहेत. तिचे करडे केस खाली लोंबत आहेत.

मॉन्स बाईसाहेबः सॅलोप, सॅलोप, मी तुला किती वेळा सांगितले आहे, की भिंतीला चिकटवलेल्या कागदावर ढेकूण चिरडत जाऊ नकोस म्हणून? इतरांप्रमाणे, तू ते खिडकीतून बाहेर का टाकत नाहीस? मवाली कुठचा! काय रे सॅलोप, हे हॉटेल तू विकत घेतले आहेस, असे तुला वाटते आहे का?”

तिसऱ्या मजल्यावरील बाईः शिवराळ!

अर्ध्या रस्त्यापर्यंत दोन्ही बाजूला उघडलेल्या खिडक्यांमधून एकसाथ दिल्या जाणाऱ्या विविध स्वरातील आवाजाच्या एकत्र किंकाळ्या तिथे उसळल्या आहेत. दहा मिनिटांनी त्या अचानक बंद होतात. दोन सैनिकांमधील मारामारी बघण्यासाठी लोक किंचाळायचे थांबतात.

गोल्डन रुस्टर रस्ता, पॅरीसमधील वास्तवता ध्यानी यावी म्हणून, मी या दृष्याचे चित्र काढले आहे. तिथे फक्त भांडणेच होत नसत --- तर अजूनही बरेच काही होत असते. सकाळी तिथून जाताना असा एक तरी उद्रेक होत असतो. भांडणे, रस्त्यावरील फेरीवाल्यांचे खूप दुःख वा एकाकीपणा दाखवणारे रडके आवाज, रस्त्याच्या दगडावरील केशरी साले उडवत जाणाऱ्या मुलांचे ओरडणे आणि रात्रीचे मोठ्याने गाणे, उग्र दर्प येणाऱ्या कचरागाड्या, या सर्वांनी रस्त्यावरील वातावरण तयार होत होते.

तो खूप अरुंद रस्ता होता --- उंच, महारोगी घरांची दरी होती. ती घरे एकमेकांना छेद, देत कशीही आडवी तिडवी बांधलेली होती. जशी काही ती कोसळून पडतांना गोठून गेली होती. तिथे तुम्ही एका शिलिंगमध्ये झिंगण्याइतकी दारू पिऊ शकत होतात. शनिवारी रात्री एक तृतीयांश पुरुष मंडळी प्यायलेली असत. तिथे बायकांवरून भांडणे चालत. तिथे अती स्वस्त हॉटेलांमध्ये रहाणारे खुर्च्या फेकून व पिस्तुले उडवून, लांबलचक, चमत्कारिक प्रकारची भांडणे करत असत. ती सगळी हॉटेले पोलिश, अरब आणि इटालीयन्स लोकांनी भरलेली होती. ते खुर्च्यांने व कधीकधी पिस्तुलाने भांडत. रात्री दोघे पोलीस रस्त्यावर एकत्र येत. ती बऱ्यापैकी गोंधळाची जागा होती. तरीही तिथे गडबड गोंधळ व घाणीत नेहमीचे माननीय फ्रेन्च दुकानदार, बेकरीवाले आणि लॉन्ड्रीवाले त्यांच्यात्यांच्यातच रहात असत. ते शांतपणे त्यांचे नशीब थोडे तरी उघडायची वाट बघत रहात. ही पॅरीसचे प्रतिनिधित्व करणारी झोपडपट्टी होती.

माझ्या हॉटेलचे नाव डेस ट्रॉईस मोईनअॅक्स होते. ते अंधारी, पाच मजली, मोडकळीला आलेले, लाकडी तक्तपोशीने भाग पाडून सशाच्या बिळांसारख्या चाळीस खोल्या केलेले हॉटेल होते. खोल्या लहान, पाण्याचा थेंबही नसलेल्या, कोरड्या ठाक व फारच घाणेरड्या होत्या. तिथे कुणी स्वच्छता कामगार नव्हते. मालकीणबाई, पॅट्रोनीला झाडायला वेळ नसे. भिंती काडेपेटीइतक्या पातळ होत्या. त्यातील फटी बुजवण्यासाठी, एकावर एक गुलाबी कागद लावले जात. ते सैल होऊन त्यात अमाप ढेकूण वस्ती करत. छतावर ते सैनिकांच्या फौजेसारखे, चालतांना दिसत आणि रात्री भूक खवळलेल्या अवस्थेत खाली येऊन, ते माणसांना चावत. त्यामुळे दर काही तासांनी उठून, त्यांना जणू सैनिकांची कत्तल केल्यासारखे, त्यांना मारावे लागे. बेघर, बेकार व पैशांशिवाय लंडन व पॅरीस असे होते. जेव्हा ढेकणांचा त्रास

फारच वाढे, तेव्हा सल्फर जाळून, त्यांना शेजारील खोलीत पळवले जाई. तेव्हा तेथील मनुष्य सल्फरच्या वासाने हैराण होई व ढेकणांना परत पिटाळून लावे. ती घाणेरडी, पण बाईसाहेबांसाठी व त्यांच्या नवऱ्यासाठी ती घरच्यासारखी जागा होती. खोल्यांचे भाडे आठवड्याला तीस ते पन्नास फ्रँक्स होते.

तिथे रहाणाऱ्या लोकांची गर्दी असे. त्यातील बहुतेक सामानाशिवाय आलेले परदेशी असत. ते आठवडाभर रहात व निघून जात. ते चांभार, गवंडी, पाथरवट, नौसैनिक, विद्यार्थि, वेश्या व चिंध्या गोळा करणारे असत. त्यातील काहीजण फारच गरीब असत. त्यापैकी एकजण बल्गेरियन विद्यार्थि होता. तो अमेरिकन बाजारासाठी फॅशनेबल बूट तयार करत असे. सहा ते बारापर्यंत तो त्याच्या अंथरुणावर बसून, बुटांच्या बारा जोड्या तयार करत असे व पस्तीस फ्रँक्स मिळवत असे. उरलेला दिवस तो सॉर्बोन येथे व्याख्यानांना हजेरी लावे. तो चर्चसाठी अभ्यास करे व देवधर्माची पुस्तके त्याच्या चामडे पसरलेल्या जमिनीवर उपडी पडलेली असत. दुसऱ्या खोलीत एक बाई व तिचा स्वतःला चित्रकार म्हणवणारा मुलगा रहात असत. ती बाई दिवसातील सोळा तास फाटके मोजे शिवायचे काम करे. त्याबद्दल तिला चार मोज्यांना एक फ्रँक मिळे. तर तिचा नीटनेटक्या कपड्यातील मुलगा सीन नदीच्या डाव्या तीरावरील पॅरीसच्या हॉटेलांमध्ये फिरत वेळ काढे. एक खोली दोन वेगवेगळ्या माणसांना दिली गेली होती. एक तिथे रात्री काम करे तर एक दिवसा. दुसऱ्या एका खोलीत एक विधवा, तिच्या दोन्ही फुफ्फुसांचा क्षयरोग झालेल्या मोठ्या मुलींबरोबर रहात असे. तिथे विचित्र लोक होते. पॅरीसच्या झोपडपट्ट्या म्हणजे विचित्र लोकांची रहायची जागा होती --- जे आयुष्याच्या एकाकी, अर्धवट वेड्या अवस्थेत रहात असत. त्यांनी सर्वसामान्य व चांगले आयुष्य जगायची आशा सोडून दिलेली असे. लोकांना काम व पैसे मिळत

नसत, तसेच ते वागणुकीच्या सर्वसामान्य पद्धतीपासूनदेखील लांब असत. या हॉटेलमधील काही लोकांचे आयुष्य काही बोलायच्या पलीकडे विचित्र असे. ते फसवे असत. उदाहरणार्थ, एक म्हातारी, बुटकी, चिंध्या पांघरलेली जोडी होती. ते सेंट मायकेल रस्त्यावर पोस्टकार्ड विकत असत. विचित्र म्हणजे ते पोस्टकार्डे सीलबंद पाकिटातून विकत व त्यात फ्रान्समधील सर्वात लांब नदी लोरेमधील मोठ्या फ्रेंच घरातील वा राजवाड्यातील लैंगिक दृष्ये असत. ती विकत घेणाऱ्या लोकांना बऱ्याच उशीरापर्यंत ते समजतच नसे. त्यांनी अर्थात कधी काही तक्रार केली नाही. ते जोडपे आठवड्याला शंभर फ्रान्स मिळवत असत. कडक अर्थव्यवस्थेमुळे ते अर्धे उपाशी व अर्धे प्यायलेले असत. त्यांच्या खोलीतील उबग येणारी घाण इतकी होती, की तिचा वास खालील मजल्यावरही येत असे. बाईसाहेबांच्या मते त्या जोडप्याने त्यांचे कपडे गेल्या चार वर्षात बदलले नव्हते.

तिथे रहाणारा हेन्री जमिनीखालील गटारांमध्ये काम करे. तो उंच, कुरळ्या केसांचा व उगीचच उदास असणारा परंतु त्याच्या लांब बुटात, अद्भुतरम्य दिसणारा माणूस होता. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो दिवसचे दिवस, कामाचे सोडून, काही बोलत नसे. फक्त एका वर्षापूर्वी तो चांगल्या ठिकाणी गाडीचालकाच्या नोकरीत होता. त्याच्याकडे पैसे साठले होते. एक दिवस तो प्रेमात पडला. पण त्या मुलीने नकार दिला, तेव्हा त्याला राग येऊन त्याने त्या मुलीला लाथ मारली. त्यानंतर ती मुलगी हेन्रीच्या फारच प्रेमात पडली. पंधरा दिवस ते बरोबर राहिले. हेन्रीचे हजारो फ्रँक्स त्यांनी खर्च केले मग ती मुलगी अविश्वासू निघाली. हेन्रीने तिच्या दंडात चाकू खुपसला आणि मग तो सहा महिने तुरुंगात गेला. तिला भोसकल्यावर ती मुलगी हेन्रीच्या जास्तच प्रेमात पडली. त्या दोघांनी भांडण मिटवून, लंडन व पॅरीसमध्ये, गरिबीत रहायचे ठरवले. हेन्री तुरुंगातून बाहेर आला. आता तो टॅक्सी विकत घेणार होता व ते

लग्न करणार होते. पण पंधरा दिवसांनी मुलीने परत अविश्वासूपणा केला. जेव्हा हेन्री बाहेर आला, तेव्हा तिला दिवस गेलेले होते. हेन्रीने तिला परत भोसकले नाही. त्याने त्याची सगळी शिल्लक रक्कम काढली. त्याने इतकी दारू प्यायली की तो परत महिन्याभरासाठी तुरुंगात गेला. त्यांनंतर परत तो जमिनीखालील गटारांमध्ये काम करू लागला. त्याला काही बोलावेसे वाटत नसे. जर तुम्ही त्याला विचारले की तो असले काम का करतो, तर तो काही उत्तर देत नसे. फक्त त्याची मनगटे एकमेकांवर आणून, कफलीग्ज दाखवत असे व डोके दक्षिणेला तुरुंगाकडे हलवून दाखवत असे. त्याचे नशीब वाईट असावे. एका दिवसात ते त्याला अर्धवट बनवत असे. किंवा तिथे आर नावाचा इंग्लिश माणूस होता. तो वर्षातील सहा महिने त्याच्या पालकांबरोबर बेटावर रहात असे व सहा महिने फ्रान्समध्ये रहात असे. फ्रान्समध्ये असतांना तो दिवसाला चार लिटर वाईन पित असे. आणि शनिवारी सहा लिटर पित असे. त्याने एकदा पोर्तुगालच्या पश्चिमेस असलेल्या अटलांटिकमधील बेटांच्या समूहापर्यंत प्रवास केला, कारण तिकडे युरोपमधील कुठल्याही ठिकाणापेक्षा, वाईन स्वस्त मिळत असे. तो सभ्य, घरेलू माणूस होता. कधीच गडबड्या वा भांडखोर नव्हता. त्याला कधीच दारू चढलेली नसे. तो दुपारपर्यंत अंथरुणात झोपून राही. आणि तेव्हापासून मध्यरात्रीपर्यंत, तो ब्रिस्टोच्या कोपऱ्यात शांतपणे व पद्धतशीरपणे दारूत बुडालेला असे. तेव्हा तो शुद्ध बायकी आवाजात, जुन्या अनमोल फर्निचरबद्दल बडबड करे. तिथे मी सोडलो, तर फक्त आर हाच इंग्लिश माणूस होता.

तिथे अनेक अवलिया लोक रहात असत. काचेचा डोळा असलेला पण ते कबूल न करणारा रुमानियन मिस्टर ज्युल्स, दगडकामाचा महाकाय गवंडी फ्युरेक्स, मी तिथे येण्यापूर्वी मेलेला चिक्कू रुकोल व त्याच्या

खिशातील कागदाच्या चिटोऱ्यावरून फ्युरेक्सची सही करणारा चिंध्यांचा व्यापारी, लॉरेंट.

जर एखाद्याला वेळ असेल, तर त्यांच्यापैकी काहीजणांची जीवनचरित्रे लिहिणे मजेशीर ठरावे. मी आमच्या भागातील लोकांचे वर्णन करायचा प्रयत्न करतो. फक्त कुतूहल म्हणून नव्हे, तर ते गोष्टीचा भाग आहेत, म्हणून. मी गरिबीबद्दल लिहितो आहे. या झोपडपट्टीत माझा गरिबीशी प्रथम परिचय झाला. त्यातील घाण व विचित्र आयुष्यासकट झोपडपट्टी ही अवास्तविक कल्पनेचे गरिबीतील पहिले व्यावहारिक उदाहरण होते. आणि नंतर ती माझ्या स्वतःच्या अनुभवांची पूर्वपीठीका होती. त्यामुळे मी तेथील आयुष्य कसे असते, याची कल्पना देतो आहे.

## II

येथील आयुष्य. उदाहरणार्थ, आमचे ब्रिस्टो. डेस ट्रॉईस मोईनअॅक्स हॉटेलच्या पायथ्याशी, ती एक विटांची भिंत असलेली लहानशी खोली होती. ती अर्धी जमिनीखाली होती. तिथे दारूने भरलेली टेबले होती आणि हप्त्याने मरणाचा बेत [ लेखकः लुई फर्डीनंड सेलीन ] असे लिहिलेल्या मरणविधीचा, लाल उपरणे गुंडाळलेल्या आणि हातात कच्चे मास व सुरा धरलेल्या कामगाराचा आणि एका मनाने खंबीर दिसणाऱ्या गाईचे तोंड असलेल्या व दिवसभर 'तिच्या पोटासाठी' मलागाची गोड वाईन पिणाऱ्या छान देशी शेतकरी बाईचा फोटो होता.

जेवणापूर्वी भूक लागावी म्हणून घेतलेल्या उत्तेजक पेयासाठीचे खेळ, मॅडेलॉन या हिब्रू मुलीबद्दलची गाणी, रास्पबेरीपासून बनवलेल्या ब्रँडीबद्दलची

गाणी, ‘मी तुम्हाला प्रेमाचा खरा अर्थ सांगतो. खरी भावनाशीलता आणि उच्च प्रकारचा आनंद हा फक्त सुसंस्कृत लोकांनाच कळतो?’ अशी गाणी आणि असामान्यपणे लोकांसमोर केलेले प्रेमाचे चाळे! अर्धे हॉटेल संध्याकाळी ब्रिस्टोमध्ये भेटत असे. एखाद्याने लंडनमधील आनंदी गुत्ता तिथे शोधावा, असे मला वाटे.

ब्रिस्टोमध्ये विचित्र संभाषण कानावर पडे. उदाहरण म्हणून मी तुम्हाला स्थानिक उत्सुकता शमवणारे, चार्लीचे बोलणे सांगतो.

चार्ली हा घरून पळून आलेला, कुटुंबवत्सल व शिकलेला तरूण त्याला घरून मिळालेल्या पैशांवर काही वेळा इथे रहात असे. तो गुलाबी ताज्या गालांचा व मऊ चॉकलेटी केसांचा आणि जास्तच ओलसर, चेरीसारख्या लाल ओठांचा तरूण होता. त्याची पाऊले छोटीशी होती. दंड फारच आखूड होते. त्याचे हात लहान बाळासारखे खळगे असलेले होते. तो खूप आनंदी व स्थिर उभे रहाण्यासाठी फारच उत्साह उतू जाणारा होता. त्याला बोलतांना खेळकरपणे नाचायची त्याची सवय होती.

दुपारचे तीन वाजत आहेत आणि ब्रिस्टोमध्ये मालकीणबाईशिवाय कुणीही नाही. एक दोन माणसे काम संपवून आली आहेत. पण स्वतःबद्दल कुणाशीही बोलले, तरी चार्लीला सारखेच आहे. अडथळा म्हणून मध्ये घातलेल्या धातूच्या कठड्यावरून भाषण ठोकणाऱ्या पुढाऱ्यासारखी त्याच्या जिभेवरून शब्दांची वक्तृत्वकला वहात असते. आणि त्याचे छोटे हात हावभाव करत असतात. त्याचे डुकराच्या पिल्लासारखे लहानसे डोळे उत्साहाने चमकत असतात. तरीही तो फारच किळसवाणा दिसतो. तो त्याचा आवडता विषय, ‘प्रेम’ याबद्दल बोलत असतो.

आहा, प्रेम! प्रेम! ही सर्वात उदात्त भावना! ती नष्ट करू नका. ती

शमवा. पण ती मला मारते. अरेरे, सभ्य स्त्री पुरुषहो, स्त्रिया म्हणजे मला टोकाच्या विनाशाकडे नेणाऱ्या आहेत. बाविसाव्या वर्षी मी झिजून संपलो आहे. पण मी काय गोष्टी शिकलो, तर मी शहाणपणाच्या दरीचे मोजमाप केले नाही. मी खरे शहाणपण शिकलो. मी सुसंस्कृत, नम्र व मुद्दाम आक्रमक इत्यादी मनुष्य बनलो, ही सर्वात मोठी गोष्ट आहे.

सभ्य स्त्री पुरुषहो, 'मी समजतो की तुम्ही उदास झाला आहात. पण आयुष्य आनंदी व सुंदर आहे. तुम्ही उदास व्हायला नको. जास्त आनंदी रहा. मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो! सभ्य स्त्री पुरुष हो, आहा, आयुष्य सुंदर आहे. मला वाटते तुम्ही उदास आहात. पण आयुष्य सुंदर व छान आहे. सॅमोअन वाइनने पेला पूर्ण भरा. तुम्हाला आरामाची सवय आहे, नाही का?

ऐका, सर, आयुष्य सुंदर आहे.

माझ्या प्रचंड अनुभवामुळे, मी तुम्हाला प्रेमाबद्दल सांगेन. मी तुम्हाला प्रेमाचा खरा अर्थ सांगेन. खऱ्या सुसंस्कृत माणसासाठी जाणीवपूर्वकता व परमानंद काय असतो, हे मी तुम्हाला स्पष्ट करेन.

बेघर, बेकार व पैशांशिवाय लंडन व पॅरीसमध्ये एकटे असणे! मी तुम्हाला माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदी दिवसाबद्दल सांगेन. अरेरे, पण अशा आनंदाची जाणीव होतानाच, मी तो क्षण गमावला आहे. तो कायमचा निघून गेला आहे. आणि मला वाटते बहुधा त्याची इच्छाही गेली आहे.

'तर मग ऐका. ही दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझा भाऊ पॅरीसमध्ये होता --- तो वकील आहे --- आणि माझ्या पालकांनी त्याला सांगितले होते, मला शोधून जेवायला घेऊन जावे. माझा भाऊ आणि मी, आम्ही एकमेकांचा द्वेष करत असू. पण आम्ही आमच्या पालकांची अवज्ञा न करायचे ठरवले. आम्ही जेवलो. तेव्हा आम्ही तीन बाटल्या दारू पिऊन तर् झालो. मी माझ्या

भावाला खूप दारू प्यायला लावली. मी त्याला सांगितले, की त्याला दारू न चढण्यासाठी, हे गरजेचे होते. तो प्यायला आणि लगेच खाली पडला. मी त्याला उचलून अंथरुणावर ठेवले. मग मी त्याचे खिसे तपासले. मला अकरा हजार फ्रान्सीस मिळाले. ते घेऊन मी लगेच जिना उतरलो. एक टॅक्सी केली आणि पळून गेलो.

माझ्या भावाला माझा पत्ता माहिती नव्हता --- मी सुरक्षित होतो.

माणसाकडे पैसे असतील, तर तो कुठे जातो? अर्थात वेश्यांकडे. पण मी एखाद्या श्रमिक कामगारासारखा, अशा फालतू गोष्टीत वेळ घालवणार नव्हतो. अपेक्षाभंग करून, आश्चर्याचा धक्का देत, मी सुसंस्कृत व बारीकसारीक तपशीलाकडे लक्ष देणारा प्रयत्नवादी मनुष्य असल्याने, मध्यरात्रीपूर्वी मला जे पाहिजे होते, ते मी शोधून काढले. मी अठरा वर्षांच्या एका चटपटीत छान कपडे केलेल्या, सिगरेट ओढणाऱ्या व अमेरिकन पद्धतीने केस कापलेल्या तरूणाच्या संपर्कात आलो. आणि आम्ही शांत बिस्ट्रोमध्ये, रस्त्यावरील गर्दीपासून दूर जाऊन, बोलू लागलो. आम्ही एकमेकांना नीट समजून घेतले. आम्ही इकडच्या तिकडच्या, गप्पा मारल्या. चिडचिड करायला लावणाऱ्या स्वतःला बदलायच्या पद्धतींबद्दल आम्ही बोललो. आता आम्ही टॅक्सी करून लांब निघून गेलो. टॅक्सी एकाकी, अरुंद व एकच गॅसचा दिवा असलेल्या रस्त्याच्या शेवटावर थांबली. तिथे दगडामध्ये पावसाचे पाणी साचून गडद तळी तयार झाली होती. एका बाजूला खाली, कॉन्व्हेन्ट शाळेची काळी उंच भिंत उभी होती. माझ्या वाटाड्याने मला एका उंच, शटरच्या खिडक्या असलेल्या पडक्या घराकडे नेले व खूप वेळा दार वाजवले.

आता आतून पदरव व कडी काढल्याचा आवाज आला. दार थोडेसे उघडले. त्याच्या कडेने एक हात आला. तो एक मोठा, वाकडा हात होता. त्याने आमच्या नाकांवर त्याचा तळवा धरून, पैसे मागितले.

माझ्या वाटाड्याने दाराच्या फटीत पाय घातला व तो आत जाऊ लागला. तो म्हणाला, “तुला किती पैसे हवे आहेत?”

बाईच्या आवाजात उत्तर आले, “हजार फ्रान्सिस. ते ताबडतोब भरा. नाहीतर आत येऊ नका.”

मी त्या हातात हजार फ्रान्सिस ठेवले आणि माझ्या वाटाड्याच्या हातात शंभर. तो शुभ रात्र म्हणाला व आम्हाला आत सोडले. मला आत नोटा मोजण्याचा आवाज येत होता आणि नंतर काळ्या कपड्यातील प्रौढ कुमारिका बाईने बाहेर डोकावून पाहिले व मला आत घेण्यापूर्वी माझ्याकडे संशयाने बघितले.

आत फार काळोख होता. फक्त गॅसच्या झगमगत्या ज्योतीचा प्रकाशाने भिंतीचा काही भाग उजळला होता. इतर सर्वत्र काळी सावली पडली होती. तिथे उंदीर आणि धुळीचा वास येत होता.

न बोलता म्हातारीने मेणबत्ती पेटवली व कशीबशी चालत, माझ्यापुढे येऊन खाली एका दगडी भुयारासारख्या मार्गात शिरून दगडी पायऱ्या चढून वर गेली.

ती म्हणाली, “हे बघा, खाली उतरून तेथील तळघरात जा आणि तुम्हाला काय पाहिजे ते करा. मी काही पाहणार नाही, काही ऐकणार नाही, मला काही माहिती नाही. तुम्ही स्वतंत्र आहात. समजले का --- पूर्णपणे स्वतंत्र. अहो मिस्टर, तुम्हाला हे सांगणे जरुरीचे आहे का --- जोर लावणे ---

ती थरथर, अर्धीमुर्धी भीती आणि अर्धा आनंद, हे त्या क्षणी एकाला होत असते --- ते तुमचे तुम्हाला माहिती आहे.”

मला सापडेल तसा, मी खाली रांगत गेलो. मला माझा श्वास आणि दगडावर घासले गेलेल्या बुटांचा आवाज ऐकू येत होता. बाकी सर्व शांत होते. जिन्याच्या तळाशी माझ्या हाताला एक विजेचे बटण लागले. मी ते दाबले व तळघरभर बारा लाल दिव्यांचा लखलखाट झाला. आणि श्वास रोखून धरा. मी तळघरात नव्हतो तर एका झोपायच्या खोलीत होतो. ती एक श्रीमंत, मोठी व भपकेबाजपणे चकचकीत, वरपासून खालपर्यंत लाल रंगाची खोली होती. खुर्च्यांवर महागाईचे लाल रेशमी कापड होते. छत देखील लाल होते. जिकडेतिकडे लालच लाल होते. जसे काही रक्तातून प्रकाश पाझरत, डोळ्यात खुपत होता. एका टोकाला एक मोठा चौकोनी पलंग होता. त्यावरील जाड पांघरूणही लाल होते. त्यावर एक लाल मखमली झगा घातलेली मुलगी पहुडली होती. मला बघून ती लांब गेली व त्या अपऱ्या झग्यात तिचे गुडघे लपवायला बघू लागली.

मी तिला म्हणालो, “मी दाराशी थांबलो होतो. हे सुंदरी, इकडे ये.”

ती घाबरून बारीक आवाज काढू लागली. लडखडत मी पलंगापाशी पोचलो.

तिने मला टाळायचा प्रयत्न केला. पण मी तिचा गळा पकडला --- अशा तऱ्हेने, तुम्ही बघत आहात ना? घट्ट! तिने विरोध करायचा प्रयत्न केला. कुणी दया दाखवावी, म्हणून ती ओरडू लागली. पण मी तिला घट्ट धरले होते. तिचे डोके मी जोराने मागे वळवले. आणि तिच्या चेहऱ्याकडे रोखून बघू लागलो. ती कदाचित वीस वर्षांची होती. तिचा चेहरा रुंद होता. पण तो मूर्ख व मंदबुद्धी मुलीसारखा होता. त्यावर पावडर थापली होती आणि तिचे मूर्ख

निळे डोळे लाल प्रकाशात चमकत होते. त्यात धक्का बसल्याचे काही वेगळेच भाव सोडून कुठलेच वेगळे असे भाव मला दिसले नव्हते.

बायका! ती नक्कीच कुणा शेतकऱ्याची मुलगी होती. तिला तिच्या वडिलांनी गुलाम म्हणून विकले असावे.

अजून काही न बोलता, मी तिला पलंगावरून खाली खेचले व जमिनीवर ढकलले. मग मी तिच्यावर एखाद्या वाघासारखी झेप घेतली. ओहो, काय मजा आली! इतका छान वेळ गेला, की त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. श्रीयुत आणि श्रीमती, याचे मी तुम्हाला साग्रसंगीत स्पष्टीकरण देईन. असे बघा, ते कोवळे, खरे प्रेम होते. ज्यासाठी झुरावे, अशी ती जगातील एकमेव गोष्ट होती. सगळ्या कला व उद्दिष्टे, सगळे तत्वज्ञान व धार्मिक समजुतींचा संक्षिप्त अधिकार, तुमचे सगळे छान शब्द व उच्च दृष्टीकोन; हे सर्व राखेसारखे बेकार व फिके पडणारे ते होते. जेव्हा एखादा प्रेमाचा अनुभव घेतो --- खरेखुरे प्रेम --- तेव्हा जगात आनंदाशिवाय काय उरते?

अधिकाधिक रानटीपणे मी नव्याने तिच्यावर हल्ला करत गेलो. परतपरत ती मुलगी निसटायला बघत होती. ती पुन्हा कुणाला दया यावी म्हणून ओरडू लागली. मी हसू लागलो.

“दया! तुला काय वाटले, मी इथे दया दाखवायला आलो आहे? मी हजार फ्रँक काय त्यासाठी भरले आहेत? मी तुम्हाला शपथेवर सांगतो, सभ्य स्त्रीपुरुषहो, की जर ते आमचे स्वातंत्र्य हिरावणाऱ्या त्या शापित कायद्यासाठी नसते, तर मी त्याच क्षणी तिचा खून केला असता.

“आहा, ती कशी कडू, रागीट किंकाळ्या मारून, किंचाळत होती. पण त्या ऐकायला तिथे कुणीच नव्हते. तिथे पॅरीसच्या रस्त्यांवर आम्ही

पिरॅमिडच्या आत असल्यासारखे सुरक्षित होतो. त्या मुलीच्या गालावरून अश्रू वहात होते. त्यामुळे पावडर धुतली जात होती व तिचे कपडे गचाळ होत होते. पण, पुन्हा कधीच येणार नाही अशी ती वेळ होती.

सभ्य स्त्रीपुरुषहो, ज्यांना अशा अत्युच्च भावनिक प्रेमाची ओळख नाही, अशांसाठी हे समागमापलीकडील आहे आणि मी देखील, आता माझे तारुण्य सरले आहे ---

आहा, तारुण्य --- परत इतके सुंदर आयुष्य कधीच मिळणार नाही. ते संपले. ओहो, हो, ते गेले --- कायमचे गेले. आहा, गरिबी, काळाचे संकुचित्व, मानवी आनंदातील निराशा! कारण खऱ्या जगात --- आपली सामाजिक प्रतिमा. प्रेमाच्या अत्युच्च क्षणाचा कालावधी किती असतो? तर काहीच नसतो. एक क्षण, किंवा फार तर अजून एक. भावना उचंबळून येण्याचा एक क्षण आणि त्यानंतर धूळ, राख आणि रिकामेपण.

‘‘तर मी फक्त क्षणभर सुखाच्या अत्युच्च शिखरावर गेलो. माणसाला मिळू शकणाऱ्या सर्वात टोकाच्या व शुद्ध भावना. आणि त्याच क्षणी त्या संपल्या. मी उरलो --- काय म्हणून? माझ्यातील पशुत्व, वासना गुलाबाच्या पाकळयांसारख्या विखरून गेल्या. गर्विष्ठपणे खंत वाटणारा, थंड आणि दमणूक झालेला मी उरलो. अचानक माझ्यात बदल होऊन, मला फरशीवर शोक करणाऱ्या त्या मुलीची कीव आली. अशा खालच्या दर्जाच्या भावनांचा मी बळी ठरावे, हे मळमळ वाटून ओकारी येण्यासारखेच झाले, नाही का?

मी परत त्या मुलीकडे पाहिले नाही. माझा आत्मा तेथून निसटू पहात होता. मी घाईने पायऱ्यांपर्यंत गेलो व रस्त्यावर आलो. सर्वत्र खूप गार होते व अंधार होता. रस्ते रिकामे होते. माझ्या टाचांखाली दगडांचा पोकळ एकाकी आवाज येत होता.

माझ्याकडचे सगळे पैसे संपले. मला टॅक्सी करायलाही पैसे उरले नाहीत. मी परत माझ्या गार, एकाकी खोलीत आलो.''

## III

''पण तिथे, सभ्य स्त्रीपुरुषहो, तेच मला तुम्हाला स्पष्ट करायचे होते. हे प्रेम आहे. तो माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस होता.''

चार्ली हा चमत्कारिक नग होता. तिथे कसे विचित्र लोक रहात असत, हे सांगण्यासाठी मी चार्लीचे पात्र तुमच्यासमोर उभे केले.

मी गोल्डन रुस्टर रस्त्यावरील लॉजमध्ये सुमारे दीड वर्ष राहिलो.

उन्हाळ्यातील एक दिवस, माझ्याकडे फक्त चारशे पन्नास फ्रँक्स उरले होते. आणि मी इंग्लिश शिकवून मला आठवड्याला मिळणारे, छत्तीस फ्रँक्स. या वेळेपर्यंत, मी भविष्याचा कधी विचार केला नव्हता. पण आता मला जाणीव झाली, की मला ताबडतोब काही केले पाहिजे. मी नोकरी शोधायचे ठरवले. आणि नशीबाने असे झाले, की मी खोलीचे पुढील महिन्याचे भाडे, दोनशे फ्रँक्स आधी भरायची काळजी घेतलेली होती. इंग्लिश शिकवण्याशिवाय, माझ्याकडील अजून अडीचशे फ्रँक्समुळे मी अजून महिनाभर राहू शकलो असतो. महिन्याभरात मला नोकरी मिळाली असती. मी एका प्रवासी कंपनीचा गाईड म्हणून किंवा भाषांतरकार म्हणून, काम करायचा विचार करू लागलो. पण माझे दुर्दैव आडवे आले.

एक दिवस हॉटेलमध्ये एक तरूण इटालियन आला. तो छापखान्यातील खिळे जुळवणारा होता. तो अर्थ लावण्यात थोडा गोंधळलेला होता. त्याने चेहऱ्याच्या कडेला दाढी वाढवली होती. एक तर ते तो

नैऋत्येकडील अमेरिकन भारतीय असल्याचे किंवा बुद्धिमान असल्याचे निदर्शक होते. त्याला कोणत्या वर्गात टाकावे, याबद्दल कोणालाच खात्री नव्हती. बाईसाहेबांना त्याची नजर आवडत नसे. त्या त्याला आठवड्याचे पैसे आधी भरायला लावत.

त्या इटालियनने भाडे भरले व तो हॉटेलमध्ये सहा रात्री राहिला. या कालावधीत त्याने काही नकली किल्ल्या बनवल्या. शेवटच्या रात्री, त्याने डझनभर खोल्यांमध्ये चोरी केली. त्यात माझीही खोली होती. पैसे माझ्या खिशात असल्याने, त्याला ते सापडले नाहीत. त्यामुळे मी कंगाल झालो नाही. माझ्याकडे सत्तेचाळीस फ्रँक्स होते --- त्यामुळे माझे काम शोधायचे बेत रहित झाले. आता मला रोज सहा फ्रँक्स भाड्याच्या ठिकाणी रहावे लागले. आणि सुरवातीपासूनच दुसरा काही विचार करणे, अवघड होऊन बसले. आता माझे हलाखीचे जीवन सुरु झाले. मी गरिबीचा अनुभव घेऊ लागलो. जरी ती अगदी फार गरिबी नव्हती, तरी ती त्या काठावर होती. सहा फ्रँक्स म्हणजे एक शिलिंग आणि त्यात कसे भागवायचे हे तुम्हाला ठाऊक असेल, तर तुम्ही पॅरीसमध्ये एक दिवस राहू शकता. पण ते गुंतागुंतीचे प्रकरण आहे.

तुमचा गरिबीचा पहिला अनुभव, फारच चौकस आहे.

तुम्ही गरिबीबद्दल इतका विचार केलेला असतो --- तुम्ही आयुष्यभर तिला घाबरत असता. आज ना उद्या तुम्हाला तिचा सामना करावा लागणार, हे तुम्हाला माहिती असते. तरीही ती येते, तेव्हा ती अजिबात कल्पना नसतांना येते. तुम्हाला ते अगदी साधे वाटते. पण ती असामान्यपणे गुंतागुंतीची असते. तुम्हाला ती भयंकर वाटते. ती फक्त कंटाळवाणी आणि टोकाची घाणेरडी असते. तुम्हाला प्रथम अगदी तळातल्या विशेष प्रकारच्या गरिबीचा शोध

लागतो. मग हळूहळू ती तुम्हाला, सालडी सोलल्यासारख्या अवघड प्रकारच्या कंजूषपणाकडे नेते.

उदाहरणार्थ, तुम्हाला असा शोध लागतो, गरिबीला गुप्तता चिकटलेली आहे. एका फटक्यात दिवसाला तुमच्याकडील सहा फ्रँक्स जातात. पण अर्थात तुम्ही ते कबूल करू धजत नाही --- तुम्हाला असे ढोंग करावे लागते, की तुम्ही नेहमीसारखेच जगत आहात. सुरवातीपासून ते तुम्हाला खोट्याच्या गोंधळात टाकते. आणि एवढे करूनही तुम्हाला ते सावरणे कठीण जाते. तुम्ही कपडे बाहेर धुवायला देत नाही. मग धोबी तुम्हाला रस्त्यात गाठून तुम्ही असे का करता, ते विचारतो. तुम्ही काहीतरी पुटपुटता. त्याला वाटते, तुम्ही कुठेतरी दुसरीकडे कपडे धुवायला देता. त्यामुळे तो तुमचा जन्मभराचा शत्रू होतो.

सिगरेट विकणारे विचारतात, तुम्ही सिगरेट का ओढत नाही. काही पत्रांना तुम्ही उत्तरे देऊ शकत नाही. जेवणे, ही सर्वात मोठी समस्या असते. प्रत्येक जेवायच्या वेळी, तुम्ही बाहेर हॉटेलात जाताच असे नाही. दर तासाला पावाचा एक तुकडा घेऊन तुम्ही लक्सेनबर्ग बागेत जाता व कबुतरे बघत तो खाता.

नंतर तुमचे अन्न खिशात भरून, तुम्ही घरी येता. पाव आणि लोणी, किंवा पाव आणि वाईन हे तुमचे अन्न असते. त्याचा दर्जाही खोटेपणानी भरलेला असतो. तुम्हाला नेहमीच्या पावाऐवजी रायचा पाव घ्यावा लागतो. कारण रायच्या पावाचे तुकडे गोल असतात आणि खिशात भरायला सोपे पडतात. त्यात दिवसाला तुमचा एक फ्रँक खर्च होतो. कधीकधी तुमचा आब राखण्यासाठी तुम्हाला जास्त पैशांचे एखादे पेय घ्यावे लागते आणि मग त्या दिवशी तुम्ही पावाला मुकता. तुमचे कपडे घाणेरडे होतात. पण तुमच्याकडे

साबण व रेझर नसतो. तुमचे केस वाढलेले असतात. तुम्ही स्वतःच ते कापायला बघता. पण ते इतके भयानक दिसते आणि शेवटी तुम्हाला न्हाव्याकडे जावेच लागते. मग त्या दिवशी उपाशी रहावे लागते. दिवसभर तुम्ही बेमालूम खोटे बोलत असता.

दिवसाच्या सहा फ्रँक्समुळे मिळणारी सुरक्षितता तुम्ही गमावून बसता. मोठे संकट येते व तुमचे अन्न बळकावले जाते.

तुमच्याकडील शेवटचे पैसे तुम्ही अर्धा लिटर दूध आणायला खर्च केलेले असतात. ते तुम्ही स्पिरीटच्या दिव्यावर तापवता. ते उकळतांना तुमच्या पुढील हातातून, कळ येते. ती घालवायला बघतांना दूध सांडते. अरेरे! त्या दिवशी उपाशी रहावे लागते.

तुम्ही बेकरीत पाव आणायला जाता. गिऱ्हाईकांसाठी पाव कापणे चाललेले बघून, तुम्ही थांबता. कापणारी मुलगी चुकीने एक पौंडापेक्षा जास्त पाव कापते व म्हणते, मला वाटते, तुम्ही याचे जादा पैसे द्यायला काही मागेपुढे बघणार नाही. एका पौंडाची किंमत एक फ्रँक असते आणि तुमच्याकडे फक्त तेवढेच पैसे असतात. अशा वेळी तुम्ही दुःख करता. पुन्हा त्या दुकानात जायलाच तुम्ही घाबरता.

तुम्ही एका फ्रँकचे एक किलो बटाटे आणायला जाता. पण त्या सुट्या पैशातील एक नाणे बेल्जियन असते. ते घ्यायला दुकानदार नकार देतो. तुम्ही त्या दुकानावर बहिष्कार टाकता व परत कधीच तिथे जात नाही.

तुम्ही एका वाईट वस्तीमध्ये रहात असता आणि एक बऱ्यापैकी पैसेवाला मित्र येतांना दिसतो. म्हणून तुम्ही जवळच्या एका हॉटेलात शिरता. आता तिथे तुम्हाला काहीतरी घेणे भाग असते. तुमच्याकडील शेवटचे पैसे तुम्ही एक पेला आत मेलेली माशी पडलेल्या काळ्या कॉफीवर खर्च करता.

असे शेकडो प्रसंग तुमच्यावर येतात. हे सर्व कफल्लक असल्याचे परिणाम असतात.

भूक लागणे म्हणजे काय असते, याचा तुम्हाला शोध लागतो. तुमच्या पोटातील पाव लोण्यासकट तुम्ही बाहेर जाता व दुकानातील खिडकीकडे बघत बसता. सर्वत्र वाहून चाललेल्या अन्नाचे ढिगारे पडलेले असतात. मेलेली डुकरे, गरम पावाच्या टोपल्या, लोण्याच्या थप्प्या, बटाट्यांचे ढीग, मासाचे लपके, स्विस चीज, हे सर्व तुम्हाला खिजवत असते. इतके अन्न बघून तुम्हाला स्वतःची फारच दया येते.

तुम्ही पावाचा एक तुकडा चोरून पळायचा व कुणी पकडण्याआधी तो खाऊन संपवण्याचा विचार करता. आणि भीती वाटून तुम्ही तो विचार सोडून देता. भूक म्हणजे काय ते तुम्हाला कळते. गरिबीतूनच निघणाऱ्या कंटाळयाचा तुम्हाला शोध लागतो. जेव्हा तुम्हाला करायला काही नसते आणि तुम्ही कुपोषित असता, तेव्हा तुम्हाला कशातच रुची वाटत नाही. कधीकधी अर्धा दिवस तुम्ही तरुण नसल्यासारखे अंथरुणावर पडून रहाता. अन्नाशिवाय कसलाच विचार तुमच्या डोक्यात नसतो. पाव आणि मार्गारीन म्हणजे काही माणूस नाही. ते नुसते पोट भरण्यासाठी काहीतरी कोंबणे झाले. याचे --- पुढे अजूनही वर्णन करता येईल पण ते परत तेच तेच, दिवसाला सहा फ्रँक्सचे आयुष्य कसे असते ते सांगितल्यासारखे होईल. पॅरीसमधील हजारो लोक असे आयुष्य जगतात --- झगडणारे कलाकार, विद्यार्थि, त्यांची चलती संपल्यावर वेश्या, सर्व प्रकारचे बेकार, काम नसलेले लोक, हे सगळे शहरापासून जवळ असलेल्या गरीब उपनगरांचा भाग असतात.

मी अशा प्रकारे तीन आठवडे काढले. माझ्याकडील सत्तेचाळीस फ्रँक्स लवकरच संपले आणि मला इंग्लिश शिकवून दर आठवड्याला

मिळणाऱ्या छत्तीस फ्रँक्सवरच अवलंबून रहावे लागले. अननुभवी असल्याने, मी पैसा वाईट रीतीने वापरला आणि मग कधीकधी मला उपाशी रहावे लागले. असे होत असे, तेव्हा मी माझे काही कपडे विके. मी त्यांची लहान पाकिटे बनवे व हॉटेलबाहेर सीन नदीच्या डाव्या किनाऱ्यावरील एका टेकडीवर असलेल्या जुने कपडे विकणाऱ्या दुकानात विके. तेथील दुकानदार असामान्यपणे न पटणारा, लाल केसांचा ज्यू माणूस होता. तो कुणी आलेले बघताच रागावे. कुणाला असे वाटेल की आम्ही त्याच्याकडे येऊन, त्याला काही दुखापत केली आहे. तो त्याचा राग दर्शवणारे काही ओरडे. "तू पुन्हा इथे आलास? हे काय आहे, असे तुला वाटते? सूप बनवणारे स्वयंपाकघर? तो कपड्यांची खूप कमी किंमत देई. जी टोपी मी पंचवीस शिलिंगला आणली होती व अगदी क्वचित वापरली होती, त्याचे त्याने मला पाच फ्रँक्स दिले. एका चांगल्या बुटांच्या जोडीचे पाच फ्रँक्स दिले व शर्टांचे प्रत्येकी एक फ्रँक दिले. तो विकत घेण्यापेक्षा बदली करणे नेहमी पसंत करे. तो एखादी निरुपयोगी वस्तू गळ्यात मारून ती आपण खुशीने घेतली आहे, असे भासवे.

एकदा मी त्याला एका म्हातारीकडून जुना मोठा कोट घेतांना पाहिले व दोन बिलीयर्डचे चेंडू तिच्या हातावर ठेवलेले पाहिले. तिने काही आरडा ओरडा करायच्या आत तिला दुकानाबाहेर जोराने ढकलून दिले. त्या ज्यूचे नाक जर कोणी ठेचले, तर फार मजा येईल.

हे तीन आठवडे फार वाईट आणि बिनआरामाचे गेले. आणि अजून कहर म्हणजे, मला आता लवकरच भाडे भरायचे होते. पण मला वाटत होते, तितकी काही परिस्थिती गंभीर नव्हती. कारण तुम्ही जेव्हा गरिबीचा सामना करू लागता, तेव्हा तुम्हाला काही चांगला शोध लागतो. तुम्ही कंटाळता, काही गुंतागुत तयार होते, भुकेने तुम्ही कासावीस होता. पण तुम्हाला गरीबीचे

दोष भरून काढणारे काही शोध लागतातः तुमचे भविष्य खलास होते. काही प्रमाणात, हे खरे आहे, की तुमच्याकडे जितके कमी पैसे असतील, तितकी तुमची काळजी कमी होते. जेव्हा जगात तुमच्या कडे शंभर फ्रँक्स असतात, तेव्हा तुम्हाला अधीरपणे काळज्या सतावतात. तर जेव्हा तुमच्याकडे फक्त तीन फ्रँक्स असतात, तेव्हा तुम्ही फार बेपर्वा असता. कारण त्यात तुमचे उद्यापर्यंतचे जेवण होणार असते. आणि त्यापुढील विचार तुम्ही करूच शकत नाही. तुम्ही कंटाळता पण घाबरत नाही. तुम्ही असातसा विचार करता 'मी एकदोन दिवसात भुकेलेला रहाणार आहे, हे धक्कादायक आहे --- नाही का?' मग मन दुसऱ्या विषयांवर भरकटू लागते. पाव व मार्गारीनने काही प्रमाणात पोट भरतेच. गरिबीत एक अजून भावना असते. ती म्हणजे थोड्या नुकसानीनंतर दिलासा मिळतो. मला वाटते, गरिबी अनुभवलेल्या प्रत्येकाला हे जाणवले असेल. हा सुटकेचा व जवळजवळ आनंदाचा भाव असतो, की शेवटी तुम्ही त्यातून बाहेर पडता. तुम्ही नेहमी रसातळाला गेल्याच्या गोष्टी करत असता --- आणि शेवटी तुम्ही कमालीची गरिबी अनुभवता. आणि तुम्ही त्यातून तगून जाऊ शकता. खूपशी काळजी मिटते.

## IV

एक दिवस माझे इंग्लिश शिकवणे एकाएकी संपले. हवा गरम होऊ लागली होती. शिकण्याचा आळस करणाऱ्या माझ्या एका विद्यार्थ्याने मला काढून टाकले. बाकीचे विद्यार्थि त्याच्या जागेतून काही न कळवता नाहीसे झाले. माझे बारा फ्रँक्स बुडले. माझ्याकडे इतके कमी पैसे उरले, की मी दीड दिवस तंबाखूदेखील ओढू शकत नव्हतो. मग भूक सहन न होऊन मी काही न

सांगता माझ्या खोलीतून भाड्याचे बारा फ्रँक्सचे कर्ज डोक्यावर घेऊन बाहेर पडलो. माझ्याकडे फक्त तीस सेंटीम्स [ १ सेंटीम म्हणजे फ्रँकचा शंभरावा भाग.] होते आणि तंबाखू नव्हती. दीड दिवस मी सिगरेट ओढू शकलो नाही. भुकेने मी वेडा व्हायची पाळी आली. मी माझे उरलेसुरले कपडे बॅगेत कोंबले आणि कर्ज देणाऱ्याकडे गेलो. मी कफल्लक न झाल्याचे ढोंग यापुढे करणे शक्य नव्हते. बाईसाहेबांच्या परवानगीशिवाय मी कपड्यांची बॅग घेऊन हॉटेलबाहेर पडू शकत नव्हतो. आमच्या इथे सामान्यपणे वापरली जाणारी युक्ती म्हणजे बाईसाहेबांना काही न सांगता आपली बॅग घेऊन पळून जायचे. पण मी तसे न करता तिला मी जागा सोडत असल्याचे सांगितल्याने, तिला नवल वाटले.

जास्त वाढवून सांगितलेल्या, [ अर्थात, ‘स्वातंत्र्य, समता व बंधुभाव’ असे लिहिलेल्या, जे फ्रान्समध्ये पोलीस चौकीवरही लिहितात] अशा भव्य दगडी प्रवेशद्वाराने मी पहिल्यांदाच कर्ज देणाऱ्या फ्रेन्च दुकानात गेलो. तेथील एका मोठ्या शाळेतील वर्गासारख्या दिसणाऱ्या मोठ्या खोलीत गेलो. तिथे बाकांच्या ओळी होत्या व एक काऊंटर होता. चाळीस पन्नास लोक तिथे थांबले होते. एकाने काऊंटरवरून एकाला शपथ दिली व तो बसला. जेव्हा कारकुनाने त्याच्या वस्तूंची किंमत तपासली तेव्हा तो मोठ्याने म्हणाला, “क्रमांक अमुक तमुक तुम्ही पन्नास फ्रँक्स घ्याल का? कधी कधी ते फक्त पंधरा फ्रँक्स असत. कधी दहा तर कधी पाच. पण किती का असेनात, ते मिळत, हे सर्वांना माहिती होते. मी आत आल्यावर कारकून कुत्र्याला बोलावल्यासारखे शिट्टी वाजवत, मान हलवत व एखाद्या गुन्हेगाराला बोलवावे, तशा आवाजात ओरडला, “क्रमांक ८३ --- क्रमांक ८३, इकडे या.” तो काऊंटरकडे गेला. तो दाढी असलेला, मानेपर्यंत बटणे लावलेला, कडेला झिजलेली पँट व मोठा कोट घातलेला म्हातारा होता.

एकही शब्द न बोलता, त्याने काऊंटरवरून पुडके घेतले --- नक्कीच ते काही किंमत नसलेले होते. ते जमिनीवर पडून उघडले. त्यात माणसाच्या चार वुलन पँट्स होत्या.

कोणीच न हसता राहू शकले नाही. बिचाऱ्या ८३ क्रमांकाने ते उचलले व स्वतःशी काही पुटपुटत, मान खाली घालून, पाय ओढत निघून गेला.

मी बॅगेत घालून आणलेल्या चांगल्या अवस्थेतील कपड्यांची किंमत वीस पौंडांपेक्षा थोडी जास्त झाली.

मला वाटले होते, की मला जेमतेम दहा पौंड मिळतील. आणि त्याच्या पाउणपट किंमत दोनशे पन्नास ते तीनशे फ्रँक्स होती. मी काळजी न करता, निदान दोनशे फ्रँक्स तरी मिळतील, म्हणून थांबलो.

शेवटी कारकुनाने माझा क्रमांक घेतला, "क्रमांक ९७!"

मी उभा राहून म्हणालो, "हो."

"सत्तर फ्रँक्स?"

दहा पौंड किंमत असलेल्या कपड्यांचे फक्त सत्तर फ्रँक्स! पण घासाघीस करून, काही उपयोग नव्हता. मी एकाला तसे करतांना पाहिले होते. तेव्हा कारकुनाने लगेच त्याला कटवले. मी पैसे व कर्जाचे तिकीट घेतले आणि बाहेर पडलो. माझ्या अंगावरील कपड्यांखेरीज आता माझ्याकडे कपडे नव्हते. कोट कोपरावर फाटला होता. तोही देऊन टाकायच्या लायकीचाच होता. अजून एक शर्ट होता. नंतर जेव्हा बराच उशीर झाला, तेव्हा मी विचार केला, की मी दुपारी त्या दुकानात गेलो असतो, तर ते शहाणपणाचे ठरले असते. कारण तो कारकून फ्रेन्च होता आणि जेवण झाल्याशिवाय या फ्रेन्च लोकांची मनस्थिती ठीक नसते.

मी घरी गेलो, तेव्हा बाईसाहेब बिस्ट्रोची फरशी झाडत होत्या. ती चालत माझ्याकडे आली. माझ्या भाड्यासाठी ती अस्वस्थ असल्याचे मला तिच्या डोळ्यात दिसले.

ती म्हणाली, “तुझे कपडे विकून तुला काय मिळाले? फार काही नसेल, बरोबर?”

मी लगेच म्हणालो, “दोनशे फ्रँक्स.”

ती नवल वाटून म्हणाली, “अरे बापरे! हे काही वाईट नाही.”

“ते इंग्लिश कपडे नक्कीच महागाईचे असणार.”

मी खोटे बोलल्याने बराच त्रास वाचला. आणि विचित्रपणे, ते खरे ठरले. काही दिवसांनी, मी वर्तमानपत्रात लिहिलेल्या एका लेखाचे मला दोनशे फ्रँक्स मिळाले. आणि जरी ते करायला मला नकोसे वाटले, तरी मी भाड्याची पै अन पै चुकती केली. नंतरचे काही आठवडे जरी मला फाके पडले, तरी माझ्या डोक्यावर छप्पर तर होते.

आता काम शोधणे फारच अनिवार्य झाले. मला माझ्या एका मित्राची आठवण झाली. तो बोरिस नावाचा रशियन वेटर होता. तो कदाचित मला मदत करू शकला असता. दवाखान्यातील सामान्य लोकांसाठी असलेल्या विभागात, तो संधीवातावर उपचार घेतांना मला प्रथम भेटला. काही अडचण असेल, तर माझ्याकडे ये, असे तो तेव्हा मला बोलला होता.

मला बोरिसबद्दल थोडे सांगितले पाहिजे. तो मोठा गमत्या वल्ली होता आणि खूप काळ माझा मित्र होता. तो पस्तिशीचा, सैनिकासारखा थोराड व दिसायला चांगला असलेला माणूस होता. पण आजारपणामुळे, तो झोपून झोपून, लठ्ठ झाला होता. बहुतेक निर्वासित रशियनांप्रमाणे, त्याचे आयुष्य साहसी होते. त्याचे पालक श्रीमंत होते. त्यांनी क्रांती चेचून काढली होती.

त्याने लढाईमध्ये, सैबेरियन रायफलच्या दुसऱ्या तुकडीत काम केले होते आणि ती त्याच्या मते रशियन सैन्यातील सर्वोत्तम तुकडी होती. युद्धानंतर प्रथम त्याने ब्रश कारखान्यात हमाल म्हणून काम केले. मग तो बशा धुणारा झाला. आणि मग त्याने वेटर म्हणून काम केले. जेव्हा तो आजारी पडला, तेव्हा तो हॉटेल स्क्राइबमध्ये होता. त्याला दिवसाला शंभर फ्रँक्स. टीप मिळत असे. त्याला मुख्य वेटर होण्याची व पन्नास हजार फ्रँक्स साठवायची महत्वाकांक्षा होती. नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर त्याला लहानसे हॉटेल काढायचे होते. बहुतेक सर्व रशियन निर्वासितांसारखे त्याने साहसी आयुष्य काढले होते. श्रीमंत असणारे त्याचे पालक, क्रांतीच्या काळात मारले गेले होते. रशियन सैन्यातील उत्तम तुकडी असणाऱ्या दुसऱ्या क्रमांकाच्या बंदुकधारी तुकडीमध्ये त्याने काम केले होते. लढाईचा काळ म्हणजे सर्वोत्कृष्ट काळ, असे तो नेहमी म्हणे आणि सैनिक होणे, ही त्याची खोलवरची इच्छा होती. त्याने युद्धनीतीची व सैन्याच्या इतिहासाची पुष्कळ पुस्तके वाचली होती. तो नेपोलीयन, कुटुझॉफ, क्लॅसेविट्झ, मोल्टक व फोसी यांचे काय आडाखे व थिअरीज होत्या, यासंबंधी सर्व काही सांगू शके. सैनिकांसाठी काहीही करायला त्याला आवडे. मोन्टपार्नीजमधले ‘ग्लोसेरी लीली बाग’ हे त्याचे आवडते हॉटेल होते. कारण तिथे बाहेर मार्शल ने चा पुतळा उभा होता. नंतर कधीतरी बोरिस आणि मी रुयु ड्यू कॉमर्स टोगिरमध्ये गेलो. जर आम्ही मेट्रोने गेलो असतो, तर कॉमर्स स्टेशन जवळ असूनही, बोरिस नेहमीप्रमाणे कॅम्ब्रोन स्टेशनला उतरला असता व ज्याला वॉटरलूला शरण यायला बोलावले होते आणि त्याने फक्त छट् एवढेच उत्तर दिले होते, अशा जनरल कॅम्ब्रोनची आठवण काढली असती.

बोरीसला करण्यासारखी एकच क्रांतिकारक गोष्ट उरली होती, ती म्हणजे त्याची पदके आणि त्याची सैन्यातील जुने फोटो विकणे. बाकी सगळे

त्याने कर्ज देणाऱ्या दुकानात विकले होते. जवळजवळ रोज तो ते फोटो अंथरुणावर पसरून बसे व त्याबद्दल बोले.

"सभ्य स्त्रीपुरुषहो आणि माझ्या मित्रानो, इथे तुम्ही मला कंपनीच्या मुख्यपदी बघत आहात." तो छान मोठा माणूस होता, कळले का? या उंदरांसारख्या फ्रेन्च माणसांप्रमाणे नाही. विसाव्या वर्षी कॅप्टन --- काही वाईट नाही. काय? सैबेरियन रायफलच्या दुसऱ्या तुकडीत कॅप्टन आणि त्याचे वडील स्वतंत्र कर्नल होते.

तो पुढे बोलला, "आहा, पण माझ्या मित्रानो, हे जीवनाचे चढउतार आहेत. रशियन सैन्यातील कॅप्टन आणि मग व्यायामामुळे धापा टाकणारा. मग क्रांती --- आणि कफल्लक अवस्था. १९१६ मध्ये मी एक आठवडा हॉटेल इडोर्ड सप्टेंबरमध्ये राहिलो. १९२० मध्ये मी रात्रीच्या राखणदाराची, जमीन धुणाऱ्याची, ताटल्या धुणाऱ्याची, हमालाची, तळघर राखणदाराची, शौचालय व्यवस्थापकाची नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करत होतो. मला वेटर्सकडून टीप मिळत असे.

पण सभ्य माणसासारखे कसे रहायचे, हे मला माहिती होते. माझ्या मित्रा, मी हे बढाया मारण्यासाठी सांगत नाही. पण मी परवा हे आठवायचा प्रयत्न करत होतो, की माझ्या आयुष्यात किती बायका येऊन गेल्या आणि त्या दोनशे होत्या. हो, निदान दोनशे --- आहा, ठीक आहे, पण असे होतेच, की जो खूप काळ लढतो, त्याचा विजय होतो."

बोरीसचा स्वभाव विचित्र व बदलणारा होता. त्याला नेहमी सैन्यात परत जाण्याची इच्छा असे. पण तो खूप काळ वेटर असल्याने, जरी त्याचे काही हजारपेक्षा जास्त फ्रँक्स साठले नाहीत, तरी त्याचा दृष्टीकोन तसा होता. त्याला शेवटपर्यंत असे वाटत होते, की त्याचे स्वतःचे हॉटेल तो चालू करू

शकेल आणि श्रीमंत होईल. मला असे आढळले, की सर्व वेटर्स अशीच स्वप्ने बघत असतात. त्यामुळे त्यांची एकमेकांशी मैत्री होऊ शकते व ते वेटरचे काम करू शकतात. हॉटेलच्या आयुष्याबद्दल बोरिस खूप बोलत असे.

तो म्हणत असे, “थांबणे हे जुगार खेळण्यासारखे आहे. तुम्ही गरिबीतच मरता किंवा वर्षभरात तुम्ही तुमचे नशीब बनवू शकता. तुम्हाला रोजगार दिला जात नाही. तुम्हाला मिळणाऱ्या टीपवर तुम्ही अवलंबून रहाता --- बिलाच्या दहा टक्के टीप आणि वाईन कंपनीकडून शँपेनच्या बुचांवर मिळणारे कमिशन. कधीकधी टीप खूप मिळत असे. उदाहरणार्थ, बारच्या मालकाला दिवसाला जास्तीत जास्त पाचशे फ्रँक्स मिळू शकत. जर चलतीचा काळ असेल, तर त्यापेक्षाही जास्त. मीच एकदा दोनशेपेक्षा जास्त फ्रँक्स मिळवले होते. ते बिआरिट्झमधील एका हॉटेलमध्ये झाले. व्यवस्थापकापासून सगळेजण दिवसाचे एकवीस तास काम करत होते. महिन्याच्या शेवटी एकवीस तास काम आणि अडीच तास झोप, पण तरीही ते दिवसाला दोनशे फ्रँक्स मिळण्याच्या दृष्टीने ठीक होते.

आपले भाग्य कधी फळफळणार आहे, हे कुणालाच कळत नाही. एकदा मी हॉटेल रॉयलमध्ये असतांना, एक अमेरिकन माणसाने मला जेवणापूर्वी बोलावले आणि चोवीस ब्रँडींची मागणी केली. मी त्या सगळ्या ट्रेमध्ये चोवीस पेल्यांमध्ये घालून आणल्या. तो [त्याला दारू चढली होती.] म्हणाला, “अरे, आता बारा पेले मी पितो व बारा पेले तू पी. आणि नंतर तू दारापर्यंत चालत जाऊ शकलास, तर मी तुला शंभर फ्रँक्स देईन.” मी दारापर्यंत चाललो आणि त्याने मला शंभर फ्रँक्स दिले. त्यानंतर सहा दिवस रोज रात्री त्याने हा प्रकार केला. बारा ब्रँडींचे पेले आणि शंभर फ्रँक्स. काही महिन्यानंतर मी असे ऐकले की अमेरिकन सरकारने त्याला पैशांचा गैरवापर

केल्याबद्दल कामावरून काढून टाकले. या अमेरिकनांचे काहीतरी चांगले असते, असे तुम्हाला वाटत नाही का?

मला बोरिस आवडे. आम्ही बुद्धीबळ खेळण्यात व लढाया आणि हॉटेले यासंबंधी बोलण्यात, एकत्र चांगला वेळ घालवत असू. बोरिस मला नेहमी सुचवे, की मी वेटर व्हावे. तो म्हणे, "ते आयुष्य तुला योग्य ठरेल. तेव्हा तुम्ही रोज शंभर फ्रँक्स मिळवता आणि छान मालकिणीच्या हाताखाली काम करता. हे काही वाईट नाही.

"तू म्हणतोस, की तू लेखक आहेस. पण लिहिणे मूर्खपणाचे आहे. लिहिण्यावर पैसे कमावण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे प्रकाशकाच्या मुलीशी लग्न करणे. पण तू त्या मिशा काढून टाकल्यास, तर चांगला वेटर बनशील. तू उंच आहेस. इंग्लिश चांगले बोलतोस --- वेटरसाठी याच मुख्य गोष्टी आहेत. माझ्या मित्रा, माझा हा पाय एकदा बरा होऊ दे. मग तुला काही काम मिळत नसेल, तर माझ्याकडे ये."

आता मला भाडे परवडेनासे झाले होते व मी भुकेलेला राहू लागलो होतो. मला बोरीसचे बोलणे आठवले आणि मी त्याला लगेच भेटायचे ठरवले. इतक्या सहज मला वेटरचे काम मिळेल, अशी मला आशा नव्हती. पण ताटल्या कशा धुवायच्या, हे मला माहिती होते. तो मला स्वयंपाकघरात काही काम देऊ शकेल, असे मी समजत होतो. तो म्हणाला होता, की उन्हाळ्यात ताटल्या धुवायचे काम मिळू शकते. मी ज्याच्यावर भरवसा ठेवावा, असा एक तरी मित्र मला होता, हे आठवून मला सुटका झाल्यासारखे वाटले.

## V

बोरिसने मला रु ड्यू मार्च डेस ब्लान्सचा पत्ता देण्यापूर्वी, तो पत्रात म्हणाला होता, "गोष्टी फार वाईट नाहीत." मी धरून चाललो, की तो हॉटेल स्क्रीबमध्ये शंभर फ्रँक्स रोजावर परत आला होता. मी आशावादी होतो. मी यापूर्वीच बोरीसकडे का नाही गेलो असे वाटून, मी स्वतःला दूषणे दिली. अंडी फोडून तव्यावर टाकतांना, आनंदाने प्रेमगाणी गाणाऱ्या स्वयंपाक्यांबरोबर मी स्वतःला हॉटेलमध्ये बघत होतो. आणि मला दिवसाला पाच भक्कम जेवणे मिळणार होती.

माझ्या पगाराची कल्पना करून, मी मूर्खासारखे एक फ्रेन्च सिगरेटचे पाकीट विकत घेतले.

सकाळी मी रु ड्यू मार्च डेस ब्लान्सच्या बाजूने चाललो होतो. तिथे मागील रस्त्यावर मी वेडेवाकडे अंगविक्षेप करणारा नाच चालू असल्याचे पाहिले. बोरीसचे हॉटेल त्या रस्त्यावरील सर्वात गलीच्छ हॉटेल होते. त्याच्या अंधाऱ्या दारातून वाईट वासाच्या, आंबट, घाणेरडे पाणी मिसळलेल्या कृत्रिम सूपाचा वास येत होता --- ते गाईच्या मासाचे सूप होते. एक पाकीट पाच सेंटीमला होते. मला संशय आला. जे लोक ते पित, ते भुकेलेले रहात. बोरिस दिवसाला शंभर फ्रँक्स मिळवत होता का?

कार्यालयात बसलेला जबाबदार माणूस म्हणाला, "हो. तो रशियन एकदम वरच्या मजल्यावर, त्याच्या घरी आहे. मी सहा अरुंद जिने चढून गेलो. एखादा वर वर चढतो तसतसा त्याचा गाईच्या मासाच्या सूपच्या शक्तीचा परिणाम वाढत वाढत जातो. मी बोरीसच्या दारावर टकटक केले, तेव्हा त्याने काही उत्तर दिले नाही. त्यामुळे मी ते उघडून आत गेलो. खोली म्हणजे दहा चौरसफुटांचे खबदाड होते. तिथे एक लोखंडी पलंगाची चौकट, त्यावरील

गादी व कपडे एवढेच होते. तिथे फक्त आभाळाचा उजेड पडला होता. हात धुवायला एक लहानसे बेसिन होते. पलंगावरील भिंतीवरून S आकाराची एक ढेकणांची ओळ चालली होती. बोरिस गाढ झोपला होता. त्याचे पोट वरखाली होत होते. त्याच्या छातीवर ढेकणांनी चावल्याच्या खुणा होत्या. मी आल्यावर तो जागा झाला. डोळे चोळत, हळू आवाजात कण्हला.

तो उद्गारला, "येशूला नमन! माझी पाठ! मला वाटते, माझी पाठ मोडली आहे.

मी ओरडलो, "काय झाले?"

"माझी पाठ मोडली आहे, एवढेच. मी काल सबंध रात्र काम केले. देवा रे, तुला माहिती आहे का, माझी पाठ काय बोलते आहे?"

"माझ्या प्रिय बोरिस, तू आजारी आहेस का?

"आजारी नव्हे भुकेलेला आहे --- मरणांतिक उपाशी आहे. गेले अनेक आठवडे मी दिवसाला दोन फ्रँक्सवर गुजराण करतो आहे. जमिनीवर झोपतो आहे. हे भयानक आहे. माझ्या मित्रा, तू अडचणीच्या वेळी आला आहेस."

अजून तो हॉटेल स्क्राइबमध्ये काम करत होता का, हे बोरिसला विचारून काही उपयोग नव्हता. मी घाईने खाली गेलो आणि पाव आणला. बोरिस त्यावर तुटून पडला. त्याने तो अर्धा खाल्ला. त्यानंतर त्याला बरे वाटले. तो उठून बसला व त्याला काय झाले, ते त्याने मला सांगितले. दवाखान्यातून बाहेर पडल्यावर, त्याला कुठे काम मिळेना. कारण तो थोडा लंगडत होता. त्याने सर्व विकून कर्ज काढले होते व शेवटी न खाऊन तो मरायला टेकला होता. एक आठवडाभर तो सीन नदीच्या पुलाखालील, जहाजांमधून माल चढवायच्या व उतरवायच्या धक्क्यावर दारुच्या रिकाम्या

पिपांमध्ये झोपला. मागील पंधरा दिवसांपासून तो या खोलीत एका मेकॅनिक ज्यूबरोबर रहात होता. असे दिसत होते की यात गुंतागुंतीचे स्पष्टीकरण होते. तो ज्यू बोरीसला तीनशे फ्रँक्स देणे लागत होता. म्हणून त्याने बोरीसला त्याच्या खोलीत जमिनीवर झोपायची परवानगी दिली व खाण्यासाठी रोज दोन फ्रँक्स देऊ लागला. त्यात एक कप कॉफी आणि पावाच्या तीन गुंडाळ्या येत असत. तो ज्यू सकाळी सातला कामावर जात असे. मग बोरिस त्याची झोपायची जागा, म्हणजे आकाशाखालील पाऊस लागणारी जागा सोडे आणि अंथरुणावर झोपे. ढेकणांमुळे त्याला तिथे झोप फारशी झोप लागत नसे पण पाठीला विश्रांती मिळे.

मी बोरीसकडे मदत मागायला आलो, तेव्हा तो माझ्याहून वाईट स्थितीत असल्याने, त्याला ते फारच दुःखदायक होते. मी त्याला सांगितले, की माझ्याकडे फक्त साठ फ्रँक्स राहिले आहेत व मला ताबडतोब नोकरी मिळायची गरज आहे. या वेळेपर्यंत बोरिसने सगळा पाव खाल्ला होता आणि तो आनंदी व बडबड्या दिसत होता. तो निष्काळजीपणे बोलला, "तू काय चिंता करतो आहेस? तुझ्याकडे साठ फ्रँक्स आहेत, हे चांगले नशीब आहे. माझ्या मित्रा, मला कृपया तो बूट दे. जर माझ्या हाताशी आले, तर मी काही ढेकूण चिरडणार आहे."

"पण तुला असे वाटते का, की मला नोकरी मिळायची काही संधी आहे?"

"संधी? खात्री आहे. खरे तर माझ्याकडे आधीच एक आहे. काही दिवसात, रु ड्यू कॉमर्स इथे एक नवीन रशियन हॉटेल उघडणार आहे. ती खासगी मिळकत आहे. मी तिथे मुख्य वेटर होणार आहे. मी तेथील भटारखान्यात तुला नक्की नोकरी मिळवून देऊ शकतो. जर तुझे नशीब

असेल, तर महिन्याला पाचशे फ्रँक्स. आणि तुमचे जेवण. याशिवाय टीप्सदेखील मिळतील.”

“पण मधल्या काळात काय? माझे खोलीचे भाडे भरायचे बरेच दिवस बाकी आहे.”

“ओहो, आपण काहीतरी शोधून काढू. माझ्यावर भरवसा ठेव. पॅरीसमध्ये माझ्याकडून पैसे घेतलेले खूप लोक आहेत. त्यातील एकजण ते पैसे मला लवकरच परत करणार आहे. नाहीतर माझ्या बायकांचा विचार कर. तुला माहिती आहे का, बाई कधीच विसरत नाही. मी त्यांना नुसते विचारेन आणि त्या मला मदत करतील. शिवाय तो ज्यू मला म्हणतो आहे, की तो काम करतो, त्या गॅरेजमधून काही मशीन्स चोरणार आहे आणि मग तो ती विकण्यापूर्वी मशीन्स साफ करायचे मला दिवसाला पाच फ्रँक्स देणार आहे. त्यात आपले भागेल. माझ्या मित्रा, काळजी करू नकोस. पैसे सहज मिळतील.”

“चल तर मग, आपण बाहेर जाऊन काम शोधू.”

“माझ्या मित्रा, आता तू उपाशी रहाण्याची चिंता करू नकोस.”

हे चांगले नशीब फक्त लढाईमुळे आलेले आहे --- मी अनेक वेळा वाईट नशीब भोगले आहे. हा फक्त त्या परिस्थितीत तगून रहायचा प्रश्न आहे.

फोसी मॅक्झिमला आठवः ‘हल्ला करा. हल्ला करा. हल्ला करा.’

बोरिसने उठायचे ठरवले, तेव्हा दुपार झाली होती. त्याच्याकडे आता फक्त एक सूट, एक शर्ट, कॉलर, टाय, रया गेलेले बूट आणि फाटके मोजे एवढेच राहिले होते. शेवटच्या तंगीच्या क्षणी मोठा कोटही विकावा लागणार होता. त्याच्याकडे वीस फ्रँक्सची एक मोडकी पण महत्वाची बॅग होती. कारण हॉटेलच्या मालकाला वाटत होते, की ती कपड्यांनी भरलेली आहे ---

नाहीतर त्याने बोरिसला बहुधा हाकलूनच दिले असते. त्यात खरे काय होते तर पदके, फोटो, काही सटरफटर गोष्टी आणि प्रेमपत्रांचा मोठा गठ्ठा. असे सर्व असूनही बोरिसने स्वतःला अगदी नीटनेटके ठेवले होते. त्याने साबणाशिवाय दोन महिने जुन्या रेझरने दाढी केली होती. टाय बांधून, शर्टाची भोके लपवली होती आणि बुटांचे उडालेले तळवे वर्तमानपत्राने मढवले होते. शेवटी तो जेव्हा तयार झाला, तेव्हा त्याने शाईच्या बाटलीतून शाई काढून ती फासकटून, मोज्यांबाहेर दिसणारी घोट्याजवळील कातडी रंगवली. त्यामुळे तो अलीकडे काही दिवस सीन नदीच्या पुलाखालील धक्क्यावर झोपत असे, हे कळलेही नसते.

आम्ही रु ड्यू रीव्होली या हॉटेल व्यवस्थापक व तिथे काम करणारे लोक याना भेटायच्या प्रसिद्ध जागी गेलो. मागील बाजूस अंधारात एक गुहेसारखी खोली होती. तिथे सगळ्या प्रकारचे हॉटेल कामगार बसले होते. तडफदार तरुण वेटर्स, बाकीचे फार तडफदार नसलेले व भुकेलेले, जाडे गुलाबी स्वयंपाकी, तेलकट ताटल्या धुणारे, मार खाऊन सोलवटलेल्या म्हाताऱ्या बायका. प्रत्येकाच्या पुढ्यात एक कप काळी कॉफी ठेवलेली होती. खरे पाहता, ती जागा म्हणजे नवीन भरती करणारे मंडळ होते आणि कॉफीवर खर्च केलेला पैसा, म्हणजे मालकाचे कमिशन होते. कधीकधी एक धट्टाकट्टा व महत्वाचा दिसणारा माणूस, नक्कीच मालक येऊन बारच्या माणसाशी बोलणार होता. आणि तो हॉटेलच्या मागे बसलेल्या माणसाला बोलावणार होता. पण त्याने मला किंवा बोरिसला कधीच बोलावले नाही. दोन तासांनी आम्ही तेथून निघालो. अशी पद्धत होती, की एका पेयानंतर तुम्ही फक्त दोन तास बसू शकता. खूप उशीर झाला, तेव्हा आम्हाला नंतर समजले, की हे सगळे बारच्या माणसालाच देऊन चालले होते. त्याला वीस फ्रँक्स द्यायला परवडत असतील, त्याला तो कामावर ठेवत असे.

आम्ही हॉटेल स्क्राइबमध्ये गेलो. छत असलेल्या बाहेरील जागी एक तास थांबलो. आम्हाला आशा होती, की व्यवस्थापक बाहेर येईल. पण तो आला नाही. मग आम्ही परत रु ड्यू कॉमर्समध्ये गेलो. तिथे आम्हाला असे दिसले, की जे नवीन हॉटेल सजवले जाणार होते, ते बंद होते व मालक तिथे नव्हता.

आता रात्र झाली. आम्ही चौदा किलोमीटर चाललो आणि इतके दमलो, की आम्हाला दीड फ्रँक खर्च करून, मेट्रोने घरी जावे लागले. बोरिसचा दुखरा पाय घेऊन चालणे म्हणजे फारच दमछाक! जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसा त्याचा आशावाद मावळू लागला. मेट्रोमधून डील्टॅली येथे बाहेर पडल्यावर, तो फार दुःख करू लागला. तेव्हा आता गुन्हा करण्याशिवाय त्याच्या हातात काही राहिले नाही.

मी बोललो, "माझ्या मित्रा, उपाशी मरण्यापेक्षा, लवकर चोरी केलेली बरी. मी अनेक वेळा असा बेत केला. मॉन्टपार्नेसी वाटेवर एक जाड श्रीमंत अमेरिकन असतो --- एका अंधारी कोपऱ्यातून त्याच्यावर रस्त्यातील दगड मारायचा. धडाम! आणि मग त्याचे खिसे तपासायचे व जी काही रक्कम मिळेल, ती लंपास करायची. हे करणे शक्य आहे, असे तुला वाटत नाही का?"

"मी असे करणार नाही. जरा आठव. मी सैनिक होतो."

हा बेत आम्ही शेवटी रद्द केला कारण आम्ही दोघेही परदेशी होतो आणि सहज ओळखले गेलो असतो.

जेव्हा आम्ही माझ्या खोलीवर परत आलो, तेव्हा आम्ही परत दीड फ्रँक खर्च करून, पाव आणि चॉकलेट घेतले. बोरिसने त्याचा वाटा अधाशीपणे खाल्ला आणि जादू झाल्याप्रमाणे तो चांगला टुणटुणीत झाला,

जसे काही त्याने दारूच घेतली आहे. त्याने पेन्सिल बाहेर काढून कोण लोक आपल्याला नोकरी देऊ शकतील, याची यादी करायला सुरवात केली. तो म्हणाला, “असे बारा लोक आहेत. माझ्या मित्रा, उद्या आपल्याला काहीतरी सापडेल, असे मला आतून जाणवते आहे. शिवाय आपल्याला दोघांनाही डोके आहे --- डोके असलेला माणूस उपाशी मरणार नाही. मेंदूच्या आधारे मनुष्य काय काय करू शकेल! डोके वापरून कसेही पैसे मिळवता येतील. एकदा माझा एक मित्र होता. खरा हुशार! त्याने काय केले असे तुला वाटते?

त्याने सोन्याची अंगठी विकत घेतली व त्यावर पंधरा फ्रँक्स कर्ज काढले. तुला माहिती आहे, तो कारकून किती निष्काळजीपणे, रिसीटवर लिहितो. जिथे त्याने EN OR लिहिले होते, तिथे त्याने ETDIAMANTS ही अक्षरे वाढवून, म्हणजे अंगठी सोन्याची नसून हिऱ्याची आहे, असे दाखवले आणि पंधरा फ्रँक्सचे पंधरा हजार केले. मस्त, नाही का? मग तो त्या रिसीटवर, हजार फ्रँक्स कर्जाऊ घेऊ शकला. याला मी डोके म्हणतो.”

उरलेल्या संध्याकाळभर बोरिस आशावादी मनस्थितीत होता. आम्ही नाईस किंवा बिरीट्झ हॉटेलमध्ये एकत्र वेटरचे काम करत असू. आपल्याकडे छान खोल्या असतील आणि आपण लग्न करून बायका आणू शकू. परत तीन किलोमीटर चालून त्याच्या हॉटेलमध्ये जायला तो फारच दमला होता. त्यामुळे तो त्याच्या कोटात बूट गुंडाळून, त्याची उशी करून, माझ्या खोलीत जमिनीवर झोपला.

## VI

दुसऱ्या दिवशीदेखील आम्हाला काम सापडले नाही. तीन आठवड्यांनी आमचे भाग्य फळफळले. माझ्याकडील दोनशे फ्रँक्सने मला भाडे भरू दिले व पण बाकी सगळे जितके वाईट होणे शक्य होते तेवढे वाईट झाले. दोन दिवसांनी बोरिसने व मी सगळे पॅरीस पिंजून काढले. आम्ही गर्दीतून तासाला दोन मैल वेगाने, भुकेलेल्या व कंटाळलेल्या अवस्थेत चाललो, पण काम काही मिळाले नाही.

एक दिवस मला आठवले, की आम्ही सीन नदी अकरा वेळा ओलांडली. आम्ही तासनतास हॉटेलच्या मुख्य दाराबाहेर थांबलो. आणि जेव्हा व्यवस्थापक बाहेर आला, तेव्हा टोपी हातात घेऊन, त्याच्याकडे कामासाठी याचना केली. तेव्हा एकच उत्तर मिळाले, की त्यांना लंगडा वा अननुभवी मनुष्य नको आहे.

एकदा आम्हाला जवळजवळ काम मिळाले. आम्ही व्यवस्थापकाशी बोलतांना, बोरिस ताठ उभा राहिला होता. त्याने काठीचा आधार घेतला नव्हता. त्यामुळे व्यवस्थापकाला तो लंगडा असल्याचे कळले नाही. तो म्हणाला, “हो, आम्हाला तळघरात दोन माणसे हवी आहेत. कदाचित तुम्ही त्यासाठी योग्य असाल. आत या.” मग बोरीस चालू लागल्यावर व्यवस्थापक म्हणाला, “आहा, दुर्दैवाने तू तर लंगडतो आहेस --- “

आम्ही नोकरी मिळवून देणाऱ्या संस्थांमध्ये आमचे नाव नोंदवले. जाहिरातींना उत्तरे देऊ लागलो. पण सगळीकडे चालत जाणे फार हळू झाल्याने अर्ध्या तासाच्या फरकाने आमचे काम गेले. एकदा आम्हाला रेल्वेसाठी ट्रकमधील सामान बाहेर काढायचे काम मिळाले. पण शेवटच्या क्षणी एका फ्रेन्च माणसाला त्यांनी घेतले व आम्हाला ते काम दिले नाही. एकदा एका सर्कसमध्ये काही काम करण्यासाठीच्या जाहिरातीला आम्ही उत्तर

दिले. तिथे बाके हलवण्याचे व कचरा काढण्याचे व दोन टब वर उभे राहून दोन पायांमधून सिंहाला उडी मारून द्यायचे काम होते. पण आम्ही तिथे पोचलो, तेव्हा तिथे आधीच पन्नास माणसे रांगेत उभी होती. सिंहांमध्ये काही आकर्षण असावे.

एकदा बऱ्याच महिन्यांपूर्वी मी अर्ज केलेल्या एका कंपनीने मला तार पाठवली. त्यात त्यांनी मला एका इटालियन माणसाला इंग्लिश शिकवण्याबद्दल लिहिले होते. त्यात असे होते, “लगेच या.” त्यांनी तासाला वीस फ्रँक्स द्यायची तयारी दर्शवली. बोरिस आणि मी दुःखी झालो. इथे छान संधी होती आणि मी ती घेऊ शकत नव्हतो. कारण तिथे फाटका कोट घालून जाणे शक्य नव्हते. मग आम्हाला वाटले, मी बोरिसचा कोट घालून जाऊ शकतो. पण त्याचा रंग माझ्या पँटपेक्षा वेगळा होता. शिवाय त्याचा कोट मला फार घट्ट होत होता. मला तो बटणे न लावता व एक हात खिशात ठेऊन घालावा लागला असता. मी घाई केली व पंच्याहत्तर सेन्टीम्स खर्च करून, बसने गेलो. जेव्हा मी तिथे पोचलो, तेव्हा मला असे समजले, की त्या इटालियनने त्याचा विचार बदलला आणि पॅरीस सोडले.

एकदा बोरिसने सुचवले, की मी लेस हालेसला जाऊन हमालाच्या नोकरीसाठी प्रयत्न करावा. मी काम जोरात सुरु असतांना साडेचारला तिथे पोचलो. तिथे एक जाड, गोल टोपीतला माणूस हमालांना सूचना देत होता. मी त्याच्याकडे गेलो व कामासंबंधी विचारले. काही उत्तर न देता त्याने माझा उजव्या हाताचा तळवा हातात घेतला.

तो म्हणाला, “तू बळकट दिसतोस.

मी खोटे बोललो, “अगदी ताकदवान आहे.”

“मग मला ते खोके सहज उचलून दाखव.”

ते बटाट्यांनी भरलेले प्रचंड मोठे खोके होते. मी त्याकडे बघितले पण मला ते साधे हलवतादेखील येईना. तो मनुष्य माझ्याकडे बघत होता.

त्याने त्याचे खांदे उडवले आणि निघून गेला.

कधीकधी बोरिसची मनस्थिती आशादायक असेल, तर तो पन्नास सेंटीम्स स्टँपवर खर्च करून, त्याच्या पूर्वीच्या एखाद्या बायकोला पैसे मागत असे. त्यातील फक्त एकीने उत्तर दिले होते. ती त्याची बायको होतीच. पण त्याला दोनशे फ्रँक्स देणे लागत होती. जेव्हा त्याने ओळखीचे अक्षर असलेले पत्र पाहिले, तेव्हा त्याला खूपच आशा वाटू लागली. एखाद्या मुलाने काही गोड पदार्थ चोरून खावा, तसे आम्ही आम्ही बोरिसच्या खोलीत जाऊन ते पत्र वाचले. त्यात लिहिले होतेः माझ्या लहानशा लाडक्या लांडग्या, मी मोठ्या आनंदाने आपल्या प्रेमाची आठवण काढत, तुझे पत्र उघडले. एखाद्या सुगंधी फुलासारखी तुझ्या चुंबनांची आठवण माझ्या हृदयात घर करून आहे. दोनशे फ्रँक्स मी तुला परत करायची तुझी विनंती मी वाचली. अरेरे! पण ती पुरी करणे शक्य नाही. तुझी हलाखीची अवस्था ऐकून, मला फार भरून आले. पण तू तरी काय करणार? हे वाईट आहे, की आयुष्यात प्रत्येकावर अशी वेळ येते.

माझीही परिस्थिती काही बरी नाही. माझी लहान बहीण आजारी आहे. [ तिला बिचारीला खूप त्रास होतो आहे. ] डॉक्टरला द्यायलाही आमच्याजवळ पैसे नाहीत. आमच्याकडील सर्व पैसे संपले आहेत. आम्ही फार हलाखीत जगत आहोत. माझ्या लाडक्या लांडग्या, धीर धर. लक्षात ठेव वाईट दिवस काही सतत येत नसतात. केव्हां ना केव्हा हा त्रास संपेलच. बाकी सर्व ठीक. मी तुझी नेहमी आठवण काढते. माझी मनापासूनची मिठी आठव. कारण मी तुझ्यावर अजूनही प्रेम करते. तुझी, यव्होन

या पत्राने बोरिस नाराज झाला. तो सरळ झोपायलाच गेला. त्या दिवशी त्याने पुन्हा कामाची गोष्ट काढली नाही. माझे साठ फ्रँक्स पंधरा दिवस पुरले. आम्ही हॉटेलमध्ये जाण्याचे ढोंग करणे बंद केले. आम्ही माझ्या खोलीतच खात असू. एकजण पलंगावर बसे व दुसरा खुर्चीत. बोरिस त्याचे दोन फ्रँक्स देई आणि मी तीन किंवा चार. आम्ही पाव, बटाटे, दूध व चीज आणत असू. माझ्या स्पिरीटच्या दिव्यावर आम्ही सूप करत असू. आमच्याकडे एक कॉफीचा कप, एक चमचा व एक पॅन होते. रोज आमच्यात असे भांडण चाले की पॅनमधून कोण खाणार आणि कपातून कोण [ पॅन मोठे होते. ] बोरिस पहिल्यांदा येऊन पॅन घेत असे आणि मी माझा राग गिळे. काही वेळा संध्याकाळी आम्ही परत पाव आणत असू, तर कधी आणत नसू. आमचे कपडे खराब होऊ लागले होते. मी तीन आठवड्यात अंघोळ केली नव्हती. बोरिसने तर कैक महिन्यात अंघोळ केली नव्हती. तंबाखूमुळे सर्व सहन करणे शक्य होते. आमच्याकडे खूप तंबाखू होती. काही काळापूर्वी बोरिस एका सैनिकाकडे [त्यांना तंबाखू फुकट दिली जाते.] गेला आणि त्याच्याकडून त्याने पन्नास सेंटीम्सला एक याप्रमाणे वीस तीस पाकिटे आणली होती. हे माझ्यापेक्षा बोरिसला जास्त त्रासदायक होते. जमिनीवर झोपून, त्याची पाठ व पाय कायम दुखत असे. त्याच्या प्रचंड रशियन भुकेमुळे त्याला शारीरक व मानसिक वेदना होत असत. पण तरी तो कधी बारीक झाला नाही. साधारणपणे तो नवल वाटेल इतका आनंदी व आशावादी असे. तो गंभीरपणे म्हणे की त्याचा एक संत गुरु होता. तो गुरु त्याच्याकडे लक्ष ठेवत असे. जेव्हा परिस्थिती फारच वाईट होई, तेव्हा तो गटारात पैसे शोधे. तो म्हणे की एक संत नेहमी गटारात दोन फ्रँक्स फेकत असे. एक दिवस आम्ही रु रॉयलमध्ये थांबलो होतो. तेथून जवळ एक रशियन हॉटेल होते. आम्ही तिथे जाऊन, काही काम मिळते का ते पहाणार होतो.

अचानक बोरिसने मॅडेलीनला जायचे ठरवले आणि त्याच्या त्या संतासाठी, पन्नास सेंटीम्सची एक मेणबत्ती लावायचे ठरवले. मग बाहेर येऊन, तो म्हणाला की तो अगदी सुरक्षित असेल व त्याने अमर देवासाठी पूजा म्हणून एक पन्नास सेंटीम्सचा स्टँप प्रदान केला. बहुधा संत व देव यांनी एकत्रितपणे काम केले नाही. आम्हाला ते काम मिळाले नाही.

काही सकाळी बोरिस दुःखाने फारच कोलमडून पडे. तो शोक करत, ज्या ज्यूबरोबर रहात होता, त्याला शिव्या देत, अंथरुणात पडून राही. अलीकडे त्या ज्यूने बोरिसला दिवसाला दोन फ्रँक्स देणे बंद केले होते आणि सर्वात वाईट म्हणजे, त्याने बोरिसवर असह्य अधिकार गाजवायला सुरवात केली होती. तो म्हणे, "एका ज्यूच्या मर्जीवर जगणे याचा एका रशियन माणसाला काय त्रास होत असेल, हे तुला तू इंग्रज असल्याने कळणार नाही."

"अरे मित्रा, एक हट्टी ज्यू! आणि त्याला त्याबद्दल काही लाजही वाटत नाही. मी रशियन सैन्यातील कॅप्टन होतो, याचा तरी काही विचार! माझ्या मित्रा, मी तुला कधी सांगितले का, की मी सैबेरियन रायफलच्या दुसऱ्या तुकडीत कॅप्टन होतो? हो, कॅप्टन होतो. माझे वडील कर्नल होते. आणि इथे मी एका ज्यूच्या कृपेवर जगतो आहे. एका ज्यूच्या --- हे ज्यू कसे असतात, ते मी तुला सांगतो. एकदा युद्धाच्या सुरवातीच्या काळात, आम्ही पुढे कूच करतांना, रात्रीसाठी एका गावात थांबलो. एक भयंकर म्हातारा व ज्युडास इस्कराइटसारखी दाढी असणारा ज्यू हळूच माझ्या खोलीत आला. मी त्याला विचारले, की त्याला काय हवे आहे. तो म्हणाला, "महाशय, मी तुमच्यासाठी एक सुंदर, तरुण व फक्त सतरा वर्षांची मुलगी आणली आहे. तुम्ही मला फक्त पन्नास फ्रँक्स द्या. मी म्हणालो, "आभारी आहे. तू तिला परत घेऊन जा. मला कुठला रोग ओढवून घ्यायचा नाही. तो ज्यू ओरडला, "रोग?

मिस्टर कॅप्टन, तशी काही भीती नाही. ती माझीच मुलगी आहे! तर असे हे नमुनेदार ज्यू!

मित्रा, मी तुला कधी हे सांगितले का, की जुन्या रशियन सैन्यात एखाद्या ज्यूवर थुंकणे, त्याला बोल लावणे, हे वाईट समजले जाई. हो, आम्ही असे समजत असू, की ज्यूवर थुंकण्यासाठी रशियन ऑफिसरची थुंकी फारच मौल्यवान आहे. इत्यादी"

त्या दिवसांमध्ये बाहेर जायला बोरिस स्वतःला आजारी समजे. संध्याकाळपर्यंत तो जुने वर्तमानपत्र वाचत किंवा सिगरेट ओढत; करड्या ढेकणांनी भरलेल्या अंथरुणावर पडून राही. कधीकधी आम्ही बुद्धिबळ खेळत असू. आमच्याकडे पट नव्हता पण आम्ही एक कोऱ्या कागदावर खेळातील चाली टिपून ठेवत असू. नंतर आम्ही एका वस्तूच्या बांधीव जाड कागदाचा पट बनवला. आणि बटणांपासून व बेल्जियन नाण्यांपासून प्यादी व आणि सोंगट्या बनवल्या.

खूप रशियनांसारखेच बोरिसला बुद्धिबळ खूप आवडे. तो असे म्हणत असे, की प्रेमाचे/लढाईचे व बुद्धिबळाचे नियम सारखेच आहेत. जर तुम्ही एखाद्यावर विजय मिळवू शकलात, तर दुसऱ्यावरही मिळवू शकता. पण तो असेही म्हणाला, की तुमच्याकडे बुद्धिबळाचा पट असेल तर तुम्हाला भुकेचे काही वाटत नाही. पण माझ्या बाबतीत, हे खरे नव्हते.

## VII

आठ फ्रँक्स, चार फ्रँक्स, एक फ्रँक, पंचवीस सेंटीम्स --- असा माझा पैसा उडून गेला. पंचवीस सेंटीम्स हे तसे निरोपयोगी आहेत. कारण त्यात फक्त

वर्तमानपत्र विकत घेता येते. खूप दिवस आम्ही कोरड्या पावावर काढले आणि मग अडीच दिवस मला काहीच खायला मिळाले नाही. हा फार कुरूप अनुभव होता. काही लोक चांगल्या तब्येतीसाठी तीन आठवडे किंवा जास्त उपास करतात. ते म्हणतात की चौथ्या दिवसांनतर उपास सुखकारक वाटू लागतो. मला माहिती नाही. मी कधी तीन दिवसांपेक्षा जास्त उपास केला नाही. मला वाटते स्वतःहून उपास करणे व उपाशी असल्यामुळे उपासला सुरवात होणे, यात फरक असावा.

पहिल्या दिवशी, काम शोधायचा आळस केला. निळया माशीशी स्पर्धा करत, एक गळ विकत घेऊन, सीन नदीत मासे पकडायला गेलो. मला जेवणासाठी पुरेसे मासे मिळतील, असे वाटले होते, पण अर्थात तसे झाले नाही. सीन नदीत छोटे मासे खूप होते. पण पॅरीसच्च्या वेढ्यापासून, ते लबाड बनले होते. ते गळात नव्हे, ते फक्त जाळयात अडकत असत.

दुसऱ्या दिवशी मी माझा मोठा कोट विकून कर्ज काढायचे ठरवले. पण चालत जायला, ते दुकान फारच लांब होते. मग मी सर्व दिवस लोळत, शेरलॉक होम्स वाचण्यात काढला. त्या दिवशी मला काही खायला मिळाले नाही.

उपाशी राहून एखाद्याचा कणाच पार मोडून जातो, डोके चालेनासे होते. फ्लूनंतरसारखेच परिणाम दिसायला लागतात. जणू काही एखाद्याचे जेलीफिशमध्ये रुपांतर होते. जसे काही एखाद्याचे सर्व रक्त बाहेर काढून, त्याऐवजी कोमट पाणी भरले गेले आहे, अशी शक्ती गळून जाते. पूर्ण जडत्व, हीच माझी त्या काळातील मुख्य आठवण आहे.

भूक, जी वारंवार लागते, तेव्हा लाळ कोकिळेच्या थुकीसारखी फार पांढरी आणि चकचकीत असते. याचे कारण मला माहिती नाही. पण अनेक दिवस भुकेलेल्या माणसाने हे पाहिले असेल.

तिसऱ्या दिवशी सकाळी मला फार बरे वाटत होते. मला जाणवले, की मला ताबडतोब काही केले पाहिजे आणि मग मी बोरिसकडे जाऊन काही झाले तरी, त्याला त्याचे दोन फ्रँक्स माझ्याबरोबर एक दोन दिवसांकरता वाटून घ्यायला सांगायचे ठरवले. मी आलो तेव्हा बोरिस अंथरुणात होता आणि फार रागावलेला होता. मी आल्याबरोबर तो किंचाळला, "त्याने ते परत घेतले. हलकट चोर! त्याने ते परत घेतले."

मी विचारले, "कोणी काय घेतले?"

"तो ज्यू. त्याने माझे दोन फ्रँक्स परत घेतले. कुत्रा, चोर! मी झोपलेलो असतांना त्याने हे केले."

असे दिसत होते, की आदल्या दिवशी रात्री त्या ज्यूने दिवसाचे ठरलेले दोन फ्रँक्स द्यायला सरळ नकार दिला. त्या दोघांनी खूप वाद घातला. शेवटी तो ज्यू ते पैसे द्यायला तयार झाला व शेवटी ते दिले. फार चिडक्या पद्धतीने बोरिसने तो किती दयाळु आहे, याबद्दल तो फार ऋणी झाल्यासारखे भाषण दिले. सकाळी बोरिस बघतो, तो त्याचे पैसे ज्यूने चोरले होते.

हा चांगला धक्का होता. मी फार निराश झालो. मी भुकेलेला होतो. अशा वेळी ज्यूने चोरी करणे चूक होते. कारण माझे पोट अन्नाची अपेक्षा करत होते. पण आश्चर्य म्हणजे बोरिस निराश दिसत नव्हता. तो उठून बसला. त्याचा पाइप पेटवला आणि परिस्थितीचा आढावा घेतला.

बोरिस बोलला, "फक्त पंचवीस सेंटीम्स आहेत. आणि मला वाटत नाही की तो ज्यू मला ते दोन फ्रँक्स परत करेल. काही झाले तरी त्याचे वर्तन

असहनीय आहे. तुझा विश्वास बसेल का, की दुसऱ्या रात्री, मी इथे असतांना त्याने बेदरकारपणे एका बाईला इथे आणले. नीच पशू! आणि मला तुला सांगायलाही लाज वाटते, की त्या ज्यूला इथेच रंगढंग करायचे होते. त्याचे आठवड्याचे भाडे त्याच्या अंगावर होते. त्याला ते मला द्यायचे नव्हते. मला बुडवायचे होते. जर त्या ज्यूने माझे सामान बाहेर काढून अतिप्रसंग केला असता, तर मला छपराशिवाय रहावे लागले असते. त्याचा धिक्कार असो. आपल्याला चाणाक्षपणे काही करणे भाग आहे."

"ते ठीक आहे. पण आपण काय करू शकतो? मला वाटते, आपले कोट विकून आपण आपली भूक भागवू शकतो."

"अर्थात आपण ते करूच. पण माझे सामान तिथून बाहेर काढले पाहिजे. माझे फोटो चोरीला जातील. ठीक आहे. माझा बेत तयार आहे. मी त्या ज्यूचे बेत उधळून लावून त्याला हाणून पाडणार आहे. त्यालाच खोलीबाहेर हुसकायचे. जशास तसे! समजले का? मला वाटते, हेच बरे राहील. काय?"

"पण माझ्या प्रिय बोरिस, हे तू दिवसाढवळ्या कसे करू शकशील? तू पकडला जाशील."

"अर्थात त्यासाठी विचारपूर्वक बेत ठरवावा लागेल. तो ज्यू त्याचे भाडे चुकवून, पळून जायच्या विचारात असणार. त्याने पूर्वीदेखील असे केलेले आहे. तो आणि त्याची बायको, पाळीपाळीने कार्यालयात बसतात --- हे फ्रेन्च लोक किती चिक्कू आहेत! पण जर तू मदत केलीस तर, मी चोरावर मोर होणार आहे.

मी काही त्याला मदत करायच्या मनस्थितीत नव्हतो. पण मी त्याला त्याच्या बेताबद्दल विचारले. त्याने तो काळजीपूर्वक मला सांगितला.

“आता ऐक. आपण आपले कोट कर्जाऊ देऊन सुरवात केली पाहिजे. पहिल्यांदा तू तुझ्या खोलीवर परत जा आणि तुझा कोट घेऊन ये. इथून माझा घे. ते रु डेस बोर्गेईसच्या कर्जाच्या दुकानात घेऊन जा. नशीब चांगले असेल तर, तुला त्याचे वीस फ्रँक्स मिळतील. मग सीन नदीच्या काठावर जा. तुझे खिसे दगडांनी भर. ते दगड माझ्या बॅगेत भर. काय कल्पना आहे, ते तुला कळले का? मी जेवढे सामान वर्तमानपत्रात बांधता येईल, तेवढे बांधेन. मग त्या ज्यूकडे जाऊन, त्याला जवळील लॉन्ड्रीचा पत्ता विचारेन. मी फार कर्कशपणे पण शांतपणे हे करेन आणि त्याला वाटेल, की या साऱ्या बॅगा मळक्या कपड्यांनी भरलेल्या आहेत. किंवा त्याला संशय आलाच, तर तो नेहमी जे करतो, ते करेल. तो चिक्कू साप, माझ्या खोलीत जाईल आणि त्या बॅगा किती जड आहेत, ते बघेल. त्या जड लागतील, तेव्हा त्याला वाटेल त्या खूप भरलेल्या आहेत. काय कसा आहे बेत? मग मी परत येऊन माझे उरलेले सामान खिशात भरून आणेन.”

“पण बॅगांचे काय?”

“ओहो, खरेच की! आपल्याला त्या सोडून द्याव्या लागतील. त्याची किंमत फक्त वीस फ्रँक्स असेल. शिवाय त्याला धडा शिकवतांना, आपले थोडेफार नुकसान होणारच. नेपोलियनचे बेरेसिनल [बेलेरस मधील नदी] मधील उदाहरण बघ. त्याने त्याचे सर्व सैन्य गमावले.

बोरिस त्याच्या योजनेवर इतका खूश होता, की [तो त्या योजनेला शत्रूला फसवणे म्हणे.] तो भूक वगैरे सर्व विसरला. त्याचा मुख्य दोष --- या कारवाईनंतर, त्याला झोपायला कुठेच जागा नव्हती. पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केले.

पहिल्यांदा शत्रूला फसवायची कारवाई यशस्वी होत आहे, असे वाटले. मी घरी जाऊन, माझा कोट आणला. [ हे रिकाम्या पोटाने नऊ किलोमीटर चालणे झाले. ] आणि यशस्वीपणे बोरीसचा कोट बाहेर काढला. मग एक गडबड झाली. कर्जाच्या दुकानात, उबग येईल इतका कळकट, रागाचा पारा चढलेला व भोचक, लहानसा माणूस होता. पक्का फ्रेन्च होता. त्याने कोट घ्यायला ठाम नकार दिला, कारण ते कशात बांधून आणले नव्हते. यामुळे सगळे बिघडले. कारण आमच्याकडे खोके नव्हते. आणि आमच्याकडील फक्त पंचवीस सेंटीम्स होते व त्यात ते विकत घेणे शक्य नव्हते.

मी ही वाईट बातमी सांगायला बोरिसकडे गेलो. तो म्हणाला, “तो डुक्कर छाप!” त्यामुळे मला लाज वाटली. “ठीक आहे. नेहमी दुसरा काही मार्ग असतो. आपण ते कोट बॅगेत टाकू.”

“पण मग आपण त्या ज्यूला बॅग कशी देणार? तो कार्यालयाच्या दारातच बसला आहे. हे अशक्य आहे.”

“माझ्या मित्रा, तू किती पटकन निराश होतोस. मी वाचलेला इंग्लिश हट्टीपणा कुठे गेला? धैर्य! ते गोळा कर.” बोरिसने थोडा वेळ विचार केला

व नंतर अजून एक लबाडीचा बेत बनवला. मुख्य समस्या त्या ज्यू चे लक्ष पाच मिनिटे वळवणे, हे होते. तेवढ्या वेळात आम्ही त्याला चकवून

बॅग घेऊन निसटलो असतो. पण असे झाले, त्या ज्यूचा एकच कच्चा धागा होता --- त्याला खेळात रस होता. कुणी खेळावर बोलू लागले, तर तो खूप वेळ बोलत राही. बोरिसने सायकलच्या रेसविषयी जुन्या पेटीट पॅरीसिएनमध्ये एक लेख वाचला होता. त्याने जिन्यावर लक्ष ठेवले. तो खाली गेला व त्या ज्यूला बोलण्यात गुंगवून ठेवले. मध्यंतरीच्या काळात मी

जिन्याच्या तळाशी एका काखेत कोट घेऊन व दुसऱ्या हातात बॅग घेऊन, उभा राहिलो. योग्य वेळ येताच बोरिस, खोकणार होता. मी थरथरत थांबलो. कारण कुठल्याही क्षणी ज्यूची बायको कार्यालयासमोरील दारातून बाहेर आली असती आणि मग आमचा बोऱ्याच वाजला असता. तरीही आता बोरिस खोकला. मी कार्यालयावरून झटपट बाहेर पडून रस्त्यावर आलो. माझ्या बुटांचा आवाज न आल्याने, मी आनंदित झालो. बोरिस बारीक होता, म्हणून बचावलो. नाहीतर त्याच्या रुंद खांद्यांनी कार्यालयाचा रस्ता अडवला असता. त्याचे मज्जातंतू चांगले होते. तो सहजपणे इतक्या मोठ्याने हसत व बोलत राहिला, की मी केलेल्या गडबडीचा आवाज झाकला गेला. जेव्हा मी लांब गेलो, तेव्हा त्याने कोपऱ्याशी मला गाठले आणि आम्ही पसार झालो.

आणि मग आमच्या सर्व त्रासानंतर कर्ज देणाऱ्या दुकानातील माणसाने परत कोट विकत घेण्याचे नाकारले. तो मला म्हणाला [ या अशा लहानशा गोष्टीबाबत त्याचा फ्रेंच आत्मा मस्त मजेत नाचत होता.] की माझे ओळखपत्र पुरेसे नव्हते. ते बाद झाले होते व परत नव्याने काढले नव्हते. माझा पासपोर्ट देखील त्यांना बघायचा होता आणि रहायच्या पत्त्याचा पुरावाही. त्यामुळे कोट त्याच्या नावावर विकले जात नव्हते. आम्ही एकच करू शकत होतो, की माझ्या खोलीचा पत्ता देणे. त्याचे पुरावे सादर करणे आणि पोर्ट रॉयल रस्त्यावरील कर्जाच्या दुकानात कोट नेऊन देणे. मी बोरिसला माझ्या खोलीवर सोडले आणि कोट विकायला गेलो.

जेव्हा मी तिथे पोचलो, तेव्हा ते बंद दिसले. ते दुपारी चारच्या आत उघडणार नव्हते. आता दीड वाजला होता. मी बारा किलोमीटर चाललो होतो आणि सात तासात काही खाल्ले नव्हते. नशीब थट्टा करत असल्याचे दिसत होते.

नंतर एखादा चमत्कार झाल्याप्रमाणे नशीब बदलले. मी रु ब्रोका रस्त्याने घरी जात होतो, तेव्हा अचानक फुटपाथच्या दगडावर मला खात्रीपूर्वक पाच फ्रँक्स चकाकताना दिसले. मी त्यावर झडप घातली. घरी आलो. दुसरा पाव व एक पौंड बटाटे आणले. ते शिजवण्याइतकेच रॉकेल स्टोव्हमध्ये होते. मीठ नव्हते. आम्ही ते पशुंसारखे सालासकट गिळले. नंतर आम्हाला नवीन झाल्यासारखे वाटू लागले. मग कर्जाचे दुकान उघडेपर्यंत आम्ही बुद्धिबळ खेळत बसलो. चार वाजता मी त्या दुकानात गेलो. मला काही आशा वाटत नव्हती. कारण मला मागे फक्त सत्तर फ्रँक्स मिळाले होते. दोन पुठ्ठ्याच्या खोक्यातील गबाळया मळकट कोटांसाठी मी किती पैशांची अपेक्षा करू शकत होतो? बोरिसला वाटत होते वीस फ्रँक्स मिळतील, तर मला वाटत होते दहा किंवा पाच. किंवा त्याहून वाईट म्हणजे आधीच्या क्रमांक ८३ सारखे ते घेतलेच जाणार नाहीत. तेथील कारकून पाच फ्रँक्स म्हणेल, तेव्हा लोकांचे हसे दिसू नये म्हणून मी पुढील बाकावर बसलो होतो.

शेवटी कारकुनाने माझा क्रमांक पुकारलाः “क्रमांक ११७”

मी उभा राहून “हो” म्हणालो.

“पन्नास फ्रँक्स?”

मागील वेळी सतरा फ्रँक्स मिळाले होते त्यामुळे आता मला धक्काच बसला. मला वाटते माझ्याबरोबर त्याने दुसऱ्याचा क्रमांक मिसळला असावा. कारण दोन कोटांचे एवढे पैसे मिळणे शक्यच नव्हते. मी हात मागे बांधून घाईने माझ्या खोलीत गेलो. माझी पाठ काही बोलत नव्हती. बोरिस बुद्धिबळ खेळत होता. त्याने उत्सुकतेने वर पाहिले. तो उद्गारला, “किती मिळाले? काय वीस सुद्धा नाही? मग नक्की दहा मिळाले असतील. भिकार माणूस. अरे देवा,

पाच फ्रँक्स --- पण हे खरे नसावे. पाच फ्रँक्स मिळाले असे सांगू नकोस. तू तसे म्हणालास, तर मी खरोखर आत्महत्येचा विचार करू लागेन.”

मी पन्नास फ्रँक्सची नोट टेबलावर फेकली. बोरिस ती बघून पांढरा पडला. मग उडी मारत त्याने माझा हात हातात घेतला व इतक्या जोरात दाबला की माझी हाडे तुटायला आली. आम्ही बाहेर धावलो. पाव, मासाचा तुकडा आणि वाइन आणली. स्टोव्हवर मास भाजले आणि हादडले.

खाल्ल्यावर बोरिस मी कधीही पाहिला नव्हता, इतका जास्त आशावादी झाला. तो बोलला, “मी तुला काय म्हणालो होतो? नशीबाची लढाई! आज सकाळी फक्त पाच कवड्या आणि आता आपल्याकडे बघ. मी नेहमी म्हणतो, मिळवायला पैशांसारखे दुसरे सोपे काहीच नाही. त्यावरून मला आठवले, रु फॉन्डरीमध्ये माझा एक मित्र होता. आपण जाऊन त्याला भेटू शकतो. त्या चोराने मला चार हजार फ्रँक्सना फसवले होते. तो जेव्हा दारू प्यायलेला नसतो, तेव्हा तो पक्का चोर असतो. पण ही चौकस गोष्ट आहे, की तो जेव्हा प्यायलेला असतो, तेव्हा तो अगदी प्रामाणिक असतो. मला वाटते तो संध्याकाळी सहाला प्यायलेला असावा. आपण जाऊन त्याला शोधू. कदाचित तो शंभर फ्रँक्स परत करेल. अहा, कदाचित तो दोनशेदेखील परत करेल. चल जाऊया.“

आम्ही रु फॉन्डरीला गेलो. तिथे तो सापडला. तो प्यायलेला होता. पण आम्हाला शंभर फ्रँक्स मिळाले नाहीत. तो आणि बोरिस फुटपाथवर भेटल्यावर तिथे जोरजोरात वादावादी सुरु झाली. तो म्हणू लागला मी तुला एक पेनीदेखील देणे लागत नाही. तर बोरीसनेच त्याला चार हजार फ्रँक्स द्यायचे आहेत. दोघेहीजण माझे मत विचारू लागले. मला खरे काय ते माहिती नव्हते. दोघे भांड भांड भांडले. पहिल्यांदा रस्त्यात मग बिस्ट्रोमध्ये. मग

आम्ही प्रिक्स फिक्स हॉटेलात जेवायला गेलो तिथे व परत बिस्ट्रोमध्ये ते भांडले. शेवटी एका दुसऱ्या चोराला दोन तास बोलावून, ते दोघे पित सुटले आणि बोरीसकडील सगळे पैसे संपून गेले

बोरिस रात्री एका चांभाराच्या घरी झोपला. कॉमर्स क्वार्टरमध्ये रहाणारा तो चांभार पण रशियन निर्वासित होता. माझ्याकडे आठ फ्रँक्स व खूपशा सिगरेटी उरल्या होत्या. माझ्या डोळ्यांपुढे सारखे अन्न व पेये येत होती. दोन वाईट दिवसांनंतर तो खूप छान बदल होता.

## VIII

आता आमच्या हातात अठ्ठावीस फ्रँक्स होते. आम्ही परत एकदा काम शोधायला सुरवात करू शकत होतो. बोरिस अजून काही गूढ अटींवर चांभाराच्या घरी झोपला होता. अजून एका रशियन मित्राकडून वीस फ्रँक्स उसने घेण्यात तो यशस्वी झाला. त्याचे पॅरीसमधील इकडचे तिकडचे बरेचसे मित्र त्याच्यासारखेच नोकरी सोडलेले ऑफिसर्स होते. काहीजण वेटर्स तर काहीजण ताटल्या धुणारे होते. काहीजण टॅक्सी चालवत. काहीजण बायकोच्या जीवावर रहात. काहीजण रशियाहून पैसे आणण्यात यशस्वी झाले होते. त्यांची गॅरेजे वा नृत्य हॉल होते. सामान्यपणे पॅरीसमधील रशियन निर्वासित मेहनत करणारे लोक होते आणि ते तेथील त्यांच्यासारख्याच इंग्लिश लोकांपेक्षा खूपच चांगले होते. त्यांनी त्यांचे वाईट नशीब स्विकारले होते. अर्थात, काही अपवाद होते. बोरीस त्याला एकदा भेटलेल्या एका निर्वासित रशियन उमरावाबद्दल मला म्हणाला, की तो खूप महागड्या

हॉटेलांमध्ये जात असे. तो तिथे कुणी रशियन वेटर्स आहेत का ते शोधे आणि तो जेवल्यावर त्याना मैत्रीपूर्णतेने टेबलाजवळ बोलावत असे.

तो म्हणे, “आहा, म्हणजे तू माझ्यासारखा जुना सैनिक आहेस. हे वाईट दिवस आहेत. ठीक आहे. ठीक आहे. रशियन सैनिक कशाला भीत नाहीत. तू कुठल्या तुकडीत होतास?”

वेटर उत्तर देई, “अमुक तमुक तुकडीत.”

“फारच शूर तुकडी होती. मी १९१२ मध्ये त्यांचे परीक्षण केले होते. तसेही दुर्दैवाने माझी वही मी घरी ठेवली आहे. मला माहिती आहे, रशियन ऑफिसर मला तीनशे फ्रँक्स देणे लागत होता.

जर वेटरजवळ तीनशे फ्रँक्स असतील, तर तो ते देऊन टाकत असे.

आणि परत त्याला ते कधीच दिसत नसत. अशा तऱ्हेने उमरावाने

अनेकांना गंडा घातला. बहुधा वेटर्सना असे लुटले गेल्याचे काही वाटत नसे. जरी निर्वासित असला, तरी उमराव तो उमराव.

अशा एका निर्वासिताकडून, बोरिसला पैशांच्या देवघेवीबद्दल काही कळले. दोन दिवसांनी आम्ही कोट विकले. बोरिस मला थोडे गूढपणे म्हणाला,

“माझ्या मित्रा, मला सांग, तुला काही राजकीय मत आहे का?”

मी म्हणालो, “नाही.”

“मलाही नाही. अर्थात प्रत्येकजण नेहमी देशप्रेमी असतोच. पण तरी इजिप्शियन्सना बिघडवण्यासंबंधी मोझेस काही म्हणाला नव्हता का? तू इंग्लिश असल्यामुळे बायबल वाचले असशील. मला म्हणायचे आहे की कम्युनिस्टांकडून पैसे मिळवायला तुझा काही विरोध नसेल.”

“नाही, अर्थातच नाही.”

“छान. असे दिसते आहे की, पॅरीसमधील रशियन गुप्त सोसायटी आपल्यासाठी काही करू शकेल. खरे तर ते कम्युनिस्ट आहेत. ते बोल्शेविकचे दलाल आहेत. माझा मित्र त्यात सामील झाला आहे आणि आपण त्यांच्याकडे गेलो तर ते आपल्याला मदत करतील, असे त्याला वाटते.”

“पण ते आपल्यासाठी काय करणार? मी रशियन नसल्यामुळे, ते मला मदत करणार नाहीत.”

“तो मुद्दा आहे. असे वाटते, की ते मॉस्कोच्या वर्तमानपत्राला बातम्या पुरवतात आणि त्यांना इंग्लिश राजकारणावर लेख हवे आहेत. जर आपण लगेच त्यांच्याकडे गेलो, तर ते तुला ते काम देतील.”

“मी? पण मला राजकारणाबद्दल काही माहिती नाही.”

“अरे पण त्यांना तरी कुठे माहिती आहे? आणि कुणाला काय माहिती आहे? पण ते सोपे आहे. तुला ते इंग्लिश वर्तमानपत्रातून नुसते उचलायचे आहे. पॅरीसचे डेली मेल वर्तमानपत्र नाही का? त्यातून तू ते घे.”

“पण डेली मेल पारंपारिक, जुन्या वळणाचे वर्तमानपत्र आहे. त्यांना कम्युनिस्टांविषयी घृणा आहे.”

“ठीक आहे. मग डेली मेल म्हणते, त्याच्या विरुद्ध तू लिही. मग तू बरोबर ठरशील. आपण ही संधी सोडता कामा नये. माझ्या मित्रा, यातून तुला शेकडो फ्रँक्स मिळू शकतील.”

मला ती कल्पना आवडली नाही, कारण पॅरीसचे पोलीस कम्युनिस्टांच्या फारच विरुद्ध आहेत. विशेषतः परदेशी लोक. आणि मी आधीच संशयित आहे. काही महिन्यांपूर्वी, एका गुप्तहेराने मला आठवड्याला

निघणाऱ्या कम्युनिस्ट कार्यालयातून बाहेर पडतांना पाहिले होते. त्यावेळी पोलीसांचा मला फार त्रास झाला होता.

जर त्यांनी मला या गुप्त सोसायटीत जातांना पाहिले, तर ते मला हद्दपार करतील. तरीपण ही संधी हुकवणे, नको वाटते आहे. त्या संध्याकाळी वेटर असलेला बोरिसचा मित्र आमच्याकडे रेन्डेझवसमध्ये आला. मला रस्त्याचे नाव आठवत नाही --- सीन नदीच्या तीरापासून तो दक्षिणेला गेलेला असून, सरकारी कार्यालयाजवळील अत्यंत घाणेरडा रस्ता होता. बोरिसच्या मित्राने काळजीपूर्वक शिफारस केली. आम्ही सावधानतेने तिथे रेंगाळलो. आम्ही नीट बघत एका दाराने आत शिरलो --- ती एक लॉन्ड्री होती --- आणि परत बाहेर आलो. खिडक्यांकडे व हॉटेलांकडे आमचे लक्ष होते. जर ही जागा कम्युनिस्टांची भेटायची जागा असेल, तर तिच्यावर नजर ठेवली जात असणार. जर आम्हाला आसपास गुप्तहेरांसारखे कुणी दिसले, तर आम्ही सरळ घरी जाणार होतो. मी घाबरलो होतो. पण बोरीसला या गुप्त प्रकाराची मजा वाटत होती. तो त्याच्या पालकांना मारणाऱ्या या व्यापाऱ्याविषयी विसरला होता.

जेव्हा आमची खात्री झाली, की किनारा सुरक्षित आहे, तेव्हा आम्ही झटपट दाराशी आलो. लॉन्ड्रीत कडक इस्त्रीचे कपडे घातलेली एक फ्रेन्च बाई होती. तिने आम्हाला सांगितले, की अंगणातील जिन्याने वर गेल्यास, रशियन सभ्य गृहस्थ भेटेल. आम्ही खूप अंधारी जिने कसेबसे चढलो आणि वरती आलो. एक बळकट, धमकीवजा दिसणारा तरुण मनुष्य त्याच्या डोक्यावरील कमी केसांसकट तिथे उभा होता. मी वर आल्यावर तो माझ्याकडे संशयाने बघू लागला व हाताने माझी वाट अडवत, रशियनमध्ये काही बोलला. तो जोरात त्यांच्या गटाचा परवलीचा शब्द बोलला, “मोट द ऑर्डर”. मी काही

उत्तर दिले नाही. मी थांबलो. चकित झालो. मी अशा काही परवलीच्या शब्दांची अपेक्षा करत नव्हतो.

त्या रशियनने परत म्हटले, "मोट द ऑर्डर".

आमच्या मगून चालणाऱ्या बोरिसच्या मित्राने पुढे येऊन, रशियनमध्ये काही म्हटले. तो परवलीचा शब्द होता किंवा काही स्पष्टीकरण होते. यावर तो धमकीवजा दिसणारा तरुण समाधानी झाल्यासारखे वाटले. त्याने आम्हाला लहानशा, बर्फाचे कण खिडकीवर पडलेल्या, गबाळ्या खोलीत नेले. ते लेनिनचे ओबडधोबड चित्र असलेले व मोठी रशियन अक्षरे असलेले, प्रचारकी थाटाची पत्रके भिंतींना लावलेले, फार गरीब कार्यालय दिसत होते. टेबलाशी दाढी न केलेला एक रशियन त्याच्यासमोरील वर्तमानपत्रांच्या ढिगाच्या आवरणावर उत्तरे लिहित बसला होता. मी आत आल्यावर, तो वाईट उच्चार करत, माझ्याशी फ्रेन्चमध्ये बोलला.

तो नको इतक्या काळजीने उद्गारला, "तू तुझ्याकडे धुवायचे कपडे नसताना इथे का आला आहेस?"

"धुवायचे कपडे?"

"इथे येणारा प्रत्येकजण धुवायचे कपडे आणतो. ते जणू खालील लॉन्ड्रीत आल्यासारखे येतात. पुढच्या वेळी याल, तेव्हा बरोबर धुवायच्या कपड्यांचे मोठे बोचके घेऊन या. आम्हाला पोलीस आमच्या मागे लागायला नको आहेत."

हे माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त बेकायदेशीर व गुप्त प्रकारचे दिसत होते. एकच रिकामी खुर्ची होती. त्यात बोरिस बसला. रशियनमध्ये खूप बोलणे झाले. फक्त तो दाढी न केलेला व धमकीवजा दिसणारा माणूस बोलला. तो पुढे वाकून, संशय असल्यासारखा, माझ्याकडे बघत राहिला. अशा

क्रांतिकारक पत्रके लावलेल्या लहानशा गुप्त खोलीत मला एकही शब्द न समजणारे बोलणे ऐकत उभे रहाणे विचित्र होते. रशियन्स खांदे थरथरवत, हसत, पटपट व उत्सुकतेने बोलत होते. ते कशाबद्दल बोलत होते, याचे मला नवल वाटत होते. ते एकमेकांना ‘छोटे वडील’ म्हणत होते. आणि मी ‘छोटे कबुतर’ या रशियन कादंबरीतील ‘ इव्हान अलेक्झांड्रोव्हीट्च या पात्रांसारखा विचार केला आणि भाषण क्रांतीचे झाले. दाढी न केलेला माणूस ठामपणे सांगत होता, “आम्ही कधीच वाद घालत नाही. विरोधाभास, मतमतांतरे हे मध्यमवर्गाचे वेळ घालवणे आहे. कृत्ये हे आमचे वाद आहेत.” मग मला कळले, की ते रशियन गुप्त सोसायटीचे कार्यालय वगैरे काही नव्हतेच. नव्हते. वीस फ्रँक्स प्रवेश फी सरळ मागितली गेली आणि बोरिस ती द्यायला तयार होता. [जगात आमच्याकडे सतरा फ्रँक्स होते.] शेवटी बोरिसने आमचा पैशांचा अमूल्य खजिना उघडला आणि पाच फ्रँक्स दिले.

यावर धमकीवजा दिसणारा तरुण कमी संशयी दिसू लागला आणि टेबलाच्या कडेला बसला. दाढी न केलेला मला फ्रेन्चमधून प्रश्न विचारू लागला व माझी उत्तरे एका कागदावर लिहू लागला.

मी कम्युनिस्ट होतो का, असे त्याने विचारले. सहानुभूतीने मी उत्तरलो, मी कधीच कुठल्या संघटनेत गेलो नाही. मला इंग्लंडमधील राजकीय परिस्थिती समजत होती का? ओहो, अर्थात. मी विविध मंत्र्यांची नावे घेतली आणि उदारमतवादी पक्षासंबंधी काही शेरेबाजी केली. आणि मजेसाठी खेळल्या जाणाऱ्या खेळांचे काय? [ फुटबॉल आणि समाजवाद यांचे काही चमत्कारिक नाते असावे. ] ओहो, अर्थात, परत दोन्ही माणसांनी थंडपणे मान हलवली.

दाढी न केलेला म्हणाला, “खरेच, तुला इंग्लंडच्या परिस्थितीबद्दल इत्यंभूत माहिती आहे. मॉस्कोतील आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रात तू अनेक क्रमशः अनेक लेख लिहायची जबाबदारी घेशील का? मी तुला याबद्दलची माहिती देतो.”

“नक्कीच.”

“मग मित्रा, तुला आमच्याकडून उद्या काय ते पत्र येईल. किंवा

फार तर परवा. आमचा दर एका लेखासाठी एकशे पन्नास फ्रँक्स आहे. पुढच्या वेळी धुण्याच्या कपड्यांचा ढीग आणायला विसरू नकोस.”

“”मित्रा, अच्छा.” आम्ही खाली गेलो. काळजीपूर्वक लॉन्ड्रीबाहेर रस्त्यात कुणी दिसते आहे का, ते पाहिले आणि सटकलो. बोरिसला फारच आनंद झाला. तो जवळील तंबाखूच्या दुकानात शिरला आणि सिगरेटवर पन्नास सेन्टीम्स खर्च केले आणि काठी आपटत, आनंदी चेहऱ्याने बाहेर आला.

“माझ्या मित्रा, शेवटी आपले नशीब उघडले. तू त्याना पसंत पडलास. तुला त्यांनी मित्रा असे म्हटलेले तू ऐकलेस का? एका लेखासाठी एकशे पन्नास फ्रँक्स एवढा दर --- तू टोपण नावाने लिही. देवा रे, काय छान नशीब आहे! दुसऱ्या दिवशी पोस्टमन आला तेव्हा मी पत्र घेण्यासाठी, खाली बिस्ट्रोमध्ये धावलो. पण ते न आलेले बघून मी नाराज झालो. मी पुढच्या वेळेची वाट बघत, घरीच राहिलो. पण तेही आले नाही. जेव्हा तीन दिवस झाले आणि तरी मला रशियन गुप्त सोसायटीकडून काहीही पत्र आले नाही, तेव्हा मी आशा सोडून दिली. मी समजलो, की त्याना त्यांच्या कामासाठी दुसरा कोणी माणूस मिळाला आहे.

दहा दिवसांनी आम्ही पुन्हा तिथे गेलो. यावेळेस आम्ही कपड्यांचे

गाठोडे न्यायला विसरलो नाही आणि तिथे रशियन गुप्त सोसायटीचे कार्यालय नव्हतेच. लॉन्ड्रीतील बाई म्हणाली, की तिला काही माहिती नाही. ती फक्त बोलली ते काही दिवसांपूर्वी, भाड्याच्या कारणावरून जागा सोडून गेले. आमच्या कपड्यांच्या ढिगासकट तिथे उभे राहून आम्ही किती मूर्ख दिसत होतो!

पण त्यातल्या त्यात हे बरे झाले, की आम्ही त्यांना वीस फ्रँक्सऐवजी फक्त पाच फ्रँक्स दिले होते. त्यानंतर कधी आम्ही त्या सोसायटीबद्दल काही ऐकले नाही.

ते खरे कोण व काय होते, कुणालाच माहिती नव्हते. मला वाटते त्यांचा कम्युनिस्ट पक्षाशी काही संबंध नव्हता. मला वाटते ते फक्त पैसे लुबाडणारे होते. कुठल्यातरी काल्पनिक सोसायटीच्या नावावर प्रवेश फी उकळायची, हाच त्यांचा डाव असावा. ते तसे सुरक्षित होते. अजूनही कदाचित दुसऱ्या एखाद्या शहरात ते हा उद्योग करत असतील. पण त्यांचे कार्यालय बरोबर रशियन गुप्त सोसायटीसारखे दिसत होते. आणि कपड्यांच्या ढीग आणि लॉन्ड्री ही डोकेबाज कल्पना होती.

## IX

अजून तीन दिवस आम्ही कामाचा शोध जारी ठेवला. घरी येऊन आम्ही माझ्या झोपायच्या खोलीत, सूप आणि पाव असा अल्पसा आहार केला. आता दोन आशेचे किरण होते. एक म्हणजे, डी ला कोनकोर्डला हॉटेल एक्समध्ये काम मिळण्याची शक्यता असल्याबद्दल बोरिसने ऐकले होते आणि दुसरे म्हणजे, हॉटेल रु ड्यू कॉमर्सचा मालक शेवटी परत आला होता. आम्ही

दुपारी त्याला भेटायला गेलो. वाटेत बोरिस बोलत होता, की आपल्याला हे काम मिळाले, तर आपले नशीब उघडेल. त्यासाठी त्या मालकावर चांगला प्रभाव पाडायला हवा.

"माझ्या मित्रा, आपले दिसणे --- आपले व्यक्तिमत्व, हेच सर्व काही आहे. मी जेवायच्या वेळेपर्यंत हजार फ्रँक्स उसने आणतो. मला नवीन सूट आणायला हवा. आपल्याकडे पैसे असतांना मी कॉलर आणली नाही, हे केवढे दुर्दैव आहे! सकाळी मी माझी कॉलर उलटी केली. पण काही उपयोग नाही. कारण दोन्ही बाजू मळलेल्या आहेत. माझ्या मित्रा, मी भुकेलेला दिसतो आहे का?"

"तू अशक्त दिसतो आहेस."

"जाऊ दे. सूप आणि पावाने अजून काय दिसणार? मी भुकेलेला दिसणे साहजिक आहे. यामुळे लोकांना आपल्याला हाकलून द्यावेसे वाटते.

थांब."

तो एका सोनाराच्या दुकानाशी थांबला. खिडकीच्या काचेवर गाल घासून, त्याने तो लाल केला. त्यानंतर ती लाली उतरण्यापूर्वी, आम्ही घाईने हॉटेलात शिरलो आणि मालकाला भेटलो. तो एक जादा, बुटका, फ्लॅनेलचा सूट घातलेला व सेंटचा छान वास येणारा माणूस होता. बोरिसने मला सांगितले, की तो पूर्वी रशियन सैन्यात कर्नल होता. त्याची बायकोदेखील तिथे होती. ती भीतीदायक जाडी, पांढऱ्या चेहऱ्याची व शेंदरी ओठांची बाई होती. तिला बघून मला छोट्या वासराच्या मासाची व टोमॅटोंची आठवण झाली. मालकाने बोरिसला अभिवादन केले. ते रशियनमध्ये काही मिनिटे बोलले. मी मागे उभा राहून, माझ्या ताटल्या धुण्याच्या खोट्या अनुभवाविषयी काही बाता मारायचा विचार करत होतो.

मग मालक माझ्याकडे आला. मी थोडा अस्वस्थ झालो. पण तसे न दिसण्याचा आटोकाट प्रयत्न केला. बोरिसने मला सांगितले होते, की ताटल्या धुण्याचे काम हे अगदी हलक्या प्रतीचे काम आहे. मालकाने मला कस्पटासमान वागवण्याची माझी अपेक्षा होती. पण आश्चर्य म्हणजे त्याने उबदारपणे माझा हात त्याच्या हातात घेतला.

तो उद्गारला, "म्हणजे तू इंग्लिश आहेस तर! पण किती छान! मग तुला हे विचारायची गरज नाही की तुला गोल्फमध्ये गती आहे का?"

माझ्याकडून ती अपेक्षा असल्याचे दिसल्यावर, मी म्हणालो, नक्कीच."

"आयुष्यभर मला गोल्फ खेळायची इच्छा होती. कृपया तू मला काही महत्वाचे शॉट्स कसे मारायचे, ते दाखवशील का?"

ही रशियन व्यापाराची पद्धत असावी. मी गोल्फमधील काही बाबी त्याला स्पष्ट करायचा प्रयत्न केला. ते त्याने लक्ष देऊन ऐकून घेतले आणि अचानक मला सांगितले, की त्याने सगळे ऐकले आहे. जेव्हा हॉटेल उघडेल, तेव्हा बोरिस त्याचा मुख्य वेटर असणार होता आणि मी ताटल्या धुणारा. नंतर जर हॉटेल चांगले चालू लागले, तर मी शौचालयाचा मुख्य माणूस होण्याची शक्यता होती. मी विचारले, "हॉटेल कधी उघडणार होते? मालक म्हणाला, "आजपासून पंधरा दिवसांनी."

मोठ्या दिमाखात गरकन वळून, [ त्याला सिगरेटची राख झटकायची व त्याच वेळेस हात हलवायची देखणी दिसणारी सवय होती. ] "आजपासून पंधरा दिवसांनी, जेवायच्या वेळी." मग मोठ्या अभिमानाने त्याने आम्हाला हॉटेल दाखवले.

ती बार व जेवण हॉल असलेली लहानशी जागा होती. स्वयंपाकघर एखाद्या बाथरूमइतके होते. मालक त्याची मोठ्या विजयाच्या आवेशात देखणी वास्तू असल्यासारखी स्तुती करत होता. [ तो त्याला 'ले नॉर्मंड' म्हणत असे. तिथे पृष्ठभागावर प्रकाश पसरवणारा नकली कागद चिकटवला होता आणि असेच काही. ] आणि तो त्याला मध्ययुगीन मुलामा देण्यासाठी [ ऑबर्ग डे जेहान कोटार्ड ] खानावळ म्हणत होता. त्याने एक पत्रक छापून घेतले होते. त्यात इतर गोष्टीबरोबर तिथे एके काळी हॉटेलच्या जागी चार्लेमगन [रोमन साम्राज्याचा पहिला राजा ] येत जात असलेली खानावळ होती, असे लिहिले होते. हे सांगून मालक फार खूश झालेला दिसला. सलोनच्या एका चित्रकाराकडून, त्याने बारमध्ये उत्तान चित्रे काढून घेतली होती. मग त्याने आम्हाला प्रत्येकी एक महागडी सिगरेट दिली. अजून काही वेळ बोलून, तो घरी गेला. मला नक्की असे वाटत होते, की आमची डाळ इथे शिजणार नाही. मालकाने माझ्याकडे मी त्याला फसवत असल्यासारखे पाहिले आणि त्याहून वाईट फसवणूक म्हणजे मी मागील दारी मालकाकडून पैसे वसूल करायला आलेले घेणेकरी पाहिले. पण बोरिसला वेटर्सचा मुख्य नेमल्यामुळे तो खूश झाला.

"आपण फत्ते केली. आता फक्त पंधरा दिवसांचा प्रश्न आहे. पंधरा दिवस कसेही जातील. आता मला काही पर्वा नाही. फक्त तीन आठवड्यात मी एखादी बाई ठेवेन. मला नवल वाटते, ती गोरी असेल की काळी? ती फार बारीक नसेल तर मग सर्व काही ठीक असेल."

पुढील दोन दिवस वाईट गेले. आमच्याकडे फक्त साठ सेंटीम्स उरले होते. ते आम्ही अर्धा पौंड पाव आणि त्यावर चोळायला लसूण आणण्यात खर्च केले. लसूण आणण्याचे कारण म्हणजे ती चव जिभेवर रेंगाळत रहाते

आणि आपण नुकतेच काही खाल्ले असल्यासारखे वाटते. दिवसातील बहुतेक वेळ आम्ही जार्डीन डेस प्लँटेसमध्ये बसून काढला. बोरिस पाळीव डुकरांवर दगड मारत बसला होता. पण ते सगळे नेम चुकत होते. त्यानंतर आम्ही पाकीटांच्या मागील बाजूस जेवणातील पदार्थांची यादी लिहिली. अन्नाशिवाय कसला विचार करायला आम्ही फारच भुकेलेले होतो. बोरिसने त्याच्यासाठी निवडलेले जेवण, मला आठवले. डझनभर ऑयस्टर्स, बोर्च सूप [वर क्रीम असलेले बीटचे लाल, गोड सूप ] क्रेफिश, कोंबडीच्या पिल्लाची डिश, प्लमबरोबर मंद आचेवर शिजवलेले गाईचे मास, किडनीचे पुडिंग, नवीन बटाटे , कोशिंबीर आणि जुन्या लिटरभर ब्रँडीबरोबर रोक्र्युफोर्ट चीज, हे बोरिसने निवडलेले जेवण होते. बोरिसला जेवणातील देशोदेशीच्या चवी माहिती होत्या. नंतर आम्ही श्रीमंत झालो, तेव्हा प्रसंगापरत्वे मी त्याला असे मोठे जेवण सहज घेतांना बघितले.

जेव्हा आमचे पैसे संपत आले, तेव्हा मी काम शोधणे थांबवले आणि अजून एक दिवस न खाता गेला. ऑबर्ग डे जेहान कोटार्ड हे हॉटेल कधी सुरु होईल, यावर माझा विश्वास नव्हता. पण इतर काही मार्ग दिसत नव्हता. मी आळशीपणे अंथरुणात झोपून होतो आणि अचानक नशीब बदलले. रात्री दहा वाजता, मला रस्त्यावरून एक उत्सुक आरडाओरडा ऐकू आला. मी उठून खिडकीशी गेलो. तिथे बोरिस होता. तो त्याची काठी हलवत होता त्याचे डोळे चमकत होते. काही बोलण्यापूर्वी तो वाकला व खिशातून पाव काढून माझ्याकडे फेकला.

“माझ्या मित्रा, माझ्या प्रिय मित्रा, आपण वाचलो! तुला काय वाटते?”

“नक्कीच तुला काम मिळाले नसणार.”

डी ला कोनकोर्डच्या जवळ हॉटेल एक्समध्ये पाचशे फ्रँक्स महिना पगार व जेवणावर मला आजपासून काम मिळाले आहे. मी येशूचे नाव घेतो. मी काय व किती खाल्ले!"

दहा बारा तास काम करून, त्याच्या दुखऱ्या पायासकट माझ्या हॉटेलपर्यंत तीन किलोमीटर चालायचा व मला छान बातमी द्यायचा त्याचा पहिल्यांदा विचार होता. त्याने मला दुसऱ्या दिवशी हॉटेल ट्यूलेरीसमध्ये त्याच्या जेवायच्या सुट्टीत भेटायला सांगितले. कदाचित तो माझ्यासाठी काही अन्न चोरू शकला असता.

त्या ठरलेल्या वेळी मी बोरिसला एका सार्वजनिक जागी भेटलो.

त्याने त्याचा कोट काढून, मोठे वर्तमानपत्राचे पुडके मला दिले. त्यात बारीक तुकडे केलेले कोवळ्या वासराचे तुकडे, पिवळसर मऊ चीजचे तुकडे, पाव आणि एक इक्लेअर चॉकलेट गुंडाळलेले होते.

बोरिस बोलला, "अरे मित्रा, एवढे मी तुझ्यासाठी आणू शकलो. दारवान लबाड डुक्कर आहे."

वर्तमानपत्रातील पदार्थ विशेषतः ट्यूलेरीसमध्ये जिथे खूप सुंदर मुली वावरत असतात, अशा सार्वजनिक ठिकाणी बसून खाणे ठीक नव्हते. पण अशी पर्वा करण्यासाठी मी फारच भुकेलेला होतो. मी खातांना बोरिसने स्पष्ट केले, की तो स्वतःचे खाणे गिऱ्हाईकांनी स्वतः घ्यायच्या छोट्या इंग्लिश खोलीत काम करत होता --- ती सर्वात कमी पगाराची जागा होती. पण ऑबर्ग डे जेहान गोटार्ड उघडेपर्यंत हे काम ठीक होते. पळवून आणू शकेल तेवढे अन्न माझ्यासाठी आणत असे. तीन दिवस मी चोरलेल्या अन्नावर जगलो. मग आमचा सर्व त्रास संपला. कारण एका ताटल्या धुणाऱ्याने काम सोडले. बोरिसच्या शिफारसीमुळे, मला तिथे काम मिळाले.

**X**

हॉटेल एक्स ही मोठी, प्रशस्त जागा होती. त्याचा दर्शनी भाग एकदम छान होता. एका बाजूला लहानसा अंधारी, उंदराच्या बिळासारखे, सेवा देण्याचे दार होते. मी सकाळी पावणेसातला तिथे आलो. तेलकट पँट घातलेल्या लोकांची तिथे गर्दी होती. एकेकाला लहानशा खोलीत बसलेला दारवान तपासून आत सोडत होता. मी थांबलो. तेवढ्यात मुख्य व्यवस्थापक, तिथे आला व मला प्रश्न विचारू लागला. तो गोल, फिक्या चेहऱ्याचा, कामामुळे वरवर ओबडधोबड दिसणारा, इटालियन होता. त्याने मला विचारले की मला ताटल्या धुवायचा अनुभव आहे का आणि मी हो म्हणालो. त्याने माझ्या हातांकडे नजर टाकली. त्याला समजले, की मी खोटे बोलतो आहे. पण मी इंग्लिश असल्याचे ऐकल्यावर, त्याचा आवाज नरम झाला व त्याने मला कामावर ठेवले.

तो म्हणाला, “आम्ही कोणाला तरी आमच्या इंग्लिशचे प्रयोग करून बघण्यासाठी शोधत होतो. आमची सर्व गिऱ्हाईके अमेरिकन्स असतात आणि आम्हाला फक्त एवढेच इंग्लिश माहिती असते की --- “ लंडनच्या भिंतींवर लहान मुले लिहितात, तसे काही त्याने म्हणून दाखवले. “तू आम्हाला उपयोगी आहेस. खाली ये.”

त्याने मला गोल जिन्याने जमिनीखालील अरुंद पॅसेजमध्ये खाली नेले. तिथे मला बऱ्याच ठिकाणी वाकूनच जावे लागले. ती अंधारी जागा असून तिथे फार उकडत होते. तिथे एकमेकांपासून खूप अंतरावर असलेले फक्त मिणमिणते पिवळे दिवे होते. तिथे खूपच अंधारी वेडेवाकडे पॅसेज होते.

खरे तर मला वाटते, ते सर्व मिळून शेकडो यार्ड असावेत. ते बघून मला लोकांसाठी असलेल्या जहाजाच्या खालील डेकची आठवण झाली. तिथेही असाच उकाडा, वेडीवाकडी मोकळी जागा, गरम वाफाळलेले अन्न आणि गुणगुणल्यासारखा इंजिनांचा आवाज असे. [तो स्वयंपाकघरातील भट्टीचा असावा.] जाता जाता आम्ही काही दारांच्या आतून कधीकधी शपथांचे आवाज ऐकले, तर कधी आगीच्या लाल ज्वाळा पाहिल्या. एकदा बर्फाच्या खोलीतून गार वाऱ्याची झुळूक अनुभवली. आम्ही चालतच होतो. माझ्या पाठीला जोराने काही धडकले. तो निळया अ‍ॅप्रनमधील माणूस ओढून नेत असलेला शंभर पौंडाचा बर्फ होता. त्यानंतर त्याच्या खांद्यावर मोठ्या मासाचे वजन घेऊन येणारा एक मुलगा आला. त्याचे ओलसर मऊ गाल चेपटले गेले होते. 'बाजूला व्हा, धावा, मूर्खांनो' असे ओरडणाऱ्या त्यांनी मला बाजूला ढकलले व ते पुढे सटकले. एका दिव्याखाली भिंतीवर, कोणीतरी मोठ्या चांगल्या अक्षरात लिहिले होते, 'लवकरच हिवाळ्यात तुम्हाला निरभ्र आकाश सापडेल.' नंतर डोक्यावर वेट्रेसची टोपी घातलेली एक बाई दिसली. ती एक विचित्र जागा होती.

एका पॅसेजमध्ये दूरवर एक लॉन्ड्री दिसत होती. तिथे एका म्हाताऱ्या, सांगाड्यासारख्या चेहऱ्याच्या बाईने मला निळा अ‍ॅप्रन दिला आणि ताटल्या पुसायच्या फडक्यांची चळत दिली. मग मुख्य व्यवस्थापकाने मला एका जमिनीखालील लहानशा गुहेत नेले --- ते तळघराखालील तळघर होते. तिथे सिंक आणि वाफा येणारे ओव्हन होते. माझ्यासाठी ते इतके बुटके होते, की मला ताठ उभेही रहाता येत नव्हते. तापमान बहुधा ११० डिग्री फॅरनहाईट होते. मुख्य व्यवस्थापकाने स्पष्ट केले, की हॉटेलमधील वरील खोलीत कामगार लोकांसाठी जेवण आणणे, त्यांच्या खोल्या साफ करणे आणि काचेची भांडी धुणे, हे माझे काम असणार होते. जेव्हा तो गेला, एका

इटालियन वेटरने त्याचा भीती वाटेल असे, त्याचे पुसट दिसणारे डोके माझ्याकडे बघत दारातून आत घातले.

तो म्हणाला, “तू इंग्लिश आहेस का? ठीक आहे. मी येथील मुख्य वेटर आहे. जर तू चांगले काम केलेस, तर --- “ त्याने बाटलीचे वरील झाकण उघडले व आवाज करत, आतील पेय पिऊ लागला. “जर तू नीट काम केले नाहीस तर मात्र --- “ त्याने दाराच्या कडेला जोराने खूप लाथा मारल्या. “माझ्यासाठी तुझी मान मुरगळणे, जमिनीवर थुंकण्यापेक्षा काही जास्त नाही. जर काही त्रास उद्भवला, तर ते तुझ्यावर नव्हे, तर माझ्यावर विश्वास ठेवतील. त्यामुळे काळजी घे.”

त्यानंतर मी घाईने कामाला सुरवात केली. मधला एक तास सोडला, तर मी सकाळी सात वाजल्यापासून रात्री पावणेनऊपर्यंत काम करत होतो. पहिल्यांदा काचेची भांडी धुतली. मग टेबले व कामगारांच्या जेवायच्या खोलीची फरशी घासघासून धुऊन काढली. मग काचा व सुऱ्या चकचकीत केल्या. मग जेवणे नेऊन दिली. मग परत काचेची भांडी धुतली. मग अजून जेवणे नेऊन दिली व अजून काचेची भांडी धुतली. हे सोपे काम होते. ते मला सहज जमले. पण जेव्हा मी स्वयंपाकघरात जेवण आणण्याकरता गेलो, तेव्हा मला दिसलेल्या स्वयंपाकघराची मी कल्पनाही करू शकत नव्हतो. असे स्वयंपाकघर मी कधीच पाहिले नव्हते. इतके कोंदट, की श्वास घेणे मुश्कील व्हावे असे, अगदीच कमी उंचीच्या तळघरात असलेले व मोठी आग पेटून, लाल झालेले, मोठ्या प्रार्थनांच्या आवाजाने एखाद्याला बहिरे करेल असे, भांड्यांच्या सतत होणाऱ्या गोंगाटाने भरलेले असे होते. तिथे इतकी उष्णता होती, की स्टोव्ह सोडून, बाकी सर्व धातूची भांडी कपड्याने झाकून ठेवली होती. त्यांच्या डोक्यावर पांढऱ्या टोप्या असूनही त्यांच्या चेहऱ्यावरून घाम गळत होता.

त्याभोवती काऊंटर्स होते व त्यावर ट्रे घेतलेल्या वेटर्सची व ताटल्या उचलून धुणाऱ्या पोऱ्यांची गर्दी होती. कंबरेपर्यंत उघडे असलेली माणसे चुलीचा जाळ ढवळत होती व तांब्याची भली मोठी पातेली स्वच्छ करत होती. प्रत्येकजण घाईत व रागात दिसत होता. गुळगुळीत कातडीचा शेंदरी रंगाचा, मोठ्या मिशांचा, मुख्य स्वयंपाकी मध्ये उभा राहून, खर्जातील आवाजात ओरडत होता, “शनिवार आहे. छान फोडलेले अंडे! शनिवार आहे. उकळलेला व सॉसमध्ये बुडवलेला गाईच्या मासाचा तुकडा आणि तळलेले खारे बटाटे. फक्त मध्ये मध्ये तो पोऱ्याच्या अंगावर ओरडे. तिथे तीन काऊंटर्स होते. मी पहिल्यांदा तिथे गेलो, तेव्हा मी नकळत, चुकीचा ट्रे घेतला. मुख्य स्वयंपाकी माझ्याकडे आला. त्याच्या मिशा पिरगळल्या आणि मला वरपासून खालपर्यंत पाहिले. “तू ते पाहिलेस का? हल्ली अशी माणसे ते आमच्याकडे पाठवतात. मूर्खा, तू कुठून आला आहेस? मला वाटते, चार्लेंटनहून. [ तिथे मोठे वेड्यांचे आश्रयस्थान आहे.]

मी म्हणालो, “इंग्लंडहून.”

“हे मला कदाचित माहिती होते. ठीक आहे. माझ्या प्रिय माणसा, तू इंग्लंडशी संबंधित असलास, तरी मी सांगू शकतो, की तू वेश्येचा मुलगा असणार. आणि आता दुसऱ्या काऊंटरकडे जा. तू तिथे जाणे अपेक्षित आहे.”

मी स्वयंपाकघरात जेवढे वेळा गेलो, तेव्हा माझ्या हातून नेहमी चूक झाली आणि माझे अशा प्रकारे स्वागत झाले. मी काम समजून घेणे अपेक्षित होते आणि त्यामुळे मला शिव्या बसत होत्या. मला एका दिवसात किती वेळा भडव्या म्हटले गेले, हे मी चौकस बुद्धीने मोजले आणि ते एकोणचाळीस वेळा भरले.

साडेचारला इटालीयनने मला सांगितले, मी आता काम थांबवू

शकतो, पण बाहेर जायचे नाही, कारण पाचला आपण परत काम सुरु करतो आहोत. मी सिगरेट ओढण्यासाठी शौचालयात गेलो. सिगरेट ओढायला बंदी होती. बोरिसने मला बजावले होते, की त्यासाठी फक्त शौचालय हीच सुरक्षित जागा आहे. त्यानंतर मी पावणेनऊपर्यंत काम केले. तेव्हा वेटरने दारात डोके घालून मला सांगितले, की आता बाकीची भांडी राहू देत. आश्चर्य म्हणजे दिवसभर मला डुक्कर, मॅकेरेल म्हटल्यावर, तो अचानक मित्रत्वाने वागू लागला. मला समजले, की मला बसणाऱ्या शिव्या, या तात्पुरत्या असतात.

वेटर म्हणाला, "तू आत ये. तू कुठल्याही परिस्थितीला तोंड देऊ शकतोस. तू काम चांगले करतोस. ये व जेव. हॉटेल आपल्याला प्रत्येकाला दोन लिटर वाइन देते. मी अजून एक बाटली चोरली आहे. आपल्याला छान दारू मिळाली आहे."

मोठ्या कामगार लोकांनी उरवलेले मस्त जेवण आम्हाला मिळाले. वेटर मऊसूत झाला होता. त्याने मला त्याच्या प्रेमप्रकरणांच्या गोष्टी सांगितल्या व त्याने इटलीतील दोन माणसांना कसे भोसकले, ते सांगितले. तो अमेरिकन सैन्यातील नोकरीत कसा इकडेतिकडे फिरला, हे देखील सांगितले. त्याला समजून घेतल्यावर तो एक चांगला माणूस असल्याचे मला जाणवले. त्याने मला कशी कुणास ठाऊक, पण बेनव्हेन्यूटो सेलेनी [इटालियन शिल्पकार] याची आठवण करून दिली. मी दमलो होतो व घामाने डवरलो होतो. पण दिवसाच्या भरपेट जेवणानंतर, माझी एका नवीन माणसाशी ओळख झाली होती. मला काम अवघड वाटत नव्हते. मला हे काम करणे मानवेल, असे दिसत होते. पण ते चालू राहील, की नाही हे नक्की नव्हते. कारण मी एक दिवसाकरता जादा म्हणून, पंचवीस फ्रँक्स वर घेतला गेलो होतो. कुजक्या चेहऱ्याचा दारवानाने पैसे मोजले. तो म्हणाला त्यातील

त्यातील पन्नास सेन्टीम्स विम्यासाठी [ हे खोटे असल्याचे मला नंतर समजले.] काटले गेल्याचे तो म्हणाला. मग तो पॅसेजमध्ये गेला. माझा कोट मला घ्यायला लावला आणि काळजीपूर्वक मला चोरलेल्या अन्नासाठी, सगळीकडून तपासले. यानंतर मुख्य व्यवस्थापक आला. व माझ्याशी बोलला. वेटरप्रमाणेच मी काम करायला तयार असल्याचे बघून, तो जास्त आनंदी झाला. तो म्हणाला, "तुला आवडत असेल, तर आम्ही तुला कायम स्वरूपाची नोकरी देऊ शकतो."

मुख्य वेटर म्हणाला, की त्याला इंग्लिश लोकांना हाक मारायला मजा येते. तू महिन्याभरासाठी काम करायला तयार असलास, तर इथे सही करशील का?"

इथे शेवटी मला काम मिळाले. आणि मी ते आनंदाने घेतले. मग मला पंधरा दिवसात उघडणारे रशियन हॉटेल आठवले. त्यामुळे इथे एक महिना काम करण्याचे ठरवणे बरोबर नव्हते. किंवा मध्येच सोडून जाणेही बरोबर नव्हते. मी म्हटले मला इतर ठिकाणी काम मिळायची शक्यता आहे --- मला पंधरा दिवस काम मिळू शकेल का? पण त्यावर मुख्य व्यवस्थापकाने खांदे उडवले व म्हणाला, हॉटेलमध्ये कुणाला एक महिन्यापेक्षा कमी कालावधीची नोकरी दिली जात नाही. त्यामुळे माझी ही नोकरी गेली. आमचे ठरल्याप्रमाणे, बोरिस माझ्यासाठी रु डे रीव्होलीमध्ये थांबला होता. जेव्हा मी त्याला काय झाले ते सांगितले, तेव्हा तो चिडला. मी त्याला ओळखतो तेव्हापासून पहिल्यांदाच, मला मूर्ख म्हणून चिडताना पाहिले.

"मूर्ख! शतमूर्ख! मी तुला काम मिळावे म्हणून केलेले प्रयत्न तू अशा तऱ्हेने काम मिळाल्यावर पुढच्याच क्षणी फुकट घालवले आहेस. दुसऱ्या

कामाची शक्यता बोलून स्वतःचा मूर्खपणा दाखवायची काय गरज होती? तू फक्त महिनाभर काम करण्याची तयारी दर्शवायला हवी होतीस.''

मी हरकत घेत म्हणालो, ''पण दुसरे काम मिळण्याची शक्यता असल्याचे सांगून मी प्रामाणिकपणा दाखवलेला आहे.''

''प्रामाणिकपणा! वा! वा! प्रामाणिकपणा! ताटल्या विसळणारे कुणी प्रामाणिक असल्याचे तू कधी ऐकले आहेस का? माझ्या मित्रा --- त्याने माझे बकोट पकडले व कळकळीने म्हणाला, तू इथे दिवसभर राबला आहेस. तुला हॉटेलमधले काम कसे असते, ते कळले आहे. तुला असे वाटले का ताटल्या धुणाऱ्याला काही मानपान परवडतो?

''नाही, कदाचित नाही.''

''मग लगेच परत जा आणि त्या व्यवस्थापकाला सांग की तू महिनाभरासाठी हे काम घ्यायला तयार आहेस. त्याला सांग, की दुसरे काम आले, तर मी ते नाकारेन. मग जेव्हा ते हॉटेल उघडेल, तेव्हा आपण त्यांना फक्त नाही म्हणायचे.''

''पण मी माझ्या ठरलेल्या कामाचे वचन कसे काय मोडू?''

बोरिसने त्याची काठी आपटली व अशा मूर्खपणावर ओरडून म्हणाला, ''त्यांना दिवसाचा पगार द्यायला सांग. मग तुझे काही पैसे बुडणार नाहीत. तुला असे वाटते का, की ताटल्या धुणाऱ्याला ते करार मोडल्याबद्दल कोर्टात खेचतील? त्यासाठी ते फारच दर्जाहीन पद आहे.''

मी घाईने परत गेलो. त्या व्यवस्थापकाला गाठले आणि सांगितले, की मी महिनाभर काम करायला तयार आहे. मग त्याने माझी त्या करारवर सही घेतली. हा माझ्या ताटल्या धुण्याच्या कामाच्या नीतिमत्तेतील पहिला धडा होता.

नंतर माझ्या लक्षात आले, की अशा मोठ्या हॉटेलसाठी असे हो नाही करणे, किती मूर्खपणाचे होते. अशी मोठी हॉटेले त्यांच्या कामगारांना दया दाखवत नाहीत. जशी कामाची गरज असेल, तसे ते लोकांना घेतात किंवा काढून टाकतात. आणि जेव्हा गर्दीचा ऋतू संपतो, तेव्हा ते दहा किंवा जास्त टक्के कामगारांना काढून टाकतात. अगदी थोड्या कालावधी पुरते सांगून, काम सोडणाऱ्यांच्या जागी ते लगेच दुसऱ्याची नेमणूक करतात. कारण पॅरीसमध्ये हॉटेलात काम करायला उत्सुक असणाऱ्यांची पण ते न मिळणाऱ्यांची काही वानवा नाही.

## XI

असे झाले, की मी माझे वचन मोडले नाही, कारण दीड महिना झाला तरी ऑबर्ग डे जेहान कोटार्ड उघडण्याचे काही चिन्ह दिसेना. मध्यंतरीच्या काळात मी हॉटेल एक्स मध्ये काम करत होतो. आठवड्यातील चार दिवस ग्राहकांना सेवा पुरवण्याचा हॉलमध्ये, एक दिवस चौथ्या मजल्यावरील वेटरला मदत करणे आणि एक दिवस जेवायची खोली धुणाऱ्या बाईऐवजी काम करणे. माझा सुट्टीचा दिवस नशीबाने, रविवार होता. पण कोणी आजारी असेल, तर मला त्या दिवशीही काम करावे लागे. कामाचे तास सकाळी सात ते दुपारी दोनपर्यंत व मग संध्याकाळी पाच ते नऊ असे --- अकरा तास असत. पण मी जेव्हा जेवायची खोली धुवे, तेव्हा ते चौदा तास भरत. पॅरीसमधील ताटल्या धुणाऱ्यांच्या प्रमाणकाला अनुसरून, हे फारच कमी तास होते. आयुष्याचा वाईट भाग एवढाच होता, की भयंकर उकाड्यात काम करावे लागे व तळघरातील कशाही वेडेवाकड्या ओबडधोबड रस्त्यांनी

चालावे लागे. पण हे हॉटेल मोठे व शिस्तीचे असल्याने, हे आरामशीर समजले जाई.

आमचा ग्राहकांना सेवा पुरवण्याचा वीस बाय सात फुटाचा व आठ फुट उंचीचा हॉल, धुक्यामुळे अंधारी असे. तिथे गरम कॉफीची व पाव कापणाऱ्यांची इतकी गर्दी असे, की कशाला तरी धक्का दिल्याशिवाय चालणे अशक्य होते. तिथे फक्त एक मिणमिणता विजेचा दिवा होता आणि चार पाच गॅसचे दिवे होते, ज्यातून भयानक लाल ज्वाळा बाहेर पडत. तिथे तापमापक होते आणि त्यातील तापमानाचा आकडा कधीच ११० अंशाच्या खाली जात नसे. तो दिवसाचा काही वेळ ११० अंश फॅरनहाईट असे. दिवसाभरात तो केव्हाकेव्हा दिवसभरात जवळजवळ १३० वर जाई. एकीकडे एवढे जास्त तापमान तर दुसरीकडे ज्यात आम्ही दूध व लोणी ठेवत असू, ते गार कपाट व सेवा पुरवणाऱ्या पाच लिफ्ट होत्या. जेव्हा तुम्ही गार कपाटाशी जाता तेव्हा तापमान एका झटक्यात, शंभर अंशांनी कमी झालेले दिसते. हे बघून मला ग्रीनलंडच्या बर्फाळ डोंगरांची आणि भारताच्या समुद्रातील शंखशिंपल्यांची व चुनखडीच्या थरांची आठवण येते. बोरीस आणि मी सोडून हॉलमध्ये ग्राहकांना सेवा पुरवण्याचे काम करणारे दोघेजण होते. त्यातील एक धिप्पाड इटालियन पोलीसासारखा दिसणारा मारिओ होता --- तर दुसरा केसाळ, गावढळ प्राणी होता. त्याला आम्ही मग्यार म्हणत असू. आम्ही सगळे धिप्पाड होतो आणि गर्दीच्या वेळी सतत एकमेकांवर आदळत असू.

ग्राहकांना सेवा पुरवण्याच्या हॉलमधील काम वेगवेगळया स्वरूपाचे असे. आम्ही आळशीपणा कधीच करत नसू. पण कधीकधी दोन तास इतके प्रचंड गर्दीचे येत, की आम्ही त्यांना 'बंदुकीचा ठो ठो' म्हणत असू. पहिला 'बंदुकीचा ठो ठो' वरील पाहुणे जागे होऊन खाली येत व न्याहारीची मागणी

करत. तेव्हा सकाळी आठ वाजता येई. तेव्हा तळघरात भांड्यांचा खणखणाट व आरडाओरडा सुरु होई. सगळीकडील घंटा वाजू लागत. निळे ॲप्रन घातलेले कामगार पॅसेजमधून लगबगीने इकडेतिकडे जाऊ लागत. पदार्थांची सेवा पुरवणाऱ्या लिफ्ट आवाज करत खाली येत आणि पाचही मजल्यावरील वेटर्स वरखाली करतांना, इटालियन प्रार्थना म्हणू लागत. आमची सगळी कामे मला आठवत नाहीत. पण चहा, कॉफी, चॉकलेट करणे, स्वयंपाकघरातून जेवण आणणे, तळघरातून वाइन व फळे आणणे, पाव कापणे, टोस्ट करणे, लोण्याची पाकिटे बनवणे, जॅम मोजणे, दुधाचे कॅन ओतणे, साखरेचे ढिगारे मोजणे, अंडी उकडणे, पुडिंग शिजवणे, बर्फ फोडणे, कॉफी दळणे --- हे सर्व शंभर दोनशे गिऱ्हाईकांसाठी करणे. स्वयंपाकघर तीस यार्ड लांब होते आणि जेवणघर साठ / सत्तर यार्ड. सगळे काही सेवा पुरवणाऱ्या लिफ्टमधून पाठवले जाई. ते सर्व झाकायचे असे. ते झाकताना काळजी घ्यावी लागे. साखरेचा एखादा चमचा जरी सांडला, तरी त्रास होई. याशिवाय इथे काम करणाऱ्यांना कॉफी व पाव द्यावा लागे. त्यांच्यासाठी वरती जेवण पाठवावे लागे. हे काहीच्या काहीच मोठे खटले होते व गुंतागुंतीचे काम होते.

मी हिशेब केला त्यावरून येथील प्रत्येकाचे दिवसाचे चालणे व धावणे एकंदर मिळून पंधरा मैल होत असेल. तरीही कामाचा ताण शारीरिकपेक्षा मानसिक जास्त होता. वरवर बघता जरी स्वयंपाकघरातील कामे फारशी डोक्याची नसली तरी काहीही सोपे नव्हते. पण एखादा घाईत असेल तर ते आश्चर्यकारक रीत्या कठीण होते. अनेक कामे करतांना प्रत्येकाला इकडेतिकडे फारच धावपळ करावी लागे. हे ठराविक वेळात पत्ते वाटण्यासारखे होते. समजा, तुम्ही टोस्ट करत आहात आणि तेव्हाच चहाची, तीन वेगळ्या प्रकारच्या जामची मागणी करत लिफ्ट मोठ्या आवाजाबरोबर खाली येते. दुसरी लिफ्ट अंड्याचे तुकडे, कॉफी आणि ग्रेपफ्रुटची मागणी करत खाली

येते, तेव्हा तुम्ही अंड्यासाठी स्वयंपाक घरात जाता व फळांसाठी जेवणघरात जाता. तेव्हाच इकडे टोस्ट जळतो. विजेच्या चपळाईने केले, तरच सगळी कामे व्यवस्थित होतात. हे फक्त एक उदाहरण म्हणून सांगितले. अशी हजारो कामे एकाच वेळी अंगावर पडत असतात. त्याच वेळेस एक वेटर सोडावॉटरची एक बाटली हरवली म्हणून तुमच्या मागे लागलेला असतो. आणि तुम्ही त्याच्याशी वाद घालत असता. यासाठी तुम्हाला वाटते, त्यापेक्षा जास्त अक्कल लागते. मारियो म्हणाला ते बरोबर आहे की ग्राहकांना सेवा पुरवण्याच्या हॉलमध्ये विश्वासू नोकर बनण्यासाठी एक वर्ष लागते.

आठ आणि साडेदहा यामधील वेळ म्हणजे अस्वस्थतेचा काळ असे. कधीकधी आम्ही असे समजत असू, की आमच्याकडे जगण्याची फक्त पाच मिनिटे उरली आहेत. कधीकधी सर्व मागणी संपलेली असे आणि सर्वत्र शांतता भरून राही. मग आम्ही फरशीवरील केर काढून, वाइनचे, कॉफीचे किंवा पाण्याचे, कसलेही बुधले --- जोपर्यंत त्यात काही द्रावण आहे --- रिकामे करत असू. खूप वेळा आम्ही बर्फाचे ढीग फोडत असू आणि काम करतांना ते पित असू. शेगड्यांची आग मळमळ वाढवत असे. त्यामुळे आम्ही काही गार सतत पित असू. काही वेळाने आमचे ॲप्रनही घामाने ओले झालेले असत. कधीकधी आम्ही कामात निराशादायक रीत्या मागे पडत असू. मग काही गिऱ्हाईके न्याहारी न करताच चालू पडत. पण मारिओ आम्हाला नेहमी चपळपणे काम करायला लावे. त्याने चौदा वर्षे ग्राहकांना सेवा पुरवण्याच्या हॉलमध्ये काम केले होते. त्याच्याकडे असे कसब होते, की दोन कामांमध्ये एक सेकंदही फुकट जात नसे. मग्यार फार मूर्ख होता आणि मला अनुभव नव्हता. त्याचा पाय थोडासा लंगडा असल्याने व थोडेसे त्याला वेटरचे काम केल्यानंतर ग्राहकांना सेवा पुरवण्याच्या हॉलमध्ये काम करायला लाज वाटे म्हणून, बोरिसचा कल काम टाळण्याकडे होता. पण मारिओ नवलपूर्ण होता.

एकाच वेळी तो एका हाताने तो कॉफीचे भांडे भरे, तर दुसऱ्या हाताने अंडे उकडे. त्याच वेळी तो टोस्ट भाजला गेला आहे का, यावर लक्ष ठेवे आणि मग्यारला सूचना देई. त्यातच त्याचे रिगोलेट्टोच्या दृष्यांमधील गाणी म्हणणे सुरु असे. हे सर्व स्तुती करण्यासारखे होते.

मालकाला त्याची किंमत माहिती होती. आमच्या सर्वांचा पगार पाचशे होता, पण त्याला महिना हजार फ्रँक्स पगार होता.

साडेदहा वाजता न्याहारीच्या गोंधळाची वेळ संपे. मग आम्ही तेथील टेबले व जमीन घासून स्वच्छ करत असू. ब्रासच्या वस्तूंना चमक आणत असू. सकाळच्या वेळात संधी घेऊन शौचालयात जाऊन मी सिगरेट ओढत असे. हा आमचा थोडा फुरसतीचा वेळ असे ---फक्त त्यामानाने फुरसतीचा! कारण आम्हाला जेवणासाठी फक्त दहा मिनिटे असत. आणि त्यातही नेहमी काही ना काही अडथळा येई. गिऱ्हाईकांची जेवणाची वेळ बारा ते दोन असे. ती पण न्याहारीच्या वेळेसारखीच खूप गडबडीची असे. आमचे जास्त काम म्हणजे स्वयंपाक घरातून जेवण आणण्याचे असे. म्हणजे स्वयंपाक्यांकडून सतत ओरडा खाण्याचे असे. एव्हाना चार पाच तास भट्टीसमोर काम करून ते घामेजून जात. त्यामुळे त्यांचा पारा चढलेला असे.

दोन वाजता आम्ही अचानक रिकामे होत असू. आम्ही ॲप्रन फेकून कोट घालत असू. दारातून घाईने बाहेर पडून, जेव्हा आमच्याकडे पैसे असत, तेव्हा जवळील बिस्ट्रोमध्ये जात असू. उष्ण अशा तळघरातून रस्त्यावर येणे विचित्र वाटत असे.

आर्टिक्टमधील उन्हाळ्यासारखी हवा खूपच स्वच्छ व थंड वाटत असे. घाम आणि अन्न यांच्या उग्र दर्पानंतर पेट्रोलचा छान वास येई. कधीकधी आम्हाला बिस्ट्रोमध्ये आमचे स्वयंपाकी व वेटर्स भेटत. ते

मित्रत्वाने आम्हाला पेय पाजत. आतमध्ये आम्ही गुलाम असू पण आता बाहेर आल्यावर सर्वजण सारख्या दर्जाचे असण्याची, हॉटेलच्या आयुष्याची पद्धत होती. आमची भांडणेही होत, पण त्याचे कुणी फारसे मनावर घेत नसे.

पावणेपाच वाजता, आम्ही परत कामावर जात असू. साडेसहापर्यंत कुणी विशेष गिऱ्हाईके नसत. हा वेळ आम्ही चांदीची भांडी चकचकीत करण्यात, कॉफीच्या किटल्या स्वच्छ करण्यात आणि इतर काही किरकोळ कामे करण्यात, घालवत असू. मग दिवसातील सर्वात मोठी घाईची वेळ सुरु होई. --- तेव्हा मला वाटे मी थोडा वेळ शांत व्हावे व त्या जेवणाच्या वेळेचे वर्णन करावे. ती परिस्थिती अवघड एवढ्यासाठी होती, की शंभर दोनशे माणसे प्रत्येकी पाच सहा कोर्सचे, वेगळ्या प्रकारचे जेवण मागवत असत आणि पन्नास साठ लोकांना ते शिजवावे लागे व वाढावे लागे आणि नंतरचा राडा आवरावा लागे. ज्याला हा अनुभव आहे, तोच याचा अर्थ सांगू शकेल. यावेळी जेव्हा काम दुप्पट असे, तेव्हा सगळे कामगार थकून जात. त्यातील बरेचसे प्यायलेले असत. या दृष्याची खरी कल्पना न देता, मी पानेच्या पाने भरून वर्णन करू शकतो. अरुंद पॅसेजेसमधून धावणे, धक्के बसणे, किंकाळ्या, अंधार, सोडवायला वेळ नसलेली भांडणे व भयंकर मारामाऱ्या --- यापलीकडील सगळा प्रकार चालू असे. तळघरात पहिल्यांदा येणारे कोणी अशी कल्पना करेल, की तो आक्रमकपणा दाखवणाऱ्यांच्या गुहेत आला आहे. जेव्हा नंतर मला हॉटेलचे काम कसे चालते ते कळले, तेव्हा मला या सर्व गडबडगोंधळामागील शिस्त लक्षात आली.

साडेआठ वाजता अचानक काम थांबे. पण नऊपर्यंत आम्ही मोकळे होत नसू. पण आम्ही जमिनीवर अडवारत असू. पाय पसरून त्यांना विश्रांती देत असू. पेय आणण्यासाठी गार कपाटाशी जाणेही नको वाटत असे.

कधीकधी मुख्य व्यवस्थापक बिअरच्या बाटल्या घेऊन येई. जेव्हा फारच कामाचा दिवस असे, तेव्हा आम्हाला हॉटेलकडून, जादा बिअर मिळे. आम्हाला देण्यात येणारे अन्न खाण्यासारखे असे, एवढेच. पण पेयांच्या बाबतीत मालक कंजूस नव्हता. त्याला माहिती असले, की ताटल्या विसळणाऱ्याला असे दिले जात नाही, तरी तो आम्हाला प्रत्येकाला दोन लिटर वाइन देऊ करत असे. बाटल्यांच्या तळाशी उरलेली दारूही आम्हाला मिळत असे. त्यामुळे आमची प्यायची चंगळ होती. जेव्हा कामगार थोडेसे प्यायलेले असत, तेव्हा ते जास्त तडफदारपणे काम करत.

आठवड्यातील चार दिवस असे जात. उरलेल्या इतर दोन दिवसांपैकी एक चांगला असे तर दुसरा वाईट. आठवडाभर असे काम केल्यावर एक दिवस सुट्टीची गरज भासे. ती शनिवार रात्र असल्याने, आमच्या बिस्ट्रोमधील लोक पिण्यात दंग असत. आणि पुढचा दिवस सुट्टीचा असल्याने, मी त्यांच्यात मिसळायला तयार असे. आम्ही भरपूर पिऊन झोपायला जायला पहाटेचे दोन वाजत. म्हणजे रविवारी दुपारपर्यंत आमची झोप चाले. साडेपाचला मला अचानक जाग आली. हॉटेलातून पाठवलेला रात्रीचा वॉचमन माझ्या अंथरुणाशेजारी उभा होता. त्याने मला हलवले. तो म्हणाला, “उठ! तुझी चांगली झोप झाली आहे. फार मनावर घेऊ नकोस. हॉटेलमध्ये माणसे कमी आहेत. आज तुला आता काम सुरु करावे लागेल.”

मी बचाव करत म्हटले, “मी का काम करावे? आज माझा सुट्टीचा दिवस आहे.”

“सुट्टीचा दिवस? असे काही नाही. काम करायचे आहे. उठ.”

मी उठून बाहेर पडलो. मला माझी पाठ मोडल्यासारखे वाटत होते. अर्धवट जळून, विझत आलेले कोळसे माझ्या डोक्यात भरले आहेत, असे

मला वाटत होते. मी दिवसभर काम करू शकेन, असे मला वाटत नव्हते. पण तरीही तासाभराने मला तळघरात असे वाटले, की मी ठीक आहे. तळघरातील उकाड्यात, टर्कीश अंघोळीसारखे, एखादा कितीही पेय पिऊ शकेल. ताटल्या धुणाऱ्यांना हे माहिती असते आणि ते त्यावर अवलंबून असतात. अनेक क्वार्ट्स पिणे आणि त्यामुळे काही अपाय होण्याच्या आत ती घामाद्वारे बाहेर काढणे, ही त्यांच्या जीवनाची भरपाई असते.

## XII

हॉटेलमध्ये माझा सर्वात चांगला वेळ तेव्हा जातो, जेव्हा मी चौथ्या मजल्यावरील वेटर्सना मदत करायला जातो. आम्ही एका लहानशा स्वयंपाकघरात काम करतो आणि सेवा करण्याच्या लिफ्टने ग्राहकांना सेवा पुरवण्याचा हॉलशी संधान बांधून असतो. इथे तळघरापेक्षा खूपच थंड असते आणि मुख्य काम चांदीची भांडी आणि काचेचे पेले चकचकीत करण्याचे असते. हे माणसावर दया दाखवणारे काम आहे. व्हँलेन्टी नावाचा वेटर खूप व्यवस्थित होता. आम्ही फक्त दोघेच असतांना तो मला बरोबरीने वागवत असे. पण तिथे इतर कुणी असेल तर त्याला माझ्याशी फटकून वागावे लागे. कारण वेटरने एखाद्या ताटल्या धुणाऱ्याशी मित्रत्वाने वागावे, अशी पद्धत नव्हती.

जेव्हा त्याचा चांगला दिवस असे, तेव्हा तो त्याला मिळालेल्या भरपूर टीपमधील पाच फ्रँक्स मला देत असे. तो चोवीस वर्षांचा तरुण होता. पण अठराचा दिसत असे आणि इतर वेटर्सप्रमाणे तो नीटनेटका रहात असे. त्याला कसे कपडे घालावेत, याची चांगली जाण होती. त्याच्या काळ्या कोटात व

पांढऱ्या टायमध्ये, ताज्या टवटवीत चेहऱ्यामध्ये, मुलायम चॉकलेटी केसांमध्ये, तो अगदी इटॉन [दिसायला चांगला आणि श्रीमंत] मुलासारखा दिसे. तो बारा वर्षांचा असल्यापासून स्वतः पैसे मिळवून जगत होता, अगदी तळागाळातून वर आला होता. पासपोर्ट नसतांना इटालीची सीमा पार करून, उत्तर रस्त्यावरील बोळात कठीण कवचाची फळे विकून आणि परवानगीशिवाय लंडनमध्ये विक्रीव्यवसाय केल्याबद्दल, पन्नास दिवस तुरुंगवास भोगून तो आला होता. हॉटेलातील एका वयस्क बाईने त्याला हिऱ्याची अंगठी भेट दिली, तो तिच्यावर प्रेम करू लागला आणि नंतर तिने अशी आवई उठवली, की त्याने ती चोरली. असे विविध प्रकारचे अनुभव त्याच्याकडे होते. रिकामा वेळ असेल, तर लिफ्टशेजारील जागेत सिगरेट ओढत, त्याच्याशी बोलायला मला आवडे.

जेवणाची खोली धुवायचे काम माझ्यासाठी वाईट असे. स्वयंपाकघरातील ताटल्या धुण्याचे काम माझे नसे. पण इतर काचसामान, चांदीची भांडी, पेले इत्यादी धुण्याचे काम माझे असे. ते तेरा तासांचे काम होते. आणि दिवसाभरात मी निदान तीस चाळीस फडकी धूत असे. मी फ्रान्समधील जुनी पद्धत त्यासाठी वापरत असे. ताटल्या ठेवायला मांडण नसे. धुवायला साबणाचे तुकडे नसत, तर छान वासाचा मऊ साबण असे. त्याने काही फेस येत नसे व पॅरीसच्या कठिण पाण्यात भांडी स्वच्छ निघत नसत. मी लहानशा, घाणेरड्या जागी काम करत असे. तिथे छोटे स्वयंपाकघर व मोरी एकत्र होते आणि शेजारी जेवणघर होते. ताटल्या धुण्याव्यतिरिक्त मला वेटर्स लोकांचे जेवण आणावे लागे. त्यातील बहुतेकजण, असहनीय रीत्या उद्धट होते. मला माझ्या मुठीचा उपयोग करून, सर्वसाधारण नम्रपणा व सौहार्द दाखवावे लागे. सहसा धुणारी व्यक्ती ही बाई असे आणि ते तिचे आयुष्य चमत्कारिक करून टाकत.

घाणेरड्या लहानशा स्वयंपाकघर व मोरी एकत्र असलेल्या जागी आजूबाजूला बघणे हे मन रिझवणारे होते. या व जेवणघराच्यामध्ये फक्त एक दुहेरी दार होते. तिथे सुंदर, एकही डाग नसलेल्या टेबलाच्या आच्छादनावर फुलदाण्या ठेवलेल्या असत व भिंतीवर आरसे व महागाईच्या शोभेच्या वस्तू लटकवलेल्या असत. पुरातन ख्रिश्चन धर्मातील रंगीत चित्रेही लावलेली असत आणि इथे काही फूट अंतरावर, आम्ही अत्यंत घाणीत रहात असू. ती खरेच फार घाणेरडी जागा होती. तेथील जमीन धुवायला संध्याकाळपर्यंत वाव मिळत नसे. आम्ही लेटयुसची पाने, साबणाचे पाणी, कागदांचे तुकडे आणि सांडलेले अन्न, यातून नागमोडी वाट काढत चालत असू. कोट काढलेले, त्यांच्या घामांनी भरलेल्या काखा दाखवत फिरणारे, डझनभर वेटर्स टेबलावर बसून कोशिंबीर कालवत असत. क्रीममध्ये त्यांचे अंगठे बुडालेले असत. अन्न आणि घाम यांचा एकत्र असा घाणेरडा वास खोलीभर दरवळत असे. कपाटात काचेच्या सामानाच्या मागे, वेटर्सनी चोरलेल्या अन्नाचे फार घाण वास येणारे ढीग पडलेले असत.

तिथे फक्त दोन सिंक्स होती. हात धुवायचे बेसिन नव्हते. जिथे भांडी स्वच्छ केली जात, तिथेच वेटर्स त्यांचा चेहरा धूत असत. गिऱ्हाईकांना हे काही दिसत नसे. जेवणघराबाहेर एक आरसा आणि चटई होती. तिथे वेटर्स त्यांचे केस नीट करत असत व स्वतःचे नीटनेटके प्रतिबिंब बघत असत.

वेटरला जेवणघरात जातांना बघणे, हे खास दृष्य असे. तो ते दार उघडून बाहेर पडल्यावर त्याच्यामध्ये अचानक बदल घडून येई. त्याचे खांदे झुकत. क्षणार्धात, घाई, चिडचिड व घाणेरडेपणा निघून जाई. तो एखाद्या धर्मगुरूच्या थाटात, गालीच्यावरून तरंगत जाई. मैत्रे डी हॉटेल मधील मदतनीस असलेला आमचा सहकारी, हा भयानक इटालियन, डोक्यावर

त्याची बंद मूठ हलवत आणि ओरडत दारात उभा राहून, वाइनची बाटली फोडणाऱ्या सहाय्यकाला चांगले सुनवायला थांबलेला मला आठवते. [नशीबाने दारातून आवाज बाहेर जात नसे. ]

"तू हे काय करतो आहेस? आणि अरे मूर्ख तरुणा, तू स्वतःला वेटर म्हणवतोस? भडव्या, वेश्यागृहातील तुझ्या आईची फरशी पुसायची देखील तुझी लायकी नाही."

तो दाराकडे वळला. टॉम जोन्समधील पाश्चिमात्य जमीनदार करेल तसा एक शेवटचा अपमान करत, त्याच्या शेवटच्या शिव्या देत, त्याने दार उघडले.

मग तो जेवणघरात शिरला. व ताटली हातात घेऊन, हंसासारखा डौलदारपणे चालू लागला. दहा सेकंदाने तो एका गिऱ्हाईकापुढे त्याला मान देत, झुकत होता. तुम्ही त्याला वाकून हसतांना पाहिले, तेव्हा तुमच्या मनात असा विचार येऊन गेला असणार, की प्रशिक्षित वेटरचे सभ्य, दयाळू हसू हसून, त्याने गिऱ्हाईकाला लाजवले असणार, की एवढा मोठा उमराव त्याची सेवा करतो आहे.

हे ताटल्या धुण्याचे काम म्हणजे, कठीण नसलेले पण अगदी करू नये, असे वाटणारे काम आहे व सांगता येणार नाही इतके मूर्खपणाचे काम आहे. काही लोक अनेक दशके हे काम करतात, हा विचार करणे सुद्धा भयंकर आहे. मी ज्या बाईच्या बदली काम करत होतो, ती साठ वर्षांची होती. आणि ती सिंकजवळ दिवसातील तेरा तास, आठवड्यातील सहा दिवस उभी असायची. वेटर्स तिला त्रास द्यायला बघायचे. ती म्हणायची, की ती एके काळी अभिनेत्री होती. खरे तर मला वाटते, ती वेश्या असावी. मला वाटते बहुतेक वेश्यांच्या आयुष्याचा शेवटचा भाग भांडी घासण्यात जात असावा.

तिचे वय आणि आयुष्य पहाता, ती अजूनही चमकदार सोनेरी केसांचा टोप घालत असे, डोळे काळे करत असे आणि एखाद्या वीस वर्षाच्या मुलीसारखा तिचा चेहरा रंगवत असे, हे बघणे विचित्र होते. म्हणजे असे दिसत होते, की आठवड्यातील अठ्ठ्याहत्तर तास काम करूनही एखादा बळकट आणि उत्साही राहू शकतो.

## XIII

हॉटेलमधील माझ्या तिसऱ्या दिवशी, माझ्याशी सहसा चांगल्या आवाजात बोलणारा शेफ ड्यू पर्सोनेलने मला बोलावून कडक आवाजात सांगितले, "हे बघ, कृपा करून, तू त्या मिशा ताबडतोब काढून टाक. ताटल्या धुणाऱ्याला मिशा असल्याचे कुणी कधी ऐकले आहे का?"

मी बचाव करायचा प्रयत्न केला. पण त्याने मला उडवून लावले.

"ताटल्या धुणाऱ्याला मिशा --- काहीतरीच! उद्या मला मिशा दिसणार नाहीत, याची काळजी घे."

घरी जातांना मी बोरिसला विचारले, याचा अर्थ काय. त्याने खांदे उडवले. माझ्या मित्रा, तो म्हणतो, तसे तुला केले पाहिजे. हॉटेलमधील स्वयंपाकी सोडून, कोणीच मिशा ठेवत नाही. मला वाटले, तुझ्या हे लक्षात आले असेल. कारण? कारण काही नाही. तशी पद्धत आहे."

मी पाहिले, की तसा रिवाज होता. जसे की जेवणाच्या वेळेच्या जाकीटाबरोबर पांढरा टाय लावायचा नसे. मी माझ्या मिशा उडवल्या. नंतर मला त्याचे स्पष्टीकरण मिळाले. ते असे आहेः चांगल्या हॉटेलमधील वेटर्स

मिशा ठेवत नाहीत. त्यांच्यावर वरचढपणा दाखवण्यासाठी, स्वयंपाकी मंडळी मिशा ठेवतात.

यावरून हॉटेलमधील जातीयता लक्षात येते. आम्ही सगळे मिळून एकशे दहाजण होतो आणि त्यांची इभ्रत मोजायची पद्धत अशी होती, की स्वयंपाकी व वेटर्स हे ताटल्या धुणाऱ्यापेक्षा वरच्या दर्जाचे समजले जात. सर्वात वरती व्यवस्थापक असे. तो कुणालाही, स्वयंपाक्यानाही काढून टाकू शके. आम्ही मालकाला कधीच बघितले नाही. आम्हाला एवढेच माहिती होते, की त्याचे जेवण गिऱ्हाईकांपेक्षा जास्त निगुतीने बनवावे लागे. हॉटेलची शिस्त व्यवस्थापकावर अवलंबून असे. तो जागरूकपणे त्याचे काम करणारा माणूस असे. सतत त्याचे लक्ष कुठे काही ढिलाई होत नाही ना, यावर असे. पण त्याच्यासाठी आम्ही फारच हुशार होतो. सेवेसाठीच्या घंटीची पद्धत हॉटेलभर होती आणि सगळे जण एकमेकांना खुणा करण्यासाठी तिचा वापर करत असत. घंटी जास्त किंवा कमी वेळ वाजणारी असे. दोन वेळा लांब घंटी ही व्यवस्थापक येत असल्याची खूण होती. आम्ही जेव्हा ती ऐकत असू, तेव्हा आम्ही खूप कामात असल्याचे दाखवत असू.

व्यवस्थापकाच्या खाली मैत्रे डी हॉटेल येत असे. कोणी उमराव किंवा त्या दर्जाचे गिऱ्हाईक असे, तेव्हाच तो त्या टेबलाला सेवा देई. पण वेटर्सना मार्गदर्शन करे. त्याच्या टिप्स आणि शँपेन कंपनीकडून त्याला मिळणारा बोनस, [तो त्यांना जितकी बुचे परत करे, त्यावर तो अवलंबून असे. तो त्यांना परत करे, त्या प्रत्येक बुचामागे त्याला दोन फ्रँक्स मिळत.] दिवसाला तो साधारण दोनशे फ्रँक्स होत असे. इतर सर्व मंडळींपेक्षा त्याचा दर्जा वेगळा असे. तो त्याच्या खासगी खोलीत चांदीच्या ताटात जेवण घेई. स्वच्छ पांढरे जाकीट घातलेली दोन माणसे त्याच्या दिमतीला असत. मुख्य वेटरच्या खाली

मुख्य स्वयंपाकी येई व त्याचा पगार महिन्याला पाच हजार फ्रँक्स असे. तो वेगळया स्वतंत्र टेबलावर स्वयंपाकघरात जेवे आणि एक मदतनीस स्वयंपाकी त्याला हवे नको ते बघे. मग शेफ ड्यू पर्सोनेल येई. त्याला महिना फक्त पंधरा हजार फ्रँक्स महिना पगार असे. तो काळा कोट घाले व रोजचे ठराविक असे काम करत नसे, पण ताटल्या धुणाऱ्यांवर त्याचे बारीक लक्ष असे. कोणी कामचुकारपणा करतांना दिसले, तर तो त्यांना पकडे. वेटर्सनाही दंड करे. मग इतर स्वयंपाकी येत. त्यांचा पगार महिना तीन हजार सातशे पन्नास असे. मग वेटर्सचा क्रमांक येई. त्यांना रोजचा पगार सत्तर फ्रँक्स व टिप्स मिळत. त्याशिवाय तिथे टिकून रहाण्याबद्दल थोडे पैसे मिळत. टीप न मिळणाऱ्या कपडे धुणाऱ्यांना व शिवणाऱ्यांना, शिकाऊ वेटर्सना आणि मदतनीस लोकांना महिना सातशे पन्नास फ्रँक्स मिळत. मग फरशा धुणारे व इतर काही कामे करणारे येत. त्यांनाही महिना सातशे पन्नास फ्रँक्स मिळत. मग खोल्यांमधील लोकांची दखल घेणारे येत. त्यांना महिना पाचशे ते सहाशे मिळत. आणि शेवटी आम्ही ताटल्या धुणारे येत असू. त्यांना गाळसाळ समजले जाई व सर्वजण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत.

इतरही काहीजण असत --- कार्यालयातील लोक, सामान राखणारे लोक, हमाल, तळघर राखणारे, बर्फाची उलाढाल करणारे, रात्रीचे वॉचमन, दारवान. हे प्रत्येक काम करणाऱ्या वेगवेगळया जाती असत. कार्यालयातील लोक, कपडे शिवणाऱ्या बायका व स्वयंपाक करणारे पुरुष फ्रेन्च असत. वेटर्स इटालियन व जर्मन असत. [ पॅरीसमध्ये तुम्हाला फ्रेन्च वेटर दिसणे अवघड आहे. ] अरब आणि निग्रो यांच्याशिवाय, युरोपमध्ये ताटल्या व फरशी धुण्यासारखी हलकी हलकी कामे करणारे लोक सर्व जातीजमातींचे असत.

इथे सर्वसामान्यपणे बोलली जाणारी भाषा फ्रेंच आहे. इटालियन लोकसुद्धा आपापसात ती भाषा बोलत असतात.

सगळ्या विभागांच्या पदावर काम करणाऱ्यांचे आपापले विशेष फायदे असतात. पॅरीसमधील सगळ्या हॉटेलात फुटका एक पौंड पाव बेकरीला विकण्याचा दर आठ कवड्या आहे. आणि स्वयंपाकघरातील खरकटे डुक्कर पाळणाऱ्यांना विकायचा दर नगण्य आहे. नाहीतर ते ताटल्या धुणाऱ्यांना वाटले जाते. तिथे हे चोरलेही जाते. सगळे वेटर्स अन्न चोरतात. हॉटेलमधून जेवढे अन्न त्यांना दिले जाते, तेवढेच खाणारे वेटर्स मी क़्वचितच पाहिले आहेत --- स्वयंपाकी सांगितल्यापेक्षा मोठ्या प्रमाणात, जास्त स्वयंपाक करतात. गिऱ्हाईकाने स्वतःची मागणी स्वतः जाऊन आणण्याच्या ठिकाणी, आम्ही खरे तर आम्हाला कायद्यानुसार बंदी असलेली चहा, कॉफी खूप पित असू. तळघरातील लोक ब्रँडी चोरत असत. हॉटेलच्या नियमाप्रमाणे, वेटर्स लोकांना वर दारू ठेवायला बंदी असे. ती मागणीप्रमाणे तळघरातून आणावी लागे. तेथील लोक ती ओतताना कदाचित प्रत्येक पेल्यातील थोडी थोडी काढून, भरपूर जमवत असत. ही अशी जमवलेली ब्रँडी ते आम्हाला विकत असत. जर त्याचा तुमच्यावर विश्वास असला, तर तो एका मोठ्या घोटाला चोरून पाच चिल्लर नाणी, असा भाव घेई.

काहीजण चोर असत. जर तुमच्या कोटात पैसे राहिले, तर सहसा ते चोरले जात. आम्हाला रोजंदारीवरचे पैसे देणारा दारवान, आम्हाला आम्ही अन्न चोरले, तर त्यासाठी पकडत असे पण तो हॉटेलमधील सर्वात मोठा चोर होता. माझ्या महिन्याच्या पाचशे फ्रँक्स पगाराच्या बाबतीत हा मनुष्य दर दीड महिन्यांनी मला एकशे चौदा फ्रँक्सना लुबाडत असे. मी मला रोजचा पगार रोज देण्याबद्दल सांगितले होते. त्यामुळे दारवान मला रोज संध्याकाळी सोळा

फ्रँक्स देत असे. रविवारचा पगार न देता, [ त्यासाठी खरे तर महिन्याचा पगार घेणे अपेक्षित असे. माझे चौसष्ट फ्रँक्स खिशात घालत असे. कधीकधी मी रविवारी काम करत असे. त्याबद्दल मला जरी माहिती नसले, तरी मला जादा पंचवीस फ्रँक्स मिळणे अपेक्षित असे. हे देखील तो मला देत नसे. त्यामुळे माझे अजून पंच्याहत्तर फ्रँक्स तो खात असे. मी असा फसवला जात असल्याचे, मला शेवटच्या आठवड्यात समजले. पण मी काही सिद्ध करू शकत नव्हतो. त्यामुळे मला फक्त पंचवीस फ्रँक्स परत करण्यात आले. दारवान कुठल्याही त्याला जरासा मूर्ख वाटेल, अशा कामगाराला असेच फसवत असे. तो स्वतःला ग्रीक म्हणवे. पण खरे पहाता, तो आर्मेनियन, [आर्मेनिया देशाचा] होता. ते माहिती झाल्यावर मला या म्हणीचा अर्थ कळला, की ‘ज्यूपेक्षा सापावर विश्वास ठेवा.’ ग्रीकापेक्षा ज्यूवर विश्वास ठेवा पण आर्मेनियमवर कधीच विश्वास ठेऊ नका.’

वेटर्सपैकी काहीजण फार विचित्र होते. एकजण सभ्य होता --- विद्यापीठात शिकलेला तरुण होता. त्याला एका उद्योगधंद्याच्या कार्यालयात चांगल्या पगाराची नोकरी होती. पण त्याला एक लैंगिक आजार जडला. नोकरी गेली. तो वहावत गेला. आता तो वेटर असल्यामुळे स्वतःला नशीबवान समजतो. बरेचसे वेटर्स फ्रान्समध्ये पासपोर्टशिवाय आलेले होते. त्यापैकी एक दोघे हेर होते --- हेरासाठी हा सामान्य व्यवसाय होता. एक दिवस जेवणघरातील वेटर्समध्ये दोन भीतीदायक माणसे होती. मोरांडी [ इटालियन आडनाव ] नावाचा एकजण धोकादायक दिसणारा, दूरवर डोळे लागलेला होता आणि अजून एक इटालियन होता. असे दिसत होते, की मोरांडीने त्या दुसऱ्या इटालियनची बायको पळवली होती. तो दुसरा माणूस अशक्त असून मोरांडीला घाबरत होता. पण त्याला पोकळ धमक्या देत होता. मोरांडी गर्विष्ठपणे त्याला चिडवत, काही शेरेबाजी करत होता. “तू काय

करणार आहेस? मी तिच्याबरोबर झोपलो आहे. तीन वेळा झोपलो आहे. ते मला छान वाटले. आणि काय रे, तू काय करू शकणार आहेस?''

“मी तू खोटारडा असल्याचे जगजाहीर करेन. मी गुप्त पोलिसांकडे जाईन. तू इटालियन हेर आहेस.''

मोरांडीने ते नाकबूल केले नाही. त्याने फक्त त्याच्या खिशातून रेझर काढला आणि एखाद्या माणसाच्या गालावर मारल्यासारखे, हवेत दोन तीन फटके मारले. दुसऱ्या वेटरने त्याच्या हातातून रेझर काढून घेतला.

पण हॉटेलमधील सर्वात विचित्र माणूस मी पाहिला, तो जास्तीचा असा होता.

आजारी असणाऱ्या मग्यारऐवजी त्याला दिवसाला पंचवीस फ्रँक्सवर नेमण्यात आले. तो सर्बियन होता. तो पंचविशीचा चपळ व चांगला धट्टाकट्टा माणूस होता. त्याला इंग्लिश सोडून अजून पाच भाषा येत होत्या. त्याला हॉटेलमधील सर्व कामे माहिती होती. दुपारपर्यंत त्याने एखाद्या गुलामासारखी कामे केली. आणि जेव्हा बारा वाजले, तेव्हा तो एकदम वाईट मनस्थितीत जाऊन, काम करेनासा झाला. वाइन चोरली. आणि खर म्हणजे, सर्वांसमोर पाइप ओढू लागला. अर्थात असे करण्यास मनाई होती व केल्यास भरपूर दंड होता. स्वतः व्यवस्थापक रागाने धुमसत त्याच्याकडे बघायला खाली आला व ओरडला, “अरे राक्षसा, तू इथे पाइप ओढतो आहेस?''

तो सैबेरियन तटस्थपणे उत्तरला, “अरे, तुला असा चेहरा करून ओरडायला काय झाले?''

मला ते उद्धट उत्तर ऐकवेना. जर मुख्य स्वयंपाक्याला एखादा ताटल्या धुणारा असे बोलला असता, तर त्याने सूपचे गरम भांडे त्याच्या अंगावर फेकून, त्याला मारले असते. व्यवस्थापक ताबडतोब बोलला, “तुला काढून

टाकले आहे. दोन वाजता त्या सैबेरियनला पंचवीस फ्रँक्स देऊन, हाकलून देण्यात आले. तो बाहेर पडण्यापूर्वी बोरिसने त्याला रशियनमध्ये विचारले की तो हा काय प्रकार करतो आहे? तर तो सैबेरियन म्हणाला, “असे बघ म्हाताऱ्या, जर मी बारापर्यंत काम केले असेल, तर त्यांना मला दिवसाचे पैसे द्यावेच लागणार. तसा नियम आहे. आणि मला माझे पैसे मिळाल्यावर एकपासून पुन्हा काम कशाला करायचे? म्हणून मी काय केले तुला सांगतो. मी बदली म्हणून एका हॉटेलमध्ये गेलो. बारापर्यंत राब राब राबलो. मग मी अशा तऱ्हेने माझे रंग दाखवणे सुरु केले, की त्याना मला हाकलून देण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. कळले का? बहुतेक ठिकाणी मला साडेबाराला हाकलण्यात आले. आज ते दोन वाजता झाले. त्यामुळे माझे चार तासांचे काम वाचले. फक्त एवढाच त्रास आहे, की एकाच हॉटेलात असे दोनदा करता येत नाही.”

मला वाटते, बहुधा त्याने पॅरीसमधील निदान अर्ध्या हॉटेलात तरी हा प्रकार केला असावा. असे करणे उन्हाळ्यात बहुधा सोपे असावे. पण हॉटेले स्वसंरक्षण करत, अशा लोकांना काळ्या यादीत टाकत असावेत.

## XIV

थोड्याच दिवसात मी हॉटेल ज्यावर चालते, ती सर्व तत्वे आत्मसात केली. इथे पहिल्यांदा रहायला येणाऱ्या कुणाला कसले आश्चर्य वाटत असेल, तर ते म्हणजे येथील गोंगाटाचे व गर्दीच्या वेळी चालणाऱ्या गडबड गोंधळाचे. दुकानात वा कारखान्यात संथपणे काम करण्यापेक्षा हे काम फारच वेगळ्या स्वरूपाचे आहे. प्रथम ते चुकीचे व्यवस्थापन वाटले, तरी ते तसे नसते. ते

असते तरी ते टाळणे शक्य नसते. हॉटेलातील काम फारसे कठीण नसते. पण ते एकदम जोराने चालून येते आणि त्याला काही पर्याय नाही. उदाहरणार्थ, तुम्ही मागणी येण्यापूर्वी दोन तास एखादा पदार्थ तयार करून ठेऊ शकत नाही. तुम्हाला शेवटच्या क्षणापर्यंत थांबावेच लागते. तोपर्यंत अजून दुसरी कामे पुढे येत रहातात. मग ती सगळी कामे निपटायची म्हणजे, खूप घाई होते. याचा परिणाम म्हणून जेवणाच्या वेळी प्रत्येकाला दोन माणसांचे काम करावे लागते. आणि ते गडबड गोंधळ न होता करणे, अशक्य असते. अशा वेळी भांडणे होणे, हा त्या वेळेचा भाग असतो. जर प्रत्येकाने दुसऱ्याला संथपणे काम करण्यावरून शिव्या दिल्या, तर कामाचा वेग ठेवता येणार नाही. त्यामुळेच गर्दीच्या वेळी सर्वजण एकमेकांवर राक्षसासारखे खेकसत असतात. त्यावेळी हॉटेलात 'अरे गद्ध्या' शिवाय दुसरे काही कानावर पडत नाही.

बेकरीतील सोळा वर्षांची मुलगी अशा शपथा वापरते, की तेथील माणसांची बोलतीच बंद होते. [ हॅम्लेट असे म्हणाला नव्हता का, 'स्वयंपाकघरात राबणाऱ्या नोकरासारखे शिव्याशाप देतो आहेस' अशा नोकरांना काम करतांना शेक्सपिअरने नक्कीच पाहिले होते. ] पण आम्ही आमचे डोके शाबूत ठेवतो व वेळ फुकट घालवत नाही. आम्ही फक्त एकमेकांना असे करण्यासाठी डिवचत असतो. चार तासांचे काम दोन तासात उरकण्याचा प्रयत्न करत असतो.

जरी ते काम पशुतुल्य व मूर्खपणाचे असले, तरी कामगारांना त्यांच्या कामात खराखुरा रस वाटणे, अभिमान वाटणे, हे हॉटेल सुरळीत चालण्यामागील इंगित आहे. जर एखाद्याने कामात हयगय केली, तर ते लगेच दुसऱ्यांच्या लक्षात येते. आणि त्याच्याविरुद्ध तक्रार केल्याने त्याला डच्चू दिला जातो. स्वयंपाकी, वेटर्स व त्याखालील कामगार यांच्या दृष्टीकोनात

फरक असतो. पण त्याना त्यांच्या कामातील झपाट्याचा गर्व असतो.

संशयातीतपणे, सर्वात कामगारासारखा आणि सर्वात दुसऱ्याला खूश करू बघणारा वर्ग हा स्वयंपाक्यांचा असतो. ते वेटर्सइतके मिळवत नाहीत. पण त्यांना जास्त मान मिळतो. आणि ते सहसा काम सोडून जात नाहीत. ते स्वतःला नोकर समजत नाहीत. पण कुशल कामगार समजतात. त्यांना साधारणपणे कारकुनी कामापेक्षा वेगळे असे हातांनी कसब असलेले काम करणारे म्हटले जाते, जे वेटर कधीच नसतात. त्याना त्यांची किंमत माहिती असते. तेच केवळ हॉटेल तारू किंवा मारू शकतात. जर त्याला पाच मिनिटे उशीर झाला, तरी सर्व काही बिघडून जाते. स्वयंपाक न करणाऱ्या कामगार वर्गावर, तो खार खाऊन असतो. मुख्य वेटर सोडून इतरांचा अपमान करायची संधी तो सोडत नाही. तो स्वतः करत असलेल्या कामासाठी एखाद्या कलाकारासारखा गर्व वहातो. कारण ते काम कसब असलेले असते. ते तसे कठीण काम नसते, पण प्रत्येक गोष्ट वेळेवर करण्याचे महत्व असते. न्याहारी आणि जेवण यामध्ये मुख्य स्वयंपाक्याकडे शेकडो पदार्थांच्या मागण्या येत असतात.

सगळ्या वेगवेगळ्या वेळी हव्या असतात. त्यातील काही तो स्वतः करतो तर काही तो सूचना देऊन व देखरेख करून इतरांकडून बनवून घेतो. ते पदार्थ गिऱ्हाईकाला देण्यापूर्वी ठीक झाले असल्याची खात्री करतो. त्याची स्मरणशक्ती नवलपूर्ण असते. मागणीच्या पदार्थांची यादी बोर्डवर टाचलेली असते. पण तो ती क्वचितच बघतो. प्रत्येक गोष्ट त्याच्या मनात जाऊन बसते. कुठल्या वेळी कुठला पदार्थ तयार हवा, हे देखील तो लक्षात ठेऊ शकतो. तो पदार्थ तयार झाला, की तो ओरडतो, “तयार आहे.”

तो शक्तिमान असतो , पण त्याचा काही त्रास नसतो. तो कलाकारही

असतो. ते स्त्रियांपेक्षा तंत्रात वरचढ असतात, म्हणून नव्हे तर त्यांच्या वक्तशीरपणामुळे स्त्री स्वयंपाकीपेक्षा पुरुष स्वयंपाकी जास्त पसंत केला जातो.

वेटरचा दृष्टीकोन वेगळा असतो. दुसऱ्याशी हसून खेळून वागायच्या त्याच्या कसबाबद्दल तो अभिमानी असतो. त्याचे काम त्याला कामगार असल्याची मनःशांती देत नाही तर तो समाजाच्या उच्च स्थानी असल्याची देते. तो सतत श्रीमंत लोकांच्या नजरेसमोर रहातो. त्यांच्या टेबलाशी उभा रहातो. त्यांचे बोलणे ऐकतो. त्यांच्याशी हसून वागतो व लहानसहान विनोदही करतो. तो दुसऱ्याने पैसे खर्च करायचा आनंद घेऊ शकतो. शिवाय जरी अनेक वेटर्स मरेपर्यंत गरीब असले, तरी त्याला नेहमी श्रीमंत होण्याची संधी असते. प्रसंगवशात त्यांचे नशीब जोरदार होऊ शकते. ग्रँड रस्त्यावरील काही हॉटेलात, वेटर्स इतके पैसे मिळवतात, की त्यांना कामावर ठेवल्याबद्दल तेच मालकाला पैसे देतात. सतत पैसे नजरेस पडल्यामुळे आणि ते मिळायची आशा असल्यामुळे, वेटर्स स्वतःला हळूहळू मालकाच्या तोडीचे समजू लागतात. ते मोठ्या रूबाबत गिऱ्हाईकांना जेवणाची सेवा देण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांना वाटते की जेवणात त्यांचाही सहभाग आहे.

मला व्हॅलेंटी सांगत असलेले आठवले, की एकदा तो काम करत असलेल्या हॉटेलातील मेंढीचे कटलेट किती चविष्ट होते आणि त्याची किंमत दोन हजार फ्रँक्स होती आणि कशी त्याची चर्चा नंतर महिनाभर चालली होती.

“माझ्या लहानशा सुंदर मित्रा, ते छान होते. देवा रे! शँपेन, चांदी, प्रेमाचे आणि सुंदरतेचे प्रतिक असलेले ऑर्चिड --- मी असे काही पाहिले, की जे मी पूर्वी कधीच पाहिले नव्हते. आहा, ते फारच भारावून टाकणारे होते.”

मी म्हणालो, “पण तू तर तिथे फक्त वेटर म्हणून होतास.”

“अर्थात, हो. पण तरीही ते बघून माझे डोळे दीपले.”

थोडक्यात काय, तर वेटरसाठी कधी सुस्कारे टाकू नका. कधीकधी जेव्हा तुम्ही हॉटेल बंद व्हायची वेळ झाली, तरी तासभर बसता, तेव्हा तुम्हाला वाटते, की दमलेला वेटर नक्की तुमच्याकडे एक कटकट म्हणून बघतो आहे. पण ते तसे नसते. तो तुमच्याकडे जसा बघतो तसा त्याचा विचार नसतो. तो विचार करत असतो, “हा अती खादाड मनुष्य आहे.”

“एक दिवस जेव्हा मी पुरेसे पैसे साठवेन, तेव्हा मी त्या माणसाचे अनुकरण करेन.” तो पूर्णपणे जाणतो व असे सुख तो उपभोगतो आहे, म्हणून त्याची भलावण करतो. वेटर्स क्वचितच समाजवादी असतात. त्यांची काही व्यायसायिक संघटना नसते. खूप हॉटेलांमध्ये ते दिवसाचे बारा तास काम करतात --- पंधरा तास काम करतात. आठवड्यातील सातही दिवस काम करतात. ते त्यांच्यापेक्षा वरच्या सामाजिक दर्जाच्या लोकांना मान देतात आणि त्यांच्यापेक्षा खालच्या सामाजिक दर्जाच्या लोकांकडे तुच्छतेने बघतात. त्यांच्या गिऱ्हाईकांना खूश करण्याचे त्यांच्या कामाचे स्वरूप असते. ते त्यांना आवडते.

त्याखालच्या नोकर लोकांचा दृष्टीकोन परत वेगळा असतो. या प्रकारच्या कामात बढती नसते. हे काम खूप दमवणारे असते. त्यात काही कसब वा विशेष रस घेणे, असा प्रकार नसतो. जर बायका बळकट असत्या तर त्यांनीच हे काम केले असते. ते सतत धावपळ करू शकले पाहिजेत, हेच या कामात महत्वाचे असते. खडतर हवामानात, खूप तास काम करायची त्यांची तयारी हवी. या आयुष्यापासून पळ काढणे शक्य नसते. कारण त्यांच्या पगारातील एकही पैसा ते वाचवू शकत नाहीत. आणि ते आठवड्यातील साठ

ते शंभर तास काम करतात. त्यामुळे दुसरे काहीही प्रशिक्षण घेणे त्यांना शक्य नसते. थोडासे कमी कष्टाचे काम ते मिळवू शकतात. ते म्हणजे रात्रीच्या वॉचमनचे किंवा शौचालयाच्या दारवानाचे. जरी ते खालच्या दर्जाचे असले, त्यांच्याइतके काम कोणीच करू शकत नाही, हा स्वाभिमान त्यानाही असतो. त्या पायरीवर एखाद्या बैलासारखे काम शक्तीपूर्वक करत रहाणे, एवढेच त्यांना शक्य असते. या प्रत्येकाची इच्छा असते, की कुठल्याही परिस्थितीत काम करणे शक्य असणारे लोक, अशी त्यांची ओळख असावी. जरी त्याला सांगितले, की हे काम करणे अशक्य आहे, तरीही तो ते काम करून दाखवेल. एका रात्री एक इंग्लिश उमराव हॉटेलात आला. वेटर्सना काय करावे कळेना कारण त्याने पिचेस मागितली आणि ती तर शिल्लक नव्हती. रात्री उशीराची वेळ होती. दुकाने बंद झालेली असणार होती. जर्मन म्हणाला, "ते माझ्यावर सोडा. तो बाहेर गेला आणि दहा मिनिटात चार पिचेस घेऊन आला. तो शेजारच्या हॉटेलात गेला आणि ती चोरली. कुठल्याही परिस्थितीत काम करणे शक्य असणारे लोक, अशी त्यांची ओळख असावी, हे त्यांचे म्हणणे अशा वेळी पटते. त्या इंग्लिश उमरावाने प्रत्येक पीचचे वीस फ्रँक्स दिले.

स्वतः जाऊन आपल्या मागणीचा पदार्थ आणण्याच्या विभागाचा मारियो मुख्य होता. तो संथ काम करणारा होता. तो क्षणिक विचार करे व त्याला सतत नकार द्यायची सवय होती. चौदा वर्षे भूमिगत राहून, तो गती देणाऱ्या दांड्यासारखा नैसर्गिकपणे, आळशी झाला होता. तो म्हणे, 'जर तुम्हाला काही मिळवायचे असेल, तर तुम्हाला ठामपणे लक्ष्याच्या दिशेने वाटचाल करावी लागते.

जर कोणी तक्रार केली तर तो म्हणे, ‘‘तुम्ही खालच्या कामगारांना नेहमी बढाया मारतांना ऐकता, ‘मी ठाम आहे.’ जणू काही ते झाडूकाम करणाऱ्या स्त्रीऐवजी पुरुष नसून, सैनिक आहेत.

अशा तऱ्हेने हॉटेलातील प्रत्येकाला स्वतःचा असा मान होता. जेव्हा कामांचा डोंगर चालून येत असे, तेव्हा आम्ही सर्वजण मिळून प्रयत्न करून, तो पार करत असू. वेगवेगळ्या विभागातील भांडणेदेखील कार्यक्षमता वाढवत असत. कारण प्रत्येकजण आपापले विशेषाधिकार वापरून, दुसऱ्याच्या आळसावर व चोऱ्यांवर मात करायला बघे.

ही हॉटेलातील कामाची चांगली बाजू झाली. हॉटेलचे मोठे खटले, अपुऱ्या कामगार वर्गाच्या सहाय्याने चालू ठेवले जाते. प्रत्येकाला विशेष असे वेगळे काम दिलेले असते आणि प्रत्येकजण ते कष्ट करून, नीटनेटके करत असतो.

पण यात एक गोम आहे आणि ती अशी आहे --- कामगार जे काम करत असतात, त्यांच्यासाठी गिऱ्हाईकाने पैसे दिलेले नसतात. गिऱ्हाईकाच्या मते, चांगली सेवा मिळावी म्हणून, तो पैसे देतो तर कामगारांना त्यांनी केलेल्या कामासाठी मालकाकडून पैसे दिले जातात. एक नियम म्हणून दिखाऊपणे केलेल्या तात्पुरत्या कामासाठी! आश्चर्य म्हणजे हॉटेले वेळेच्या बाबतीत नवलपूर्ण असली, तरी काही बाबतीत ती खासगी घरांपेक्षा वाईटातील वाईट असतात.

उदाहरणार्थ, स्वच्छता घ्या. एखादा हॉटेलच्या सेवा पुरवणाऱ्या विभागात आत गेलात, तर तेथील घाण बघवत नाही. आमच्या हॉटेलच्या स्वतः जाऊन आपल्या मागणीचा पदार्थ आणण्याच्या विभागाच्या अंधारी कोपऱ्यात वर्षानुवर्षे घाण पडून असते. पावाच्या तुकड्यांवर झुरळे झुंडीने

तुटून पडलेली दिसत. एकदा मी मारीयोला या उपद्रवी प्राण्यांना मारायचे सुचवले, तेव्हा तो नकार देत म्हणाला, “त्या बिचाऱ्यांना कशाला मारायचे? लोण्याला हात लावण्यापूर्वी मी माझे हात धुतले, तेव्हा सगळे हसायला लागले. तरीही जिथे आम्ही ओळखले जातो, [गिऱ्हाईकाजवळ असतो तेव्हा] तिथे आम्ही तात्पुरते तरी स्वच्छ असतो. आम्हाला तशी आज्ञा असते, म्हणून आम्ही टेबले सतत घासत पुसत असतो व ब्रासच्या वस्तू चकचकीत करत असतो. पण आम्हाला स्वतःला अती स्वच्छ ठेवण्याची आज्ञा नसते आणि आमच्याकडे तेवढा वेळही नसतो. आम्ही कामात व्यग्र असतो. आमचे पहिले काम म्हणजे वक्तशीर असणे. त्यामुळे आम्ही थोडे अस्वच्छ राहून, वेळ वाचवतो.

स्वयंपाकघरात सर्वात जास्त अस्वच्छता असते. ही नुसती म्हण नाही, की फ्रेन्च स्वयंपाकी सुपात थुकतो, तर ती वस्तुस्थिती आहे. अर्थात तो ते पिणार नसेल तर. तो कलाकार असतो. पण ती कला स्वच्छता नसते. तो अन्नपदार्थांसाठी कलाकार असल्यामुळेच व ते चांगले व्हावेत व दिसावेत, म्हणून त्याला काही प्रमाणात गबाळा / अस्वच्छ असावेच लागते. उदाहरणार्थ जेव्हा गाईच्या मासाचा पदार्थ मुख्य स्वयंपाक्याकडे तपासण्यासाठी आणला जातो, तेव्हा तो तो पदार्थ काही चिमट्याने नव्हे तर, त्याच्या बोटांनी उचलतो. तळहातावर धरतो आणि जिभेने चाटतो. परत थोडे घेऊन परत चाखतो. नंतर बराच वेळ कलाकार मनात चित्र काढेल तसा विचार करतो. मग त्या सकाळी त्याच्या गुलाबी, जाड बोटांनी प्रेमाने ते दाबतो आणि शंभर वेळा चाखतो, तेव्हा त्याचे समाधान होते. तो वेटरकडून फडके घेऊन, हात पुसतो व ते फडके वेटरला परत देतो. चकाकीत करण्यासाठी काही द्रव्य चोपडलेल्या केसात सतत फिरवत असलेली, त्याची तेलकट, वाईट बोटे वेटर अर्थात पदार्थात बुडवतो. जेव्हा पॅरीसमध्ये कोणीही दहा

फ्रँक्सपेक्षा जास्त पैसे मासाच्या पदार्थासाठी देतो, तेव्हा तो पदार्थ असा बोटे बुडवलेला असतो. स्वस्त हॉटेलांमध्ये हे वेगळे असते. तिथे ही क्रिया पदार्थावर केली जात नाही, तर ते न हाताळता, चिमट्याने ताटलीत काढले जाते. थोडक्यात तुम्ही पदार्थासाठी जितके जास्त पैसे मोजता, तितका तुम्हाला तो पदार्थ घाम व थुकी उडालेला मिळतो आणि तो खावाच लागतो. अज्ञानात सुख असते.

सगळ्या हॉटेलांमध्ये अस्वच्छता असतेच. कारण वक्तशीरपणा आणि चटपटीतपणा हे चांगल्या पदार्थांना मारक ठरतात. हॉटेलांमधील कर्मचारी पदार्थ वेळेवर तयार करण्यात इतके गुंग असतात, की तो लोकांना खायचा आहे, हेच ते विसरून जातात. जसे कॅन्सरने मरणारा मनुष्य हा डॉक्टरसाठी केवळ एक रुग्ण असतो, मागणी असेल तसे जेवण हे पश्चिम आफ्रिकेतील लोकांच्या गटाच्या व्यापारी वृत्तीने बनवले जाते, असे शोधून काढण्यात आले आहे. उदाहरणार्थ, गिऱ्हाईक टोस्टची मागणी करते. कुणीतरी ही मागणी खोल तळघरात नोंदवते. त्याना तो तयार करावा लागतो. तो तयार करणारा असा विचार कसा काय करणार, की हा गिऱ्हाईकाला खायचा आहे --- मला तो खाण्यायोग्य बनवला पाहिजे?

त्याला एवढेच माहिती असते की तो चांगला दिसला पाहिजे व तीन मिनिटात तयार झाला पाहिजे. त्याच्या कपाळावरील घामाचे मोठे थेंब त्या टोस्टवर पडतात. पण त्याला त्याचे काय? तो टोस्ट लोण्याची बाजू खाली असलेल्या अवस्थेत खालील घाणेरड्या जमिनीवर पडतो. एकदा त्यावरील माती पुसणे एवढ्याचीच वेटरला गरज वाटते. असेच सर्व बाबतीत चालते. हॉटेलमध्ये अतिशय स्वच्छतापूर्वक बनवला जाणारे पदार्थ हे मालकासाठी किंवा तेथील काम करणाऱ्या लोकांसाठी असतात, हेही नसे थोडके. बाकी

सेवा पुरवली जाते तिथे सर्व घाण पसरलेली असते. माणसाच्या शरीरातील आतड्यातून जशा रक्तवाहिन्या वहात असतात, तशी अती दिखाऊ आणि चकचकीत हॉटेलांमधून ही घाणीची अशुद्ध वाहिनी वहात असते.

घाण तर असतेच पण ती सोडून, मालक गिऱ्हाईकाला त्याच्याकडून पैसे काढून मनसोक्त फसवत असतो. बहुतेक पदार्थ तयार करतांना वापरलेले घटक अत्यंत वाईट असतात. त्यातल्या त्यात मास जरा बऱ्या दर्जाचे असते. भाज्या मात्र अशा असतात की चांगल्या घरातील बाईने बाजारात त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नसते. क्रीम दूध घालून पातळ केले जाते. चहा व कॉफीची पावडर निकृष्ट दर्जाची वापरली जाते. जाम कृत्रिम रसायनांपासून बनवलेला असतो. तो वर नाव नसलेल्या पत्र्याच्या डब्यात साठवला जातो. बोरिसच्या मते, सर्व स्वस्त वाइन्स बुचे लावलेल्या सर्वसामान्य टेबल वाइन्स असतात. असा एक नियम होता, की हॉटेलात काम करणाऱ्यांनी खराब केलेल्या वस्तूंसाठी पैसे मोजले पाहिजेत. आणि नादुरुस्त वस्तू फेकून दिल्या जाव्यात. एकदा तिसऱ्या मजल्यावरील वेटरने आमच्या सेवा पुरवणाऱ्या लिफ्टच्या कडीवर आपटून, भाजलेले चिकन सांडले व तुटक्या पावाच्या कचऱ्यावर, फाटक्या कागदावर खाली पडले. आम्ही ते फक्त फडक्याने पुसून घेतले व परत वर पाठवले. कचऱ्यात टाकले नाही. वरती अनेक घाणेरड्या गोष्टी केल्या गेल्या. एकदा वापरलेल्या चादरी न धुता फक्त इस्त्री करून, परत पलंगावर घातल्या गेल्या. गिऱ्हाईकांच्या बाबतीत, मालक पण आमच्याइतकाच चिक्कू होता.

उदाहरणार्थ, सबंध हॉटेलात, ब्रश किंवा बादली नव्हती. झाडू आणि कार्डबोर्डच्या तुकड्यावरच आम्हाला भागवावे लागे. कामगारांसाठीची शौचालये मध्य आशियासारखी होती. काचेची भांडी धुवायचे सिंक सोडले,

तर हात धुवायला जागा नव्हती. हे सर्व असूनही हॉटेल एक्स हे पॅरीस मधील, सर्वात महागड्या डझनभर हॉटेलांपैकी एक होते. त्यात येणारे गिऱ्हाईक चक्रावून टाकणारे पैसे भरत असत. एका रात्रीचा सर्वसामान्य दर दोनशे फ्रँक्स होता. त्यात न्याहारी मिळत नसे. जरी मालक तंबाखू आणि वाईन घाऊक भावाने विकत घेत असला, तरी हॉटेलमध्ये ती दुकानातल्यापेक्षा दुप्पट भावाने विकली जात असे. जर गिऱ्हाईक उमराव किंवा लखपती असेल, तर त्याचे सगळे दर आपोआप वर चढत. एका सकाळी चौथ्या मजल्यावर, एका डाएट करणाऱ्या अमेरिकनाने न्याहारीसाठी फक्त मीठ आणि गरम पाणी मागितले. व्हॅलेंटी रागावला. तो ओरडला, “देवा रे! माझ्या दहा टक्क्यांचे काय? मीठ आणि गरम पाण्याच्या किमतीच्या दहा टक्के? त्याने त्या न्याहारीचे पंचवीस फ्रँक्स लावले. गिऱ्हाईकाने ते मुकाट्याने भरले.

बोरिसच्या मते, अशाच गोष्टी पॅरीसमधील सर्व हॉटेलांमध्ये घडत असतात, निदान सर्व मोठ्या, महागड्या हॉटेलांमध्ये तरी नक्कीच!

पण मला वाटते, हॉटेल एक्समधील गिऱ्हाईकांना फसवणे जास्त सोपे होते. कारण ते बरेचसे अमेरिकन्स असत व त्याना थोडेफार इंग्लिश येत असे पण फ्रेन्चचा गंधही नसे आणि त्यांना चांगले अन्न म्हणजे काय हेच माहिती नसायचे. ते बेकार अमेरिकन सिरिअल्स खाऊन पोट भरत असत आणि चहाच्या वेळी कडू मोसंब्यासारख्या काही फळांपासून बनवलेले पुडिंग खात असत. रात्रीच्या जेवणानंतर, शंभर फ्रँक्स किमतीचे भात व सॅलडने सजवलेले चिकन आणि वोर्सेस्टर सॉसमध्ये बुडवलेले पांढरे सिरॅमिक मागवत असत. पिट्सबर्ग येथील एक आमचे गिऱ्हाईक प्रत्येक रात्री त्याच्या खोलीत, अंडाभुर्जी, बेदाणे आणि कोको मागवत असे. अशा लोकांना फसवावे की नाही, याचे मालकाला विशेष काही सोयरसुतक नसे.

## XV

मी हॉटेलमध्ये विचित्र गोष्टी ऐकल्या होत्या. बेकायदेशीर डोपच्या व्यसनी चाहत्यांच्या राक्षसी गोष्टी होत्या. दारू, ड्रग व लैंगिकतेला चटावलेले लोक कोवळया तरूण मुलांच्या शोधात असत. ब्लॅकमेल व चोरी करायची संधी शोधत असत. मारियोने मला तो काम करत असलेल्या एका हॉटेलबद्दल सांगितले. तिथे खोल्या साफ करणाऱ्या नोकराणीने एका अमेरिकन बाईची हिऱ्याची अमूल्य अंगठी चोरली होती. तेथील कर्मचाऱ्यांचे काम संपल्यावर त्यांची तपासणी केली जात असे. दोन गुप्तहेरांनी हॉटेलचा कोपरानकोपरा त्यासाठी पिंजून काढला पण ती अंगठी कधीच सापडली नाही. त्या नोकराणीचा बेकरीमधील एक प्रियकर होता. त्याने ती अंगठी वितळवून तिची नळी केली होती. त्यामुळे शोध संपेपर्यंत ती सापडली नाही.

एकदा व्हॅलेन्टीने त्याच्या रिकाम्या वेळात, मला त्याच्याबद्दल एक गोष्ट सांगितली. तो म्हणाला, “अरे मित्रा, हे हॉटेलचे आयुष्य फार छान असते. पण तेथील काम संपते, तेव्हा ते एखाद्या राक्षसासारखे असते. भुकेला अन्न न मिळणे हे काय असते, हे तुला माहिती असेल, अशी मी आशा करतो, काय? नाईलाज असल्याशिवाय, तू ताटल्या विसळायचे काम केलेच नसतेस. मी काही तसले काम करत नाही. मी वेटर आहे. आणि एकदा मी पाच दिवस न खाता राहू शकलो होतो. पाच दिवस पावाचा एक तुकडाही न खाता --- देवा रे! तुला सांगतो, ते पाच दिवस भयंकर होते. एकच चांगली गोष्ट होती, की मी माझे भाडे आधीच भरलेले होते. मी रु सेंट मधील एका घाणेरड्या स्वस्त व लहानशा हॉटेलात रहात होतो. ते लॅटीन इमारतीत असून, त्याचे नाव सुझाना मे होते. एका प्रसिद्ध वेश्येच्या नावावरून ते ठेवले होते. मी उपाशी होतो. काही करू शकत नव्हतो. तिथे हॉटेल मालक येऊन वेटर भरती करत

असत. एक पेय पिण्याइतकेही पैसे माझ्याकडे नव्हते. मी काय करू शकत होतो, तर अधिकाधिक अशक्त होत अंथरुणात लोळत बसणे आणि छतावर चालणारे ढेकूण बघणे. मी तुला सांगतो, परत मी असल्या अनुभवातून जाऊ इच्छित नाही. ‘‘पाचव्या दिवशी दुपारी मी अर्धवट वेडा झालो. निदान आता मला तो सर्व प्रकार असा दिसतो. माझ्या खोलीच्या भिंतीवर एका बाईच्या चेहऱ्याचे पुसट चित्र होते. ती कोण असेल, याचे मला आश्चर्य वाटत असे. तासाभराने माझ्या लक्षात आले, की ते सेंट एलोसचे असावे. ती त्या भागातील संत होती. हे मला यापूर्वी कधी दिसले नव्हते पण आता मी त्याकडे रोखून बघतांना, माझ्या डोक्यात एक असामान्य विचार आला.

मी स्वतःशी म्हणालो, ‘‘अग माझ्या आवडत्या एलोस, [शत्रूचे सैन्य शोधायच्या कामगिरीवर हद्दपार केली गेलेली.] सारखे हे असेच चालू राहिले, तर मी एक दिवस मरून जाईन. तुला माझ्यासाठी काहीतरी करायला हवे.’’ मी मनात विचार केला, ‘सेंट एलोससाठी प्रार्थना का करू नये? गुडघ्यांवर रांगत जावे आणि तिला मला काही पैसे पाठवायला सांगावे. शेवटी याने काही तोटा तर होणार नाही. करून तर बघ.’

हे वेड्यासारखेच होते. पण माणूस भुकेपोटी, काही करू शकतो. शिवाय मी म्हटले तसे, की त्यामुळे काही त्रास तर होणार नव्हता. मी पलंगावरून उठलो व प्रार्थना करायला लागलो. मी म्हणालो, ‘‘प्रिय सेंट एलोस, जर तू खरी असशील, तर मला पैसे पाठव. मी फार काही मागत नाही --- फक्त पाव आणि वाइनची बाटली आणू शकेन एवढे पैसे दे आणि माझी गेलेली शक्ती परत येऊ दे. तीन चार फ्रँक्स बास झाले. तुला माहिती नाही, सेंट एलोस, तू मला आता मदत केलीस, तर मी किती उपकृत होईन. आणि खात्री बाळग, तू मला एकदा मदत केलीस आणि काही पाठवलेस, तर मी पहिली

गोष्ट काय करेन, तर चर्चमध्ये जाऊन तुझ्यासाठी एक मेणबत्ती लावेन. आमेन.”

मी जाऊन मेणबत्ती लावयचे ठरवले, कारण मी ऐकले होते, की संताना त्यांच्या नावाने मेणबत्ती लावलेले आवडते. मला अर्थात, माझे वचन पाळायचे होते. पण मी नास्तिक असल्याने, मला यातून काही साध्य होईल, असे वाटत नव्हते.

ठीक आहे. मी परत अंथरुणात शिरलो. पाच मिनिटांनी दारावर थाप पडली. ती मारिया नावाची, आमच्या हॉटेलात रहाणारी, शेतकऱ्याची मोठी जाड मुलगी होती. ती फार मूर्ख होती पण चांगली होती. मी आता ज्या अवस्थेत होतो, त्यात मला तिची फार पर्वा करायचे कारण दिसत नव्हते. ती माझ्याकडे बघून ओरडली, “अरे देवा, तुला बिचाऱ्याला हे काय झाले? तू दिवसाच्या या वेळेस अंथरुणात काय करतो आहेस? तुला काय झाले आहे? तू माणसापेक्षा प्रेतासारखा दिसतो आहेस.”

बहुधा मी तसाच दिसत असलो पाहिजे. मी पाच दिवसांचा उपाशी होतो. बहुतेक सर्व वेळ अंथरुणातच होतो. तीन दिवसात मी अंघोळ किंवा दाढी केली नव्हती. खोली म्हणजे डुकरांचे खुराडे झाले होते. मारिया परत बोलली, “काय झाले आहे?”

“काय झाले आहे? मी उपाशी आहे. मी पाच दिवसात काही खाल्लेले नाही. हेच झाले आहे.”

मारिया शहारली व म्हणाली, “पाच दिवसात काही खाल्लेले नाही? पण का? तुझ्याकडे काही पैसे नाहीत का?”

मी म्हणालो, “पैसे? माझ्याकडे पैसे असते, तर मी कशाला उपाशी राहिलो असतो? जगात माझ्याकडे फक्त पाच कवड्या आहेत. बाकी सगळे

मी विकून टाकले आहे. खोलीत इकडेतिकडे बघून सांग, की अजून काही विकण्यासारखे उरले आहे का. जर तुला तसे काही सापडले, तर त्यामुळे पन्नास सेंटीम्स मिळतील. तू माझ्यापेक्षा हुशार आहेस.''

मारियाने खोलीभर इकडेतिकडे पडलेल्या घाणीकडे पाहिले. मग ती एकदम उद्दीपित झाली. तिचे तोंड नवल वाटून उघडे पडले.

तो ओरडली, ''अरे मूर्खा, अक्कलशून्य माणसा, मग हे काय आहे?''

मी बघितले, की तिने कोपऱ्यात पडलेला एक रिकामा तेलाचा दिवा उचलला आहे. मी माझ्या वस्तू विकण्याआधी, बऱ्याचा आठवड्यांपूर्वी तो आणला होता.

मी म्हणालो, ''तो? तो तेलाचा दिवा आहे. त्याचे काय?''

''अरे मूर्खा, तू त्यासाठी साडेतीन फ्रँक्सची ठेव ठेवली नाहीस का?

'' अर्थात मी साडेतीन फ्रँक्सची ठेव ठेवली. ते तेलाच्या दिव्यासाठी ती नेहमीच भरायला लावतात.

''आणि जेव्हा आपण तो परत करतो तेव्हा ती ठेव परत मिळते.''

''पण मी ते सर्व विसरलो. हो.'' मारिया परत ओरडली, ''मूर्खा!'' ती इतकी उद्दीपित झाली व नाचू लागली, की मला वाटले, तिचे साधे बूट आता जमिनीत जाणार.

''मूर्खा, तू खरेच बिनडोक आहेस. तू फक्त तो दुकानात नेऊन द्यायला हवा होतास. मग तुला साडेतीन फ्रँक्स परत मिळाले असते. असे साडेतीन फ्रँक्स तुझ्यासमोर असतांना तू भुकेने तडफडत आहेस? अक्कलशून्य कुठचा!''

त्या पाच दिवसात असे करायचे मला सुचले नाही, यावर माझा

विश्वास बसेना. मी उठून बसलो. मी मारियाला म्हणालो, “तू माझ्यासाठी झटपट तो कोपऱ्यावरील दुकानात घेऊन जा --- आणि खायला घेऊन ये.”

मारियाला हे सांगावे लागले नाही. तिने दिवा पकडला व बडबड करत जिन्याने खाली गेली. तीन मिनिटात एका काखेखाली दोन पौंड पाव व दुसऱ्या काखेखाली वाइनच्या अर्ध्या लिटरच्या बाटलीसकट ती परत आली. मी तिचे आभार मानायलाही थांबलो नाही. मी पाव ओढून घेतला आणि माझे दात त्यात खुपसले.

खूप काळ तुम्ही उपाशी असाल, तर पाव कसा लागतो, हे तुम्हाला माहिती आहे का? गार, ओला, छान व नरम! तो सरळ माझ्या रक्तवाहिन्यांमध्ये जाऊन, शरीरभर नवीन रक्तासारखा वाहू लागला. त्याने खूपच फरक पडला.

मी श्वासही न घेता, अधाशासारखा दोन पौंड पाव खाऊन टाकला.

मी श्वासही न घेता, अधाशासारखा दोन पौंड पाव खाऊन टाकला. मारिया तिचे हात कंबरेवर ठेऊन, मला खातांना बघतच राहिली. “काय, बरे वाटते आहे का?” माझे खाऊन संपल्यावर तिने विचारले.

“चांगले वाटते आहे. छान वाटते आहे. मी पाच मिनिटापूर्वीचा माणूस राहिलो नाही. आता या जगात मला एकाच गोष्टीची गरज आहे. ती म्हणजे सिगरेट.”

मारियाने तिच्या ॲप्रनच्या खिशात हात घातला. ती म्हणाली, “तुला ती मिळू शकणार नाही. माझ्याकडे पैसे नाहीत. तुझ्या साडेतीन फ्रँक्सपैकी हे उरलेले पैसे, या सात कवड्या! हे व्यसन चांगले नाही. सर्वात स्वस्त सिगरेट बारा कवड्यांना पडते.”

मी म्हणालो, मग मी त्या घेऊ शकतो. येशू ख्रिस्ता, काय चांगले नशीब आहे! माझ्याकडे पाच पैशांची चिल्लर आहे --- ते अगदी पुरेसे आहेत.”

मारिया बारा पैशांची चिल्लर घेऊन, सिगरेट आणायला निघाली. आणि नंतर मी विसरलेले काही माझ्या डोक्यात आले. तिथे ती शापित सेंट एलोस होती. तिने मला पैसे पाठवले, तर मी तिला एक मेणबत्ती लावणार होतो. आणि कोण असे म्हणू शकेल, की ती प्रार्थना फळाला आली नाही?

मी म्हणालो होतो, तीन चार फ्रँक्स आणि पुढच्याच क्षणी साडेतीन फ्रँक्स माझ्या पुढ्यात आले. आता माघार घेणे नाही. मी माझ्याकडील बारा कवड्या मेणबत्तीवर खर्च करायला हव्यात. मी मारियाला परत बोलावले. “आता काही उपयोग नाही. मी सेंट एलोसला मेणबत्ती लावण्याचे वचन दिले होते. तेव्हा या उरलेल्या बारा कवड्या त्यावरच खर्च झाल्या पाहिजेत. हे वेड्यासारखे वाटते, नाही का? पण मला सिगरेट आणणे शक्य नाही.”

मारिया म्हणाली, “सेंट एलोस? तिचे काय?”

“मी तिची प्रार्थना केली होती आणि मेणबत्ती लावण्याचे वचन दिले होते.”

तिने माझी प्रार्थना ऐकली. कसेही करून मला पैसे मिळाले. मला मेणबत्ती विकत आणली पाहिजे. मला हा त्रास आहे. पण मला वाटते, मला मी दिलेले वचन पाळायला हवे.”

मारियाने विचारले, “पण सेंट एलोस तुझ्या डोक्यात आली कुठून?”

मी म्हणालो, “माझ्या खोलीत तिचे चित्र आहे.” असे म्हणून मी काय घडले, ते सर्व तिला सांगितले. तो बघ तिचा फोटो.” असे म्हणत मी भिंतीवरील फोटोकडे निर्देश केला.

मारियाने त्या चित्राकडे पाहिले आणि नवल म्हणजे ती जोरजोरात हसू लागली. ती खोलीभर टाळ्या पिटत राहिली व अधिकाधिक हसू लागली. जणू काही ती फुटत होती. मला वाटले, ती वेडी झाली आहे. दोन मिनिटांनी ती बोलली, “मूर्खा, तू प्यायला आहेस. तू प्यायला आहेस. तुला खरेच असे म्हणायचे आहे का, की तू तिच्यासमोर गुडघे टेकून प्रार्थना केलीस? तुला कोणी सांगितले, की ती सेंट एलोस आहे?”

मी म्हणालो, “पण मी ती सेंट एलोस असल्याची खात्री केली.”

“अरे बिनडोक माणसा, ती सेंट एलोस मुळीच नाही. ती कोण आहे असे तुला वाटते?”

मी विचारले, “कोण?”

“ती प्रसिद्ध वेश्या, सुझान मे आहे --- “

“पण शेवटी मी चुकलो नव्हतो. मारिया आणि मी खूप हसलो. मग आम्ही त्याबद्दल बोललो. आम्हाला असे समजले, की मी सेंट एलोसचे काही देणे लागत नाही. म्हणजे हे स्पष्ट होते, की तिने माझ्या प्रार्थनेला उत्तर दिले नव्हते. आणि त्यामुळे मला मेणबत्ती आणायची काही गरज नव्हती. त्यामुळे शेवटी मला सिगरेट मिळाली.

## XVI

काळ पुढे सरकला आणि तरी ऑबर्ग डे जेहान कोटार्ड काही उघडेना. आमच्या दुपारच्या सुट्टीत, बोरिस आणि मी एक दिवस तिथे गेलो, तर तिथे नव्या हॉटेलचा काहीच मागमूस नव्हता. फक्त बेकार चित्रे होती व दोन फोन

क्रमांकांऐवजी तीन क्रमांक होते. मालकाने कोरडेपणे आमचे स्वागत केले आणि पुढच्या क्षणी तो माझ्याकडे [ हॉटेलचा भावी ताटल्या धुणारा ] वळला आणि माझ्याकडून पाच फ्रँक्स उसने घेतले. त्यानंतर माझी खात्री झाली, की हे हॉटेल कधीच उघडणार नाही. तरीही मालक बोलला, की पंधरा दिवसात ते सुरु होईल. त्याने आमची स्वयंपाक करणार असलेल्या बाईशी ओळख करून दिली. ती बाल्टिक रशियन असून पाच फूट उंच व यार्डभर लांबीचे ढुंगण असलेली होती. तिने सांगितले, की इथे येण्यापूर्वी ती गायिका होती व कलासक्त असून, तिला इंग्लिश साहित्याची आवड आहे . विशेषतः गुलामगिरी विरुद्धची कादंबरी ‘अंकल टॉमची केबिन’ हे तिचे आवडते पुस्तक होते. व त्याचा अमेरिकन लेखक हॅरिएट बिचर स्टोवे तिचा आवडता लेखक होता.

पंधरा दिवसात मी ताटल्या धुण्याच्या कामाला इतका सरावलो, की मी इतर कुठल्या कामाची कल्पनाच करू शकत नव्हतो. आयुष्य काही बदल न होता चालले होते. पावणेसहा वाजता अचानक एक धक्का बसत, मला जाग आली. तेलकट डाग पडलेल्या कपड्यांसकट, मळकट चेहऱ्याने व विरोध करणाऱ्या स्नायुंसकट मी बाहेर पडलो. ती पहाट होती. कामगारांच्या हॉटेलच्या सोडून सर्व खिडक्या अंधारी होत्या. आकाश कोबाल्टच्या विस्तीर्ण सपाट भिंतीसारखे असून, त्यावरील छप्परावर व मनोऱ्यावर जणु काळा कागद चिकटवला होता. झोपाळू लोक दहा फूट लांबीच्या काठीला बांधलेल्या झाडूने फुटपाथ झाडत होते. चिंध्या पांघरलेली कुटुंबे केराच्या टोपल्या रिकाम्या करत होती. कामगार आणि एका हातात चॉकलेटचा तुकडा घेतलेली व दुसऱ्या हातात क्रसॉ घेतलेल्या मुलींची गर्दी दाटीवाटी करत, मेट्रो स्टेशनकडे चालली होती. कामगारांनी खचाखच भरलेली ट्राम जोराने आवाज

करत हळू धावत होती. प्रत्येकजण जागेसाठी भांडत, घाईने स्टेशनकडे चालला होता.

पॅरीसच्या मेट्रोला सकाळी सहा वाजता खरोखर जागेसाठी भांडावे लागते. घामाने डवरलेल्या उतारूंमधून वाट काढत, एखाद्या भयानक फ्रेंच चेहऱ्याच्या नाकाला नाक लागत, वाइन आणि लसणाचा वास सहन करत उभे रहावे लागते. मग जेव्हा सूर्य तळपत असतो आणि शहर वाहनांनी व माणसांच्या गर्दीने काळे झालेले असते, तेव्हा दोन दिवसापर्यंतचा उजेड विसरत हॉटेलच्या तळघरातील चक्रव्यूहातून मार्ग काढत, जावे लागते.

हॉटेलमधील माझ्या पहिल्या आठवड्यानंतर, मी रोज दुपारच्या सुट्टीत झोपत असे. जेव्हा माझ्याकडे पैसे असत, तेव्हा मी बिस्ट्रोत जात असे. इंग्लिशच्या वर्गाला जाणारे काही महत्वाकांक्षी वेटर्स सोडले, तर सगळेजण त्यांचा रिकामा वेळ असा घालवत असत. सकाळच्या कामानंतर, प्रत्येक जण दमून गेल्याने, याहून वेगळे चांगले असे काही करू शकत नसे. काहीजण गटाने रु डे सियसला वेश्यावस्तीत जाऊन, उबग आणणारी पार्टी करत. तिथे प्रवेश फी फक्त पाच फ्रँक्स, पंचवीस सेन्टीम्स व साडेदहा पेनी इतकी होती. त्याचे टोपण नाव ले प्रिक्स फिक्स होते. तिथले अनुभव ते मोठे विनोद असल्यासारखे सांगत. ती कामगारांची ठराविक वेळी जमायची आवडती जागा होती. त्यांच्या तुटपुंज्या पगारात त्यांना लग्न करता येत नसे. आणि तळघरात काम करून, निसंशय काही मूर्ख भावना त्यांच्या मनात येत नसत.

अजून चार तास एखादा माणूस तळघरात राही आणि मग घामाने निथळत, पॅरीसमधील विचित्र जांभळसर दिव्यांच्या उजेडात थंड रस्त्यावर बाहेर येई. नदीपलीकडे एफेल मनोरा वरपासून खालपर्यंत आकाशात प्रखर उजेडाची वेडीवाकडी तिरीप टाकत असे. ते जणू आगीचे मोठे साप वाटत

असत. गाड्यांच्या ओळी शांतपणे पुढे मागे होत होत असत. त्या मंद प्रकाशात फारच सुंदर दिसणाऱ्या स्त्रिया छपराखाली इकडेतिकडे फिरत असत.

काही वेळा एखादी स्त्री बोरिसकडे वा माझ्याकडे बघे आणि आमचे तेलकट कपडे लक्षात आले, की घाईने दुसरीकडे बघू लागे. परत एकदा मेट्रोत मारामारी करून जो तो दहापर्यंत घरी जाई.

साधारणपणे दहा ते मध्यरात्रीपर्यंत मी आमच्या रस्त्यावरील लहान बिस्ट्रोमध्ये जात असे. ती जमिनीखालील जागा असून आरमारातील अरब लोकांनी व्यापलेली असे. ती माऱ्यामाऱ्या करण्यासाठी वाईट जागा होती आणि कधीकधी मी तिथे बाटल्या फेकलेल्या पाहिल्या आहेत. एकदा तर फार भीतीदायक गोष्ट झाली होती. पण सहसा अरब त्यांच्या त्यांच्यातच मारामारी करत. त्यात ख्रिश्चन लोक नसत. राकी नावाचे अरब पेय फार स्वस्त होते आणि बिस्ट्रो सतत दिवसरात्र उघडे असे. अरब लोक नशीबवान होते. त्यांच्या अंगात दिवसभर काम करायची शक्ती असे व रात्रभर ते पित.

त्यावेळेच्या खालच्या थरातील कामगारांचे जीवन तसे होते आणि ते तसे काही वाईट नव्हते. मला गरीबीची जाणीव झाली नव्हती. कारण माझ्या खोलीचे भाडे भरूनही माझ्याकडे इकडेतिकडे फिरायला व सिगरेटला व रविवारच्या जेवणाला पैसे असत. दिवसाला चार फ्रँक्सचे पेय मी पिऊ शके. आणि चार फ्रँक्स म्हणजे मोठी संपत्ती होती. तिथे --- हे स्पष्ट करायला अवघड आहे --- पण एक प्रकारचे मोठे समाधान होते, भरपूर खायला मिळालेल्या पशूला जसे असेल, तसे ते होते. पण आयुष्य माझ्यासाठी सोपे होते. खालच्या थरातील कामगारांचे जीवन फार सोपे असते. तो काम आणि झोप यांच्या तालावर जीवन व्यतीत करत असतो. त्याला विचार करायला

वेळ नसतो. त्याला बाह्य जगाची फारशी जाणीव नसते. आणि त्याचे पॅरीस त्याच्या हॉटेलपुरते, मेट्रोपुरते, काही बिस्ट्रोंपुरते व त्याच्या अंथरुणापुरते मर्यादित असते. जर तो सुट्टीच्या दिवशी कधी बाहेर गेलाच तर गुडघ्यांवर बसून ऑयस्टर [शिंपल्यातील मासा] गिळणाऱ्या व बिअर पिणाऱ्या हॉटेलमधील मुलींबरोबर, फक्त काही रस्ते पलीकडे जाऊ शके. दुपारपर्यंत लोळत रहात असे. स्वच्छ शर्ट घालून, पैसे टाकून एखादे पेय विकत घेत असे आणि जेवण झाल्यावर पुन्हा लोळत बसत असे. त्याच्यासाठी काम, झोप आणि पेये सोडून काहीच खरे नसे आणि यापैकी झोप ही सर्वात महत्वाची असे.

एका रात्री काही तासात माझ्या खिडकीजवळ एक खून झाला. मी मोठ्या भीतीदायक किंकाळीने जागा झालो आणि खिडकीजवळ जाऊन पाहिले, तर खालील दगडांवर एक माणूस निपचित पडला होता. मी खुन्यांना पाहिले. त्यातील तीनजण रस्त्याच्या शेवटी मला धावतांना दिसले. आमच्यापैकी काहीजण धावत गेले आणि पाहिले, तर तो पडलेला माणूस मरणप्राय होता. लीड पाइपच्या तुकड्याने त्याची कवटी फुटली होती. मला त्याच्या रक्ताचा रंग आठवतो आहे. तो विचित्रपणे वाइनसारखा जांभळा होता. मी संध्याकाळी घरी आलो, तेव्हा तो अजून खालील दगडांवर पडलेला होता. अनेक मैल लांबून शाळेतील मुले ते बघण्यासाठी, आली होती. पण मागे वळून बघता, मला कशाने धक्का बसला असेल, तर तो यामुळे की तीन मिनिटात तो खून होतांना मी अंथरुणात ढाराढूर झोपलो होतो. तसेच रस्त्यातील लोकही झोपले होते. आम्ही तो मेला असल्याची खात्री केली आणि परत झोपायला गेलो. आम्ही कामगार लोक होतो. एका खुनासाठी आमचा वेळ फुकट घालवणे आम्हाला परवडणारे नव्हते.

जसे भुकेने मला अन्नाचे महत्व पटवून दिले होते, तसे हॉटेलातील कामाने आम्हाला झोपेचे महत्व पटवून दिले होते. झोप ही फक्त शारीरिक गरज उरली नव्हती, तर लैंगिक दृष्ट्यासुद्धा ती सुखावह होती. सुटकेपेक्षा, नैतिक शुद्धता नष्ट करणारी होती. मला आता ढेकणांचा काही त्रास नव्हता. मारीयोने मला त्यावर रामबाण उपाय सांगितला होता. झोपायच्या कपड्यांवर मिरे पसरून ठेवायचे. त्यामुळे मी शिंकत असे, पण ढेकूण चावत नसत. ते दुसरीकडे पळून जात.

## XVII

आठवड्याला तीस फ्रँक्स पेयांवर खर्च करून, मी सामाजिक आयुष्यात भाग घेऊ शके. शनिवारी लहान बिस्ट्रोमध्ये, हॉटेल डेस ट्रोइस मोईनॉक्समध्ये आम्ही काही संध्याकाळी आनंदात घालवत असू.

पंधरा फुटांचा चौरस असलेली, विटांच्या फरशीची खोली वीस लोकांनी खचाखच भरलेली असे. हवेत धूर पसरलेला असे. गोंगाटाने बहिरेपण येण्याची पाळी येई, कारण प्रत्येकजण बेंबीच्या देठापासून ओरडत असे किंवा गात असे. कधीकधी फक्त गोंधळलेले आवाज असत. कधीकधी सगळे मिळून एखादे गाणे म्हणत. 'मार्सेलिअस' [ फ्रान्सचे राष्ट्रगीत ], 'इंटरनॅशनल', 'मॅडेलॉन' किंवा 'लेस फ्रायसेस एटलेस फ्राम- बॉयसेस'. [जे त्या ठिकाणी नाही, तिथे ते शोधणे] अमाया [जपानी नाव] सावकाश पाऊले टाकत गोंगाट करत चाललेली, काच कारखान्यात दिवसाला चौदा तास काम करणारी शेतकरी मुलगी हे गाणे गात असे, इल अ परड्यु ---सेंट पँटालॉन्स --- टाउट एन डान्सअन्ट ले चार्लेस्टन – तिची मैत्रीण मेरीनेट्टे. बारीक, काळी,

गोर्सियन, हट्टी मुलगी तिचे गुडघे जवळ बांधून गोलाच्या मध्यभागी नाच करत असे. काहीतरी नको ते करणारे लोक, रिंगणाच्या आतबाहेर नाचत असतात. फुकटची पेये पित असत. एकदा फसवणाऱ्या कुणाची तरी मोठी गुंगवून टाकणारी गोष्ट त्यांना सांगायचा प्रयत्न कोणी करत असत.

चार्ली, प्यायलेला, अर्धवट नाचत असलेला, हातात शाम हे हिरवे पेय घेऊन अर्धवट मागे पुढे झुलत असलेला, बाईला चिमटे काढत असलेला आणि कविता म्हणत असलेला! लोक बैठे खेळ खेळत असतात आणि पेयासाठी फासे टाकत असतात. मॅन्यूएल, स्पॅनिआर्ड मुलींना ओढून बारकडे आणत असतात आणि पोटाशी फासे खुळखुळवून, नशीब आजमावत असतात. एफ बाईसाहेब बारमध्ये टीन आणि लेडच्या गाळण्यातून, वेगाने वादळी चॉपीनेस ओतत असतात. सतत त्यांच्या हाताशी ओले फडके असते. कारण खोलीतील प्रत्येक माणूस त्यांच्याशी लगट करायचा प्रयत्न करत असतो. विटांचे थर लावणाऱ्या मोठ्या लुईची दोन अनौरस मुले बसलेली असतात व त्यांच्याकडे आलेला सरबताचा पेला दोघे मिळून पित असतात. सगळे फार आनंदात आहेत. आनंदातिशयाने हे जग चांगली जागा असल्याची व आपण कुणी खास मंडळी असल्याची, त्यांची खात्री पटली आहे.

तासाभरात आवाज जवळजवळ कमी होत जातो. मध्यरात्रीच्या सुमारास, 'नागरिकांनो' अशी भेदक किंकाळी ऐकू येते आणि एक खुर्ची पडल्याचा आवाज येतो. लाल चेहऱ्याचा व सोनेरी केसांचा कामगार उभा रहातो आणि आवाज करत टेबलावर बाटली आदळतो. प्रत्येकजण गायचा थांबतो. 'शू!' चा आवाज सर्वत्र पसरतो.

फ़्युरेक्स येतो आहे फ़्युरेक्स हा विचित्र प्राणी होता. लीमोसिनसारखा मोठा आडदांड, दगडकाम करणारा गवंडी होता. तो आठवडाभर सतत काम

करत असे व शनिवारी अंगात आल्यासारखी दारू पित असे. नंतर तो त्याची स्मृती हरवून बसला. त्याला युद्धापूर्वीचे काही आठवत नसे. जर एफ बाईसाहेबांनी त्याची काळजी घेतली नसती, तर त्याचे पिऊन पिऊन तुकडे झाले असते. शनिवारी संध्याकाळी पाच वाजता, ती कुणाला तरी सांगे, ''त्याने पैसे खर्च करण्यापूर्वी कुणीतरी त्याच्याजवळील पैसे काढून घ्या. जेव्हा ती त्याला पकडे, तेव्हा त्याच्याकडील पैसे काढून घेई. फक्त एक चांगले पेय घेण्यापुरते पैसे ती त्याच्याकडे ठेवे. एका आठवड्यात तो पसार झाला. मोंग नावाच्या ठिकाणी आंधळयासारखे पेय प्यायला व एका गाडीचा धक्का लागून चांगलाच जखमी झाला.

फ्युरेक्सचा गमतीचा भाग असा होता, की जेव्हा तो भानावर असे, तेव्हा कम्युनिस्ट असे आणि दारू पिऊन झिंगल्यावर आक्रमकपणे देशभक्त होत असे. त्याची संध्याकाळ चांगल्या कम्युनिस्ट तत्वांनी सुरु होई. पण चार पाच लिटर दारू प्यायल्यावर तो अनावर आक्रमकपणे चुकीची हेरगिरी करत, सर्व परदेशी लोकांना आव्हान देत, देशभक्ती उधळू लागे. मारामारी करू लागे आणि त्याला रोकले नाही तर बाटल्या फेके. या अवस्थेत तो दर शनिवारी रात्री भाषण करे. ते असे असेः लोकशाहीच्या नागरिकांनो, इथे कुणी फ्रेंच माणसे आहेत का? जर तशी कुणी असतील, तर मी त्यांना धमकावून, लढाईच्या तेजस्वी दिवसांची आठवण करू इच्छितो. जेव्हा कुणी मागे वळून, मित्रत्वाच्या व नायकगिरीच्या काळाची --- जेव्हा कुणी हुतात्मा झालेल्या नायकांची आठवण करतो आणि पहिल्या महायुद्धातील तुंबळ व लांबलचक युद्ध झालेल्या फ्रान्समधील जागेत, व्हर्डून येथे मी जखमी झालो होतो --- "

इथे तो थोडेसे कपडे काढून त्यावेळी त्याला झालेली जखम दाखवतो.

टाळयांचा कडकडाट होतो. जगात फ्युरेक्सच्च्या या भाषणाइतके काहीच विनोदी नसेल. तो त्या भागातील प्रसिद्ध प्रेक्षणीय माणूस होता. जेव्हा त्याची भाषणबाजी सुरु होई, तेव्हा दुसऱ्या बिस्ट्रोमधील लोक त्याला बघायला येत,

फ्युरेक्सवर चर्चा होत असे व पैजा लागत असत. कुणी डोळा मारून, त्याला गप्प बसायला सांगे. कुणी 'मार्सेलिअस' [ फ्रान्सचे राष्ट्रगीत ], म्हणायला सांगे. तो ते खर्जात छान गात असे. जेव्हा तो या ओळीवर येई, ऑक्स आर्मेस, सीटोयेन्स [नागरिकांनो, शस्त्रसज्ज व्हा.],तेव्हा खोलवर त्याच्या छातीतून देशभक्तीचे नाद उठत आणि त्याच्या डोळयातून अश्रु वाहू लागत. अश्रूंची मालिका त्याच्या गालावरून ओघळे. तो इतकी दारू प्यायलेला असे, की लोक त्याला हसत आहेत, हेदेखील त्याला समजत नसे. नंतर त्याचे संपण्यापूर्वी दोन तगडे कामगार येऊन त्याला पकडून नेत. अझया त्याच्यापासून लांब उभी राहून ओरडत सुटे, "व्हाइव्ह लआलेमॅगने [राष्ट्रसंघ चिरायू होवो.] फ्युरेक्सचा चेहरा असे वाईट ओरडणे ऐकून, जांभळा लाल होई. बिस्ट्रोमधील प्रत्येकजण मिळून ओरडू लागे, "राष्ट्रसंघ चिरायू होवो. हुकुमशाही मुर्दाबाद" तेव्हा फ्युरेक्स त्यांच्यावर हल्ला करायला बघे. अचानक तो मजेत विघ्न आणे. त्याचा चेहरा उतरे. त्यावर दुःख दिसे. त्याचे हात लुळे पडत आणि कोणी त्याला थांबवण्यापूर्वी तो टेबलावर आजारी पडे. मग एफ बाईसाहेब त्याला एखाद्या पोत्यासारखे उचलून, पलंगावर नेऊन ठेवत. सकाळी, तो शांत व समाजमान्य झालेला असे आणि फ्रेंच वर्तमानपत्र आणे.

फडक्याने टेबल पुसले जाई. एफ बाईसाहेबानी बऱ्याच एक लिटरच्या बाटल्या व पाव आणत आणि आम्ही गंभीरपणे प्यायला बसत असू. मग तिथे अजून गाणी म्हटली जात. फिरता गायक त्याचा बँजो घेऊन येई आणि पाच

कवड्यांसाठी तो वाजवे. रस्त्याच्या खालील बाजूकडील बिस्ट्रोमधील एक अरब व एक मुलगी हे नाच करत. त्या माणसाने रंगवलेले व ताठ झालेले मोठे लाकडी शिस्न त्या जागी धरलेले असे. आता आवाजात मध्ये मध्ये शांतता होऊ लागली. लोक त्यांच्या प्रेमप्रकरणाबद्दल, लढाईबद्दल व सीन नदीतील बर्बेल माशांबद्दल, क्रांतीबद्दल आणि गोष्टी सांगण्याबद्दल बोलू लागत. चार्ली पुन्हा शांत होई. तो संभाषणाचा धागा पकडत, स्वतःच्या आत्म्याबद्दल पाच मिनिटे सांगे. खोली गार होण्यासाठी खिडकी व दारे उघडली जात. रस्ता रिकामा होऊ लागे. दूरवर सेंट मायकेल रस्त्यावरून ओरडत जाणाऱ्या दुधाच्या गाडीचा गडगडाटी आवाज येई. कपाळावरून गार हवा वहात असे आणि स्वस्त आफ्रिकन वाइनची चव अजूनही चांगली लागत असे. आम्ही आनंदी होतो.पण हसरी मनस्थिती संपत असे.

एक वाजता आम्ही आनंदी राहिलो नाही. संध्याकाळची मजा कमी होऊ लागली. आम्ही घाईघाईने अजून बाटल्या मागवल्या. पण एफ बाई साहेबानी आता त्यात पाणी घालायला सुरवात केली होती. त्यामुळे त्याची चव आधीसारखी लागत नव्हती. माणसे आक्रमक झाली. मुलींची चुंबने घेऊ लागली आणि त्यांच्या छातीवर हात टाकू लागली. आता आणखी वाईट काय होणार होते? पण विटांचे थर लावणाऱ्ा मोठा लुई प्यायलेला होता आणि कुत्र्यासारखे ओरडत दाराकडे निघाला होता. लोक एकमेकांचे हात हातात घेऊन, गोंधळलेले लांबलचक कबुलीजबाब द्यायला बघत होते आणि ते ऐकले जात नसल्याने चिडत होते. गर्दी पातळ झाली होती.

जिथे दिवसभर पत्ते खेळले जायचे, त्या अरब बिस्ट्रोवरून मॅन्युएल आणि अजून एक जुगारी गेले. चार्लीने अचानक एफ बाईसाहेबांकडून तीस फ्रँक्स उसने घेतले आणि नाहीसा झाला. बहुधा वेश्यागृहात गेला. माणसे

त्यांचे पेले रिकामे करू लागले. “सभ्य स्त्रीपुरुषहो!” असे म्हणत, झोपायला गेले. एक वाजून गेल्यावर, फक्त डोकेदुखी उरवून, आनंदाचा शेवटचा थेंब उडून गेला. आम्हाला जाणीव झाली की आम्ही छान जगातील फार मोठे छाप पाडणारे नव्हतो, तर दबक्या पद्धतीने दारू प्यायलेले, खूपच अस्वच्छ व कमी पगार मिळवणारे कामगार होतो.

आम्ही वाइन पित राहिलो, ते केवळ सवयीने. पण अचानक आम्हाला मळमळल्यासारखे वाटू लागले. एकाचे डोके फुग्यासारखे फुगले. जीभ व ओठ जांभळे पडले. जमीन हलू लागली. शेवटी पिणे थांबवावे लागले. खूप माणसे आजारल्यासारखी होऊन बिस्ट्रोचा मागील मोकळ्या जागेत गेली. आम्ही पलंगापर्यंत रांगत गेलो. अर्धवट कपड्यात तिथे दहा तासांसाठी कोसळलो.

माझ्या बहुतेक शनिवारच्या रात्री अशाच जात. जेव्हा सर्वसाधारणपणे, दोन तास खूप आनंदात जात, तेव्हा नंतर डोकेदुखी सुरु होई. येथील बरेचसे लोक अविवाहित आणि काही भविष्य नसलेले होते. शनिवारचे पिणे हीच एक गोष्ट आयुष्य सुसह्य करणारी होती.

## XVIII

बिस्ट्रोमध्ये एका शनिवारी, चार्लीने आम्हाला एक छान गोष्ट सांगितली. तो प्यायलेला पण ओळीने बोलू शकेल इतपत ठीक आहे, असे चित्र डोळयांसमोर उभे करा. तो झिंकच्या बारवर आपटतो आणि शांततेसाठी जोराने ओरडतो.

“शांत रहा, सभ्य स्त्रीपुरुषहो, शांत रहा. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. ती ऐका. एक संस्मरणीय गोष्ट, काही शिकवणारी गोष्ट, सुसंस्कृत आणि झकपक आयुष्याची गोष्ट. सभ्य स्त्रीपुरुषहो, शांत रहा.

मध्ययुगीन, धार्मिक, नैतिक व सामाजिक आधिष्ठान असलेल्या उमरावाची पत्नी. ,मला पैशांची चणचण असतांना हे घडले. हे कसे असते, किती वाईट असते, ते तुम्हाला माहिती आहे. एखादा चांगला माणूस अशा परिस्थितीत सापडावा म्हणजे --- मला घरून पैसे मिळाले नव्हते. मी प्रत्येक गोष्टीसाठी कर्ज काढले होते. मला काम करण्याशिवाय काही तरणोपाय नव्हता आणि ते मी करणार नव्हतो.

मी तेव्हा एका मुलीबरोबर रहात होतो. तिचे नाव यव्होन होते --- एका शेतकऱ्याची अर्धवट शहाणी, सोनेरी केसांची आणि फुगीर पायांची मुलगी. तेथील अझयासारखी. आम्ही दोघांनी तीन दिवसात काही खाल्ले नव्हते. अरे देवा, तो काय त्रास होता! ती मुलगी पोटावर हात ठेऊन, कुत्र्यासारखे ओरडत, खोलीत फिरत बसे. ती उपासाने मरायला टेकली होती. हे भयंकर होते. पण बुद्धिमान माणसासाठी काहीही अशक्य नव्हते. मी मला एक प्रश्न विचारला, “काम न करता पैसे मिळवायचा कोणता मार्ग आहे? आणि ताबडतोब उत्तर मिळाले, असे पैसे मिळवण्यासाठी एखाद्याने बाई असले पाहिजे. प्रत्येक बाईकडे विकण्यासारखे काही नसते का? मग मी विचार करू लागलो, जर मी बाई असतो तर! मला बाळंतपणाचे सरकारी दवाखाने आठवले --- तुम्हाला बाळंतपणाचे सरकारी दवाखाने माहिती आहेत का? तिथे गर्भार बायकांना, काही प्रश्न न विचारता, मोफत जेवण दिले जाते. हे त्यांना दिलासा व उत्तेजन मिळावे, म्हणून असते. अशी कोणतीही बाई तिथे जाऊन जेवणाची मागणी करू शकते आणि ते लगेच दिले जाते. मी विचार केला, “अरे देवा, जर मी

बाई असतो तर! मी अशा जागी रोज जेऊ शकलो असतो. बाई गर्भार आहे की नाही, हे तपासल्याशिवाय कोण सांगते?

मी यव्होनकडे वळलो व म्हणालो, “हे शोक करणे थांबव. मला अन्न मिळवण्याचा एक मार्ग सापडला आहे.”

ती म्हणाली, “कुठला?”

मी म्हणालो, “तो साधा आहे. बाळंतपणाच्या सरकारी दवाखान्यात जाऊन तू गर्भार असल्याचे सांग व जेवण माग. ते तुला काही प्रश्न न विचारता, छान जेवण देतील.”

यव्होन फार कष्टी झाली. ”पण, अरे देवा, मी गर्भार नाही.”

“हे कोणाला माहिती आहे? ते सहजसोपे आहे. तुला कसली गरज आहे, तर एका उशीची --- कदाचित दोन उशांची. माझ्या प्रिय यव्होन, हे स्वर्गीय सृजनशीलत्व आहे. ते फुकट घालवू नकोस.”

शेवटी मी तिचे मन वळवण्यात यशस्वी झालो. मग आम्ही एक उशी उसनी आणली. तिला तयार केले व तिला बाळंतपणाच्या सरकारी दवाखान्यात नेले. त्यांनी तिचे आनंदाने स्वागत केले. त्यांनी तिला कोबीचे सूप दिले. भाजीबरोबर गाईच्या मासाचे तुकडे दिले. बटाट्याचा ताजा दाट रस दिला. पाव, चीज आणि बिअर दिली. आणि बाळासाठी सर्व प्रकारचा सल्ला दिला.

यव्होनने अधाशासारखे पोट फुटेपर्यंत खाल्ले. त्यातील काही पाव व चीज तिने खिशात घालून माझ्यासाठी चोरले.

मला पैसे मिळेपर्यंत, मी तिला रोज तिथे नेऊ लागलो. माझ्या बुद्धीमुळे आम्ही वाचलो.

नंतर वर्षभर सर्व सुरळीत चालले. मी परत यव्होनबरोबर राहू लागलो. एक दिवस आम्ही पोर्ट रॉयल रस्त्यावर सैनिक वसाहतीजवळून चाललो होतो. अचानक यव्होनचे तोंड सताड उघडे पडले. ती शरमेने व रागाने लालपांढरी झाली व परत रागाने लाल झाली.

ती ओरडली, "अरे देवा, कोण येते आहे, बघ. ही त्या दवाखान्यातील परिचारिका येते आहे. आता मी मेले."

मी म्हणालो, "लवकर! पळ. पण फार उशीर झाला. तिने यव्होनला ओळखले. ती हसत सरळ आमच्याकडे आली. ती सोनेरी काड्यांचा नाकावर क्लिप असलेला चष्मा घातलेली, मोठी जाड बाई होती. तिचे गाल सफरचंदासारखे लाल होते. आईसारखे झापणारी बाई!

ती दयाळुपणे बोलली, "अग माता सुंदरी, तू ठीक आहेस का? आणि तुझे बाळ, ते पण चांगले आहे? तुला आशा होती त्याप्रमाणे ते मुलगा बाळच आहे का?"

यव्होन नाही म्हणाली व इतकी थरथर कापू लागली की मला तिचा दंड पकडावा लागला. शेवटी ती परिचारिका म्हणाली, "ओहो, मग मला वाटत होते, त्याप्रमाणे ती मुलगी होती का?"

त्यावर मूर्ख यव्होन तिचा शहाणपणा पूर्णपणे गमावून बसली.

ती परत म्हणाली, "नाही."

परिचारिकेला धक्का बसला. मला सांग मुलगा नाही व मुलगीही नाही, असे कसे काय?"

"तूच विचार कर. हे बघ, ते धोकादायक होते." यव्होन बिटसारखी लाल झाली व रडू लागली आणि दुसऱ्या क्षणी तिने बहुधा सर्व काही खरे

सांगितले असते. पण देव जाणे काय झाले! माझ्यासाठी मी माझे डोके वापरून मध्ये पडलो आणि परिस्थिती सांभाळली.

मी शांतपणे म्हणालो, “ते जुळे होते.”

परिचारिका ओरडली, “जुळे?” आणि ती इतकी खुश झाली की तिने यव्होनचे खांदे पकडले आणि तिला सरळ मिठी मारली.

“हो, जुळे --- “

## XIX

एक दिवस जेव्हा आम्ही हॉटेल एक्समध्ये पाच सहा आठवडे होतो, तेव्हा बोरिस न सांगता पसार झाला. संध्याकाळी मी त्याला माझ्यासाठी रु डी रीव्होलीमध्ये थांबलेले पाहिले. त्याने आनंदाने माझ्या खांद्यावर थाप मारली.

“माझ्या मित्रा, मी शेवटी सुटलो. तू सकाळी माझा राजीनामा दे. ऑबर्ग उद्या उघडते आहे.”

“उद्या?”

“मला वाटते आपल्याला सगळे नीट मार्गी लावण्यासाठी एकदोन दिवस लागतील. पण काही झाले तरी, आता हे हॉटेल नाही, हे सरळ आहे. माझ्या मित्रा, अगदी काळया दगडावरची रेघ. माझा कोट आता कर्जातून आधीच सुटला आहे.

तो इतक्या सच्चेपणाने बोलत होता, की काहीतरी गडबड असल्याची माझी खात्री झाली. मला माझे सुरक्षित आणि आरामशीर काम मुळीच सोडायचे नव्हते. पण मी बोरिसला वचन दिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी

सात वाजता, मी ऑबर्ग डे जेहान कोटार्ड मध्ये हजर झालो. ते बंद होते. मी बोरिसला शोधू लागलो. त्याने त्याची पहिली जागा सोडून, रु डे ला ग्रोईक्स निव्हेर्टमध्ये खोली घेतली होती. त्याने आदल्या रात्री पटकावलेल्या मुलीबरोबर तो झोपलेला मला सापडला. ती मुलगी फार भावनाशील स्वभावाची असल्याचे त्याने मला सांगितले होते. हॉटेलबद्दल तो म्हणाला होता, ते सर्व काही ठरवले आहे. ते उघडून, आपण तिथे जायला लागण्यापूर्वी फक्त काही किरकोळ गोष्टी बघायच्या आहेत.

दहा वाजता मी बोरिसला अंथरुणाबाहेर काढण्यात यशस्वी झालो. आम्ही तिथे गेलो, तेव्हाही हॉटेल बंदच होते. ‘काही किरकोळ गोष्टी’ म्हणजे काय ते माझ्या चांगलेच लक्षात आले. ते थोडक्यात असेः आम्ही मागच्या वेळी इथे आलो तेव्हा हॉटेल जसे होते, त्यात काही बदल दिसत नव्हता. स्वयंपाकघरातील स्टोव्ह आले नव्हते. पाणी आणि विजेचा पत्ता नव्हता. सुतारकाम, रंगकाम, पॉलीशचे काम सगळे बाकी होते. दहा दिवसात काही चमत्कार झाला, तरी ते उघडू शकत नव्हते आणि अशीही शक्यता वाटत होती, की ते कधीच उघडणार नाही. जे घडत होते, ते घडणे अपरिहार्य होते. मालकाला पैसे कमी पडत होते. आणि त्याने वरील सर्व कामे करण्यासाठीच बहुधा कामाला माणसे मात्र ठेवली होती. [आम्ही चारजण होतो.] आम्हाला त्यासाठी फुकटात राबवून घ्यायचा त्याचा विचार दिसत होता. कारण वेटरना तर पगार दिला जात नाही. पण त्याने मला पगार दिला तरी हॉटेल सुरु होईपर्यंत, तो मला जेवण देऊ शकत नव्हता. त्यामुळे त्याने आमचे काही शे फ्रँक्स बुडवले होते. आम्ही त्याच्याकरता चांगले काम सोडले होते.

परंतु बोरिसला आशा वाटत होती. त्याच्या डोक्यात एक कल्पना होती. त्याला वाटत होते, की त्याला पुन्हा एकदा वेटर बनून कोट घालायची

संधी मिळणार आहे. त्यासाठी तो दहा दिवस बिनपगारी काम करायला तयार होता. यात कधीच काम न मिळण्याचा धोकाही होता. तो म्हणत राहिला, “सबुरी. ते घडेल. ते सुरु होईपर्यंत धीर धर. आणि मग आपले सर्व काही मार्गी लागेल. माझ्या मित्रा, धीर धर.”

आम्हाला धीर धरण्याची गरज होती, कारण दिवस चालले होते आणि हॉटेल उघडण्याची काही चिन्हे दिसत नव्हती. आम्ही तळघर साफ केले. मांडण्या लावल्या. भिंती रंगवल्या. लाकूडकामाला पॉलिश केले. छताला पांढरा रंग दिला. पण नळजोडणी, वीज व गॅस मिळणे ही तीन मुख्य कामे होत नव्हती. कारण मालक त्यांना पैसे देत नव्हता. त्याच्याकडे पैसेच नव्हते. कारण तो लहानसहान रकमाही भरू शकत नव्हता. कोणी पैसे मागितले, की तो हळूच पळून जात असे. त्याच्या श्रीमंती सवयी आणि अप्रामाणिकपणाची चुणूक यामुळे त्याच्याशी कसे वागावे, तेच समजत नव्हते.

सतत त्याला शोधत येणारे फोन येत. तो उदास होऊन, आम्हाला सांगायला सांगे की तो फॉउंटनब्लूला किंवा सेंट क्लोउडला [फ्रान्समधील गावे] किंवा इतर कुठल्याही सुरक्षित अंतरावरील गावाला गेला आहे असे सांगा. मध्यंतरीच्या काळात मी अधिकाधिक भुकेलेला होत गेलो.

मी माझे आधीचे काम सोडले, तेव्हा माझ्याकडे तीस फ्रँक्स होते. मला ताबडतोब, पूर्वीसारखे कोरड्या पावावर जगणे आवश्यक ठरले होते. मालकाकडून आगाऊ म्हणून साठ फ्रँक्स काढण्यात बोरिस यशस्वी झाला पण त्यातील अर्धे त्याने वेटरचे कपडे दुरुस्त करण्यासाठी आणि अर्धे त्या मुलीवर खर्च केले. दुसऱ्या ज्युल नावाच्या वेटरकडून त्याने तीन फ्रँक्स उसने घेतले आणि ते पाव आणण्यासाठी वापरले. काही दिवस आम्हाला सिगरेटही ओढता आली नाही.

कधीकधी स्वयंपाकीण येऊन किती काम झाले आहे, ते बघून जाई. पण ती जेव्हा स्वयंपाकघरात काहीच भांडी नसल्याचे बघे, तेव्हा तिला दुःख होई. ज्युल नावाचा दुसरा वेटर बिनपगारी काम करायला तयार नसे. तो मग्यार [हंगेरीचा] होता. छोटासा व काळा व बडबड्या होता. नाक डोळे ठळक असून तो चष्मा लावत असे. तो वैद्यकीय विद्यार्थी होता. पण पैशांअभावी त्याने ते शिक्षण अर्धवट सोडले होते. दुसरे लोक काम करतांना त्यांच्याशी बोलायची त्याला सवय होती. तो माझ्याशी त्याच्या काय कल्पना आहेत वगैरे सर्व काही बोलला. असे दिसत होते, की तो कम्युनिस्ट होता आणि त्याच्या वेगवेगळया विचित्र थिअरीज होत्या. [तो आकडेवारीने तुम्हाला हे सिद्ध करून दाखवे, की फुकट राबणे हे चुकीचे होते.] इतर अनेक मग्यार लोकांसारखाच तो स्वतःबद्दल फार अभिमानी होता. अभिमानी व आळशी लोक चांगले वेटर्स बनत नाहीत. ज्युलची आवडती थाप अशी होती, की एकदा जेव्हा हॉटेलमधील गिऱ्हाईकाने त्याचा अपमान केला, तेव्हा त्याने गरम सूपचा बाउल त्याच्या मानेवर ओतला आणि त्याला कामावरून कमी करण्याची वाट न बघता, सरळ बाहेर निघून गेला.

मालक आम्हाला फसवत होता. ते पाहून दिवसेंदिवस ज्युलचा राग वाढू लागला. त्याला थुकायची, चोंदलेल्या नाकातून आवाज काढायची व नाकात बोलायची सवय होती. तो मुठी वळून अंगावर धाऊन येई आणि मला काम करू नको म्हणून सांगे.

“अरे मूर्खा, तो ब्रश खाली ठेव. आपण उच्चकुलीन आहोत. आपण त्या बेकार रशियन कुळांसारखे फुकट काम करत नाही. असे फुकट काम करणे, हा माझा छळ आहे. माझ्या आयुष्यात अशी वेळ आली, की मला कोणी पाच कवड्यांसाठी फसवले. तेव्हा मी ओकलो. हो रागाने ओकलो.

अरे म्हाताऱ्या, शिवाय हे विसरू नकोस की, मी कम्युनिस्ट आहे. मध्यमवर्गीयांना धक्का देणे, अपमान करणे, हे माझे उद्दिष्ट आहे. मी एखादे काम टाळू शकत असतांना करतांना कोणी जिवंत माणसाने पाहिले आहे का? मी स्वतःला अशा कामापासून वेगळे ठेवतो, एवढेच नव्हे, तर तुम्हा इतर मूर्खांसारखे न करता मी माझे स्वातंत्र्य दाखवून देतो. एकदा मी एका हॉटेलात होतो. तिथे मालकाला वाटले, की तो मला कुत्र्यासारखा वागवू शकेल. तर मग सूड म्हणून मी दुधाच्या साठ्यातून दुध चोरण्याची युक्ती शोधून काढली आणि कुणाला न कळता दूध चोरले. मी रात्रंदिवस दूध चोरले. रोज मी चार लिटर दूध पित असे. शिवाय अर्धा लिटर क्रीम खात असे.

दूध जाते तरी कुठे याचा माग काढतांना, मालक थकला. तुला समजले का, की मला दूध प्यायला हवेच होते, असे नाही. पण तत्व म्हणजे तत्व!

तर मग तीन दिवसांनी माझ्या पोटात भयंकर दुखू लागले. मी डॉक्टरकडे गेलो. त्याने विचारले, “तू काय खात होतास?” मी म्हणालो, “मी दिवसाला चार लिटर दूध व अर्धा लीटर क्रीम खात होतो. तो म्हणाला, “बापरे, ताबडतोब ते बंद कर. ते तसेच चालू राहिले, तर एक दिवस तू फुटशील.” मी म्हणालो, “मी का म्हणून काळजी करावी? माझ्यासाठी माझी तत्वे म्हणजे सर्व काही आहे. मी फुटलो, तरी चालेल, पण मी ते करत रहाणार
तत्वे म्हणजे सर्व काही आहे. मी फुटलो, तरी चालेल, पण मी ते करत
रहाणार.”

दुसऱ्या दिवशी मालकाने मला दूध चोरताना पकडले. तो म्हणाला, “आता मी तुला काढून टाकतो आहे. आठवड्याच्या शेवटी तू हे काम सोड.”

मी म्हणालो, “मिस्टर, ऐका. मी आजपासूनच हे काम सोडतो.” तो म्हणाला, “नाही, तसे नको. मी शनिवारपर्यंत तुला इथे ठेवतो.”

“मी विचार केला, “ठीक आहे, मालक. आपण बघू, की कोण आधी दमतो.”

मग मी काचेची भांडी फोडायला सुरवात केली. मी पहिल्या दिवशी नऊ ताटल्या, तर दुसऱ्या दिवशी तेरा ताटल्या फोडल्या. त्यानंतर मालकाने मला लगेच हाकलून दिले.

मी तुमच्यासारखा रशियन शेतकरी नाही.”

दहा दिवस गेले. तो फार वाईट काळ होता. माझ्याकडचे सर्व पैसे संपत आले. मी अनेक महिन्यात माझे भाडे भरले नव्हते. रिकाम्या हॉटेलमध्ये आम्ही सुन्न मनाने पाव खाऊन जगत होतो.

काम करायलाही आमच्या अंगात शक्ती उरली नाही. फक्त बोरिसलाच आशा होती की हॉटेल चालू होईल. त्याने मनाशी ठरवून टाकले होते की तो या हॉटेलचा मुख्य वेटर असणार आहे आणि अशा शोध लावला की आता तो योग्य संधीची वाट बघत थांबलेला आहे. दहाव्या दिवशी माझ्याकडे खायला काहीच नव्हते. मी मालकाला सांगितले की आता त्याने आगाऊ पैसे दिल्याशिवाय मला इथे काम करणे शक्य नाही. मालकाने नेहमीच्या मख्खपणे पैसे द्यायचे कबूल केले. मालकाचे पैसे रोख्यांमध्ये अडकलेले होते आणि योग्य भाव मिळण्याची वाट बघत तो ते विकण्यासाठी थांबला होता व मग नेहमीप्रमाणे अंतर्धान पावला. मी मुकाट्याने घरी आलो. पण मला भाड्यावरून एफ बाईसाहेबांशी वाद घालावासा वाटेना. त्यामुळे मी तेथून बाहेर पडलो व एका रस्त्यावरील बाकावर बसून रात्र काढली. ते फारच गैरसोयीचे होते. त्या बाकाचा हात माझ्या पाठीला टोचत होता --- आणि

माझ्या अपेक्षेपेक्षा फारच गार होते. पहाट व्हायला खूपच वेळ होता. मी किती मूर्ख आहे, या रशियनांच्या हातात पडून, मी कसा फसलो आहे, असे विचार माझ्या डोक्यात येत होते.

मग सकाळी माझे नशीब बदलले. कसाबसा मालक अशा समजुतीवर आला, की त्याच्या येणेकऱ्यांकडून तो खिशात पैसे भरून घेऊन आला. हॉटेलचे काम सुरु झाले. बोरिसने व मी मॅक्रोनी व घोड्याचे यकृत आणले. दहा दिवसातील ते आमचे पहिले गरमागरम जेवण होते.

कामगार आणले गेले. हॉटेलची कामे घाईने व कमी किमतीच्या वस्तू वापरून सुरु झाली. उदाहरणार्थ, टेबले बिलीयर्ड टेबलावर वापरतात तशा हिरव्या रेक्सीनसारख्या दिसणाऱ्या कापडाने झाकायची असे ठरले होते. पण ते फार महाग असल्याचे मालकाला समजले, तेव्हा न बदलता येणाऱ्या गोड वासाचे सैन्यातील न वापरलेले उबदार रग विकत आणले गेले. टेबलक्लॉथ [देशी शोभेचे] टेबलांवर घातले गेले. शेवटच्या दिवशी आम्ही पहाटे दोन वाजेपर्यंत काम करत होतो. संध्याकाळी आठ वाजेपर्यंत काचसामान आले नव्हते आणि नवीन असल्याने, ते सगळे धुऊन घ्यावे लागणार होते. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चाकू, सुऱ्या, चमचे इत्यादी सामान आले नव्हते. टॉवेल्स न आल्याने आम्हाला धुतलेले काचसामान मालकाच्या शर्टाने व हॉटेल अधिकाऱ्याच्या उशीच्या आभ्र्याने पुसावे लागले. बोरिसने व मी सर्व काम केले. ज्युल नुसता बसून होता. मालक व त्याची बायको आळसावल्यासारखे रशियन मित्रांसकट हॉटेल यशस्वीपणे सुरु झाल्याचा आनंदात बारमध्ये बसले होते. स्वयंपाकघरात स्वयंपाकीण टेबलावर डोके ठेऊन रडत बसली होती. कारण तिला पन्नास माणसांचे जेवण तयार करायचे होते आणि दहा माणसांच्या स्वयंपाकाचीही भांडी नव्हती.

मध्यरात्री पैशांची मागणी करणाऱ्या काही लोकांबरोबर भीतीदायक मुलाखत चालू होती. मालकाने आठ दांडा असलेली खोलगट पदार्थ शिजवायची भांडी, ब्रँडीची अर्धी बाटली देऊन, उधार आणली होती.

ज्युल्सची व माझी घरी जाणारी शेवटची गाडी चुकली आणि आम्हाला हॉटेलच्या फरशीवर झोपावे लागले. सकाळी आम्ही पहिली गोष्ट बघितली ती म्हणजे दोन गलेलठ्ठ उंदीर स्वयंपाकघरातील टेबलावर भाजलेले मास खात बसले होते. हा अपशकून वाटत होता आणि माझी खात्री होती, की ऑबर्ग डे जेहान कोटार्ड मार खाणार होते.

## XX

मालकाने मला स्वयंपाकघरातील कामगार म्हणून नेमले. म्हणजे माझे काम भांडी धुणे, साफसफाई करणे, भाज्या निवडणे, चहा कॉफी व सँडविच तयार करणे, साधा स्वयंपाक करणे व बाहेरची काही कामे करणे, अशा स्वरूपाचे होते. अटी नेहमीप्रमाणे अशा होत्याः महिन्याला पाचशे फ्रँक्स पगार व जेवण. मला एकही सुट्टी नव्हती आणि कामाचे तास देखील ठरलेले नव्हते. हॉटेल एक्स मध्ये खूप जास्त पैशात व चांगल्या प्रकारच्या व्यवस्थेत मी उत्तम पदार्थांची सेवा पाहिली होती. आता ऑबर्गमध्ये मला दिसले, की वाईट हॉटेलात पदार्थ कसे बनवले जातात. हे वर्णनीय आहे. कारण पॅरीसमध्ये अशी शेकडो हॉटेले आहेत. आणि त्यामध्ये पाहुणे मंडळी एकदा तरी जातात.

तरीही मी असे सांगेन, की ऑबर्ग हे कामगार आणि विद्यार्थि येणारे, सामान्यपणे स्वस्त खायचे ठिकाण नव्हते. आम्ही पंचवीस फ्रँक्सपेक्षा कमी पैशात पुरेसे जेवण देत नसू. आमचे हॉटेल देखणे आणि कलापूर्ण होते.

त्यामुळे आम्हाला सामाजिक दर्जा होता. तिथे बारमध्ये अश्लील चित्रे, नॉर्मन सजावट आणि भिंतींवर दिखाऊ लाकडी तुळया होत्या. विजेचे दिवे मेणबत्त्यांसारखे केले होते. शेतकऱ्यांची गावठी भांडी होती. दारात बैलगाडी होती --- मालक आणि मुख्य वेटर रशियन ऑफिसर्स होते आणि बरेचसे ग्राहक रशियन निर्वासित होते. थोडक्यात आम्ही अगदी ठरवून नीटनेटके होतो.

पण स्वयंपाकघरातील दारामागे मात्र डुकरांचे खुराडे होते. कारण आमची सेवा व व्यवस्था तशीच होती. स्वयंपाकघर पंधरा फूट लांब व आठ फूट रुंद होते. याची अर्धी जागा स्टोव्ह आणि टेबलांनी व्यापली होती. सर्व भांडी सहज काढता येणार नाहीत, अशी उंच मांडणीत ठेवली जात. खाली जमिनीवर फक्त एक कचरा बादली ठेवायला जागा उरे. दुपारपर्यंत ती भरून जाई आणि जमीन साधारणपणे इंचभर खोल होती आणि ती खत करण्यायोग्य खरकट्याने भरून जाई. शिजवण्यासाठी आमच्याकडे फक्त तीन गॅस स्टोव्ह होते. ओव्हन नव्हते. आणि सर्व पाईप बेकरीला जोडलेले होते, कारण बेकरीतही भट्टी लागे. अन्न साठवण्यासाठी एखादी खोली किंवा मोठे कपाट नव्हते. आमच्याकडे त्याऐवजी अंगणात अर्धवट छत असलेली एक जागा होती. त्यात मध्यभागी एक झाड होते. तिथे जमिनीवर मास व भाज्या पडलेल्या असत. त्यावर उंदीर व मांजरे नाचत असत. पाईपमधून गरम पाणी येण्याची सोय नव्हती. नव्हते. भांडी धुण्यासाठी पाणी पातेल्यात तापवावे लागे. जेवण तयार होत असतांना स्टोव्ह रिकामे नसत. त्यामुळे बहुतेक वेळा ताटल्या गार पाण्यानेच धुवाव्या लागत. मऊ साबण आणि पॅरीसचे कठीण पाणी यामुळे भांड्यांचा तेलकटपणा जाण्यासाठी ती वर्तमानपत्रांच्या तुकड्यांने चोळावी लागत. आमच्याकडे धातूची खोलगट भांडी इतकी कमी

होती, की एखाद्या भांड्याचे काम झाले, की ते संध्याकाळपर्यंत न ठेवता, मला लगेच घासावे लागे. यामुळे दिवसातील एक तास फुकट जाई.

विजेचे बिल कमी यावे म्हणून, संध्याकाळी आठनंतर दिवे बंद केले जात. स्वयंपाकघरात मालक आम्हाला फक्त तीन मेणबत्त्या लावायला परवानगी देई. स्वयंपाकीण म्हणे की तीन हा आकडा अशुभ आहे. त्यामुळे आम्ही दोनच मेणबत्त्या लावत असू.

एका जवळच्या बिस्ट्रो मधून आमचे कॉफी दळायचे मशीन आणले होते. आणि केराची बादली आणि झाडू जवळील दुकानातून आणले जात. एक आठवड्यानंतर धुलाई केंद्राचे बिल न भरल्याने टॉवेल्स आणि नॅपकीन्स आलेच नाहीत. हॉटेलच्या कामगारवर्गात कुणीच फ्रेंच नसल्याने, आम्हाला लेबर इन्स्पेक्टरकडून त्रास होत होता. त्याने मालकाच्या अनेक खासगी मुलाखती घेतल्या. आमचा मालक त्याला फसवण्यात यशस्वी झाला.

वीजकंपनी आम्हाला अजून त्रास देत होती. आणि जेव्हा त्यांना समजले की आम्ही भूक वाढवणारे दारूसारखे पेय त्यांना देऊन विकत घ्यायला बघतो आहोत, तेव्हा ते रोज सकाळी येऊ लागले. वाणसामानाचे आमच्यावर कर्ज होते. जर वाण्याची बायको [मोठ्या मिशा असलेली साठीची बाई] ज्युल्सने केलेल्या तिच्या जादा स्तुतीला भुलली नसती, तर उधारी बंद झाली असती. जो प्रत्येक सकाळी तिच्याकडे जाऊन, गोड बोलून तिचे मन वळवे. त्याचप्रमाणे मला रु डू कॉमर्समध्ये भाज्यांच्या भावात हुज्जत घालून, काही सेंटीम्स वाचवण्यासाठी, रोज एक तास फुकट घालवावा लागे.

अपुऱ्या भांडवलावर हॉटेल सुरु करण्याचा परिणाम म्हणून, हे सर्व भोग भोगायला लागत आणि अशा परिस्थितीत मला आणि स्वयंपाकीणीला दररोज तीस ते चाळीस माणसांचे जेवण बनवावे लागे. नंतर हा आकडा वाढून

शंभर झाला. पहिल्या दिवसापासून आम्हाला हे अती काम होते. स्वयंपाकीणीचे काम सकाळी आठला सुरु होई. ते मध्यरात्रीपर्यंत चाले. माझे काम सकाळी सात ते दुसऱ्या दिवशी सकाळी साडेबारापर्यंत साडेसतरा तास चाले. मध्ये सुट्टी जवळजवळ नसेच. संध्याकाळी पाचपर्यंत आम्हाला पाच मिनिटेदेखील बसायला फुरसत नसे. नंतर देखील केराच्या टोपलीवर सोडून बसायला कुठेही जागा नसे. जवळ रहाणाऱ्या बोरिसला काही शेवटची मेट्रो गाठायची नसे. तो सकाळी आठपासून ते दुसऱ्या दिवशी दुपारी दोनपर्यंत, म्हणजे अठरा तास काम करे. असे आठवड्यातील सातही दिवस. असे एवढे तास काम करणे जरी नेहमीचे नसले, तरी पॅरीसमध्ये काही असामान्य गोष्ट नव्हती.

अशा आयुष्याची आम्हाला सवय झाली. त्यामुळे आधीचे हॉटेल एक्स आम्हाला सुट्टीसारखे वाटू लागले. रोज सकाळी सहा वाजता मी अंथरूण सोडत असे. दाढी न करता, कधीकधी अंघोळ करून घाईघाईने,

इटालीच्या दिशेने जाणाऱ्या मेट्रोत जागा मिळण्यासाठी धडपडत असे. सातपर्यंत, मी गार, घाणेरड्या, बटाट्याची साले, हाडे, माशांच्या शेपट्या आणि रात्रीपासूनच्या ढीगभर खरकट्या, ओशट ताटल्या पडलेल्या स्वयंपाकघरात दमून भागून, हजर होत असे. अजून पाणी फार गार असल्याने मी ताटल्या धुवायला सुरवात करू शकत नसे. मला दूध आणून कॉफी करायची असे. कारण इतर सर्वजण आठला येत आणि त्यांना कॉफी तयार लागे.

शिवाय तिथे तांब्याची पातेलीही घासायला पडलेली असत. ती घासणे म्हणजे माझ्या आयुष्यातील एक दिव्य असे. ती वाळूने व साखळीच्या तुकड्याने घासावी लागत. तसले एक पातेले घासायला दहा मिनिटे लागत.

मग बाहेरून ती ब्रासोने घासायला लागत. आता नशीबाने ती भांडी बनवायची कला फ्रेंच स्वयंपाकघरातून, लुप्त झाली आहे. तरीही अजून ती वापरली व विकली जातात.

जेव्हा मी भांडी घासायला सुरवात करे, तेव्हा मला स्वयंपाकीण कांद्यांची साले काढायला लावे. जेव्हा मी ते काम करू लागे, तेव्हा मालक येऊन, मला कोबी आणायला पाठवे. जेव्हा मी कोबी घेऊन परते, तेव्हा मालकाची बायको मला अर्धा मैल दूर असलेल्या दुकानात पाठवून, लाली व लिपस्टिक आणायला लाऊ शके. ते घेऊन परतल्यावर, अजून भाज्या माझी वाट बघत असत. आणि खरकट्या ताटल्या तर तशाच पडलेल्या असत. अशा तऱ्हेने आमचा चेंगटपणा एकावर एक काम वाढवत जाई. सर्व कामे कधीच पूर्ण होत नसत.

दहापर्यंत सर्व कामे निदान तशी सोपी असत. न चिडता आम्ही भरभर कामे उरकली, तरी स्वयंपाकीणीला तिच्या कलात्मक स्वभावाबद्दल बोलायला वेळ मिळे. ती गाईचे मास कापता कापता म्हणे, टॉलस्टॉय असामान्य असला तरी धक्कादायक नव्हता आणि छान वरच्या पट्टीत गाऊ लागे. पण दहा वाजले, की जेवणासाठी वेटर्स लोकांचा गोंधळ सुरु होई. अकरा वाजता पहिले गिऱ्हाईक येई.

अचानक सर्व काही घाईघाईचे आणि वाईट वातावरणाचे बनत जाई.

अशी घाई गडबड हॉटेल एक्स मध्ये नसे. पण वातावरण गोंधळाचे व दुसऱ्या बद्दलच्या असूयेचे व रागाचे असे. त्याच्या तळाशी त्रास असे. स्वयंपाकघरात, ते असह्य असे. ताटल्या फरशीवर ठेवाव्या लागत. आणि त्यावर पाय पडू नये म्हणून प्रत्येकाला काळजी घ्यावी लागे. स्वयंपाकीण मागेपुढे जाताना तिचा मोठा पार्श्वभाग हलून मला धक्का बसे. तिच्याकडून न संपणाऱ्या, सांगता

येणार नाही इतक्या त्रासदायक आज्ञा सुटत. “मूर्ख! तुला किती वेळा सांगितले की बीटमधून रक्त गळू देऊ नकोस. पटपट, मला सिंककडे जाऊ दे. त्या सुऱ्या बाजूला ठेव. बटाट्यांकडे बघ. तू माझ्या चाळणीचे काय केलेस? ओहो, ते बटाटे राहू देत. मी तुला सूपचे द्रावण तयार करायला सांगितले नाही का? ते पाण्याचे पातेले स्टोव्ह वरून उतरव. भांडी धुवायची राहू देत. ही सेलरी मला चिरून दे. नाही अशी नाही. बावळटा, अशी. तिथे! ते वाटाणे उकडले गेले का बघ. आता कामाला लाग. या हेरिंग माशाचे काप काढ. हे बघ. या ताटलीला तू स्वच्छ म्हणतोस? तुझ्या अॅप्रनला ती पूस. ते सॅलड जमिनीवर ठेव. ते नीट कालव. हं अस्स! माझा पाय त्यात पडणार नाही, असे ठेव. मला ते खोलगट भांडे दे. नाही, ते नाही दुसरे. हे ग्रिलवर ठेऊन भाज. टाकून दे. वेळ घालवू नकोस. हे बटाटे ते जमिनीवर टाक आणि सोल. इथे इतके घसरडे झाले आहे त्यावर थोडा लाकडाचा भुस्सा टाक. इकडे बघ, मूर्खा, ते गाईचे मास जळते आहे. अरे देवा, त्यांनी माझ्या मदतीला असा माणूस का दिला आहे? तू कुणाशी बोलतो आहेस? तुला माहिती आहे का, की माझी आत्या रशियन उमरावाची बायको होती?” इत्यादी इत्यादी इत्यादी.

यात काही बदल न होता असेच तीन वाजेपर्यंत चालू राहत असे. तीन ते पाच ही वेटर्ससाठी थोडी कमी गर्दीची वेळ होती. पण स्वयंपाकीण कामात मग्न होती. मी पण वेगाने काम करत होतो. कारण खरकट्या भांड्यांचा ढीग पडला होता आणि जेवण सुरु होण्यापूर्वी, ती घासायची, निदात त्यातील काही, घासायची घाई होती. सोयीस्कर अटींमुळे ते काम दुप्पट झाले होते --- भांडी वाळत घालायची तुटकी फळी, कोमट पाणी, ओली फडकी आणि दर तासाला तुंबणारे सिंक! पाच वाजेपर्यंत मी आणि स्वयंपाकीण सतत उभेच्या उभे होतो. सात वाजल्यापासून आम्ही काही खाल्ले नव्हते व बसलो नव्हतो. ती कचऱ्याच्या बादलीवर आणि मी फरशीवर कोलमडून पडणारच होतो, पण

आम्ही एक बिअरची बाटली प्यायली आणि सकाळी आम्ही बोललेल्या काही गोष्टींसाठी माफी मागितली. चहामुळे आमचे काम चालू राहिले. चहाचे भांडे मंद आचेवर उकळत राहिले. दिवसभर आम्ही अर्धा अर्धा कप चहा पित राहिलो.

साडेपाचला घाई आणि भांडणे सुरु झाली. आता पूर्वीपेक्षा वाईट स्थिती होती कारण सर्वजण दमलेले होते. स्वयंपाकीणीला ती अनाकर्षक व सामाजिक दृष्ट्या बुजरी असल्याने सहा वाजता एकदा आणि नऊ वाजता दुसऱ्यांदा उदासीनतेचा धक्का बसायचा. तो इतका वक्तशीर होता, की त्यावरून घड्याळ लाऊन घ्यावे. ती कचराबादलीवर पडायची व जोरजोराने शोक करायला लागायची, की मी कधीच असले आयुष्य स्वीकारणार नाही. तिच्या नसांना ते झेपायचे नाही. ती व्हिएन्नाला संगीत शिकली होती. तिला आधार द्यायला अंथरुणाला खिळलेला नवरा होता इत्यादी. इतर वेळी कुणालाही तिची कणव आली असती. पण आम्ही सगळेच दमलेले असल्याने, तिचा भीती व दुःख दर्शवणारा आवाज आम्हाला फक्त अधीर बनवून राग आणत असे. ज्युल्स दारात उभा राहून तिच्या शोक करण्याची नक्कल करत असे. मालकाची बायको दिवसभर काही नको ते करण्यावरून, त्रास देई. बोरिस आणि ज्युल्स दिवसभर भांडत असत. कारण ज्युल्स कामचोरपणा करत असे आणि बोरिस मुख्य वेटर असल्याने त्याला टीपचा जास्त वाटा मिळायला हवा, असे तो म्हणे.

हॉटेल उघडल्यावर दुसऱ्या दिवशीच त्यांची दोन फ्रँक्सच्या टीपवरून स्वयंपाकघरात गुद्दागुद्दी झाली. स्वयंपाकीणीला व मला त्यांना बाजूला करावे लागले. अमेरिकन रीतीरिवाज न विसरलेला एकच माणूस होता, तो म्हणजे आमचा मालक. त्याने त्याच्या बायकोला व्यवस्था बघण्यासाठी ठेवले होते.

ती ते काम चांगले करे. संपलेल्या वस्तूंची मागणी नोंदवण्या व्यतिरिक्त, बारमध्ये सिगरेटी ओढत उभे राहून, सभ्य माणसासारखे बघत रहाणे, हे मालकाचे काम होते आणि तो ते चांगले करे.

मला आणि स्वयंपाकीणीला दहा ते अकरा यादरम्यान जेवायला वेळ मिळे. मध्यरात्री स्वयंपाकीण तिच्या नवऱ्यासाठी अन्नाची पाकिटे चोरत असे. ती तिच्या कपड्यांखाली लपवत असे आणि निघून जात असे. तिला भीती वाटे, की ती पकडली जाईल आणि मग दुसऱ्या दिवशी तिला काढून टाकले जाईल. ज्युल्सपण सहसा बोरिसबरोबरील भांडणानंतर मध्यरात्री निघे. बोरिसला रात्री दोनपर्यंत बार बघायचे काम असे. बारा ते दीडच्या मध्ये, मी मला करायचे ताटल्या धुवायचे काम संपवे. काम योग्य रीतीने करायला वेळ नसे. मी नॅपकिनने पुसून, ताटल्यांचा तेलकटपणा काढत असे. फरशीवरील धूळ मी तशीच ठेवत असे. किंवा स्टोव्हखाली ती लोटून नजरेआड करत असे.

साडेबाराला मी माझा कोट घाले आणि घाईने बाहेर पडे. मालक नेहमीच्या थंडपणे मला थांबवे. “मिस्टर, तुम्ही किती दमलेले दिसता. कृपया माझी विनंती मान्य करून ही पेलाभर ब्रँडी घ्या.”

जणू काही मी एक खालच्या वर्गातील कामगार नसून, रशियन उमराव असल्यासारखा तो मला ब्रँडीचा पेला देई. तो आम्हा सगळ्यांना असे वागवतो, हे आमच्या दिवसाला सतरा तास काम करण्याचे चीज केल्यासारखे होते.

कायदा असल्यासारखी शेवटची मेट्रो रिकामी होती --- खूप फायदा, कारण एखादा बसून पाऊण तास झोपू शकतो. सहसा मी दीडला अंथरुणात असतो. कधी माझी मेट्रो चुकते आणि मग मला हॉटेलच्या फरशीवर झोपावे

लागते. पण त्याचे एवढे काही कारण नाही, नाहीतर मी त्यावेळेस फूटपाथवर झोपू शकलो असतो.

## XXI

असे आयुष्य अजून पंधरा दिवस गेले. जास्त गिऱ्हाईके येऊ लागल्यावर, काम थोडे वाढले. मला हॉटेलजवळ खोली घेऊन, एक तास वाचवता आला असता पण असे करायला वेळच मिळत नव्हता --- किंवा त्यासाठी माझे केस कापता कापता वर्तमानपत्र बघणे किंवा पूर्णपणे नग्न होणे, मी करू शकत नव्हतो. दहा दिवसांनी मला पाऊण तास रिकामा मिळाला. मी माझा लंडनमधील मित्र ब याला लिहिले, की मला निदान पाच तासांपेक्षा जास्त झोप मिळू शकेल असे एखादे काम तू माझ्यासाठी शोधू शकशील का. जरी खूपजणांना त्याचे काही वाटत नसले, तरी मी आता जास्त काळ दिवसाला सतरा तास काम करू शकेन, असे मला वाटत नव्हते. जेव्हा एखाद्याला अती काम पडते, म्हणून स्वतःची दया येऊ लागली, तर --- पॅरीसमधील हॉटेलात इतके तास काम करणाऱ्या हजारो कामगारांकडे --- जे फक्त काही आठवड्यांसाठी नव्हे तर वर्षानुवर्षे असे काम करतात, त्यांच्याकडे बघणे हा चांगला उपाय ठरतो. माझ्या हॉटेलजवळील बिस्ट्रोमध्ये एक मुलगी होती. ती सकाळी सातपासून मध्यरात्रीपर्यंत काम करायची. फक्त जेवणापुरती बसायची. मला आठवते, मी तिला एकदा नाच करायला येण्याबद्दल विचारले, तेव्हा ती हसली आणि म्हणाली, की ती अनेक महिने खोलीतून फक्त रस्त्यापर्यंतच आली आहे. शेवटी ती फुफ्फुसांच्या क्षयरोगाने आजारी पडली व मी पॅरीस सोडल्यावर वारली.

त्यानंतर फक्त आठवड्याने, घाबरत उद्देशाने कामापासून पळ काढणारा ज्युल्स सोडून, आम्ही सगळे डोकेदुखी व चिडचिड याने दमून त्रस्त झालो. पहिल्यांदा भांडणे कधीकधी व्हायची. पण आता ती सतत होऊ लागली. तासनतास एखादा निरुपयोगी कुरकुर करू लागला. दर काही मिनिटांनी शिव्यांची वादळे उठू लागली. “मूर्खा, मला ते खोलगट भांडे खाली काढून दे.” स्वयंपाकीण ओरडे. [ती बुटकी असल्याने तिचा हात वर ठेवलेल्या भांड्यांपर्यंत पोचत नसे.] मी उत्तरे, “अग बाजारबसवे, तूच काढून घे.” असली शेरेबाजी स्वयंपाकघरात रात्रंदिवस चाले. अशा अकल्पनीय क्षुल्लक कारणांवरून वादावादी चाले. उदाहरणार्थ कचरा बादली, हे सतत चालणाऱ्या भांडणांचे कारण होते --- मला हवा तिथे किंवा स्वयंपाकीणला हवा तिथे कचरा टाकला जातो, की नाही, हा वादाचा मुद्दा होता. एकदा तिने इतका इतका त्रास दिला, की शेवटी मी रागाने कचरा बादली उचलली व मोठ्या रागाने फरशीवर मध्यभागी जिथे ती नक्कीच पडली असती, अशा ठिकाणी ओतली.

मी ओरडलो, “अग म्हशे, आता तूच तो उचल.

बिचारी ती म्हातारी! तिला उचलायला ते फारच जड होते. ती बसली व तिचे डोके टेबलावर ठेऊन जोरात रडू लागली.

मी उद्धटपणे तिला चिडवत राहिलो. दमल्यामुळे माझ्या वागण्यावरही काही परिणाम झाला होता.

काही दिवसांनी स्वयंपाकीण टॉलस्टॉयबद्दल व तिच्या कलासक्त स्वभावाबद्दल बोलायची बंद झाली. ती आणि मी कामाचे सोडून काही बोलत नव्हतो. बोरिस व ज्युल्सदेखील एकमेकांशी बोलत नव्हते आणि त्यांच्यापैकी कोणी स्वयंपाकीणीशीही बोलत नव्हते. बोरिस आणि मी सुद्धा

अगदी क्वचितच बोलत असू. त्यात जेवायची सुट्टी येत असल्यामुळे बहुधा वेळावरून कामाचे तास मोजले जात नाहीत, याबद्दल आम्ही मागेच समझोता केला होता. पण तरीही आम्ही एकमेकांना विसरून जावे असे फार वाईटसाईट बोललो. मधली सुट्टीच नव्हती. शिवाय ज्युल्स अधिकाधिक आळशी होत चालला होता. तो कर्तव्यभावनेने सतत अन्न चोरत होता. आम्ही तसे करत नसल्याने, तो आम्हाला त्याला साथ न देणारे ब्लॅकलेग म्हणाला. त्याचा उत्साह चौकस पण पापी होता. त्याने मोठ्या अभिमानाने मला सांगितले, की तुमच्यासारख्या मध्यम वर्गीयांवर सूड म्हणून त्याने कधीतरी एका गिऱ्हाईकाच्या सूपमध्ये खराब ताटल्या पुसलेले फडके पिळले होते.

स्वयंपाकघर फार घाणेरडे होत चालले होते व जरी आम्ही पिंजरे लाऊन काही उंदीर पकडले, तरी ते जास्त धीट होत चालले होते. जिकडे तिकडे जमिनीवर पडलेली घाण, त्यात पडलेले कच्चे मास, इतस्तः पसरलेल्या खरकट्या ताटल्या, तुंबलेले व तेलकट थर चढलेले सिंक हे दृष्य बघवत नव्हते. मला आश्चर्य वाटे, की जगात आमच्याएवढे घाणेरडे हॉटेल कुठेतरी असेल का. पण इतर तिघेजण म्हणत, की त्यांनी याहून घाणेरड्या ठिकाणी काम केले आहे. ज्युल्सला खूप कचरा पडलेला पाहून आसुरी आनंद होई. दुपारी जेव्हा त्याला मोकळा वेळ असे, तेव्हा तो स्वयंपाकघराच्या दारात

उभा राहून, आम्हाला आम्ही जास्त काम करत असल्याबद्दल जोरजोरात चिडवत असे.

“मूर्खा, तू त्या ताटल्या का धुतोस? त्यापेक्षा त्या तुझ्या पँटला पूस. गिऱ्हाईकांची काळजी कोण करते? त्याना काय चालले आहे, ते काहीच माहिती नाही. हॉटेलातील काम असे असते काय? तुम्ही चिकन वाढत

आहात. तुमच्या हातून ते जमिनीवर पडते. तुम्ही बाहेर जाता आणि दुसऱ्या दाराने तेच चिकन घेऊन परत येता. हॉटेलातील काम असे असते. आणि सांगायला विचित्र म्हणजे, या सगळ्या घाणीसकट व कामांमधील त्रुटींसह ऑबर्ग डे जेहान कोटार्ड यशस्वीपणे चालले होते.

पहिले काही दिवस आमची सगळी गिऱ्हाईके मालकाचे मित्र असलेले रशियन्स होते. नंतर हळूहळू अमेरिकन्स व इतर परदेशी लोक येऊ लागले. पण फ्रेंच लोक नाही. मग एका रात्री ज्याची आम्हाला खूप उत्सुकता होती ते आमचे पहिले फ्रेंच गिऱ्हाईक आले. क्षणभर आम्ही आमची भांडणे विसरून गेलो आणि त्याला चांगले जेवण देण्याचा प्रयत्न करू लागलो. बोरिस पाय न वाजवता, हळूच स्वयंपाकघरात आला. त्याचा अंगठा खांद्यावर दाखवत, शांतपणे चालत आला व गुपित असल्यासारखे कुजबुजला, "शू! लक्ष द्या. एक फ्रेंच माणूस!"

क्षणभराने मालकाची बायको येऊन कुजबुजली, "लक्ष द्या. एक फ्रेंच माणूस! असे बघा, की त्याला प्रत्येक भाजी दुप्पट मिळेल."

तो माणूस खाईपर्यंत, मालकाची बायको स्वयंपाकघराच्या ग्रीलमागे उभी राहून त्याच्या तोंडावरील भाव बघत होती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तो त्याच्याबरोबर अजून दोन फ्रेंच माणसांना घेऊन आला. याचा अर्थ आमचे चांगले नाव होत होते. हॉटेल वाईट असल्याचे खात्रीचे निदर्शक म्हणजे, तिथे फक्त परदेशी लोक येणे. बहुधा आमच्या यशाचे कारण काही प्रमाणात असे असावे, की मालकाने हॉटेल सजवण्यात घेतलेला रस. अर्थात टेबलावरील धारदार सुऱ्या हे यशस्वी हॉटेलचे गुप्त गमक आहे. हे झाले, म्हणून मला आनंद झाला. त्यामुळे माझा एक भ्रम दूर झाला, की फ्रेंच माणसे चांगले अन्न

बघून ठरवतात. किंवा कदाचित आमचे हॉटेल पॅरीसच्या दर्जाचे असावे. त्यामुळे वाईट हॉटेले कल्पनातीत वाईट असावी.

मी बी ला लिहिल्यापासून काही दिवसात, उत्तर देतांना त्याने असे म्हटले, की तिथे तो मला काम मिळवून देऊ शकेल. जन्मतः व्यंग असलेल्या, मूर्ख लोकांकडे बघायचे ते काम होते. ऑबर्ग डे जेहान कोटार्डमधील धबडग्याच्या अतिशय वेळखाऊ कामापेक्षा मला हे फारच आरामाचे काम वाटले. मी काठीने मोठ्या फुलांना टोला लगावत, तेथील गल्ल्यांमध्ये फिरत असेन. पावाच्या चुऱ्यापासून व सोनेरी सिरपपासून बनवलेला केक आणि बकरीचे भाजलेले मास खात असेन. रात्री दहा तास लव्हेंडरचा छान वास येणाऱ्या गादीवर झोपत असेन. बी ने मला वरखर्चासाठी व गहाण पडलेले कपडे सोडवण्यासाठी, पाच पौंडाची नोट पाठवली. ते पैसे आल्याबरोबर मी एक दिवस आधी हॉटेलात ते काम सोडत असल्याचे सांगून, ते सोडले. माझ्या अशा अचानक हॉटेल सोडण्याने मालकाला लाज वाटली. पण नेहमीप्रमाणे तो पैसे बाळगून नसल्याने, त्यांने मला माझा पगार तीस फ्रँक्स कमी दिला. पण त्याने मला चांगल्यापैकी ब्रँडीचा पेला दिला आणि त्याला बहुधा असे वाटले असावे, की त्यामुळे पगाराची कमी रक्कम भरून निघाली असावी. त्यांनी माझ्या जागी एका सक्षम झेक कामगाराला कामावर ठेवले आणि गरीब बिचाऱ्या म्हाताऱ्या स्वयंपाकीणीला काही आठवड्यांनंतर

काढून टाकले. मग मी असे ऐकले, की स्वयंपाकघरातील दोन चांगल्या दर्जाच्या कामगारांच्या नेमणूकीनंतर कामगारांचे काम दिवसाला पंधरा तास करण्यात आले. त्याखाली नाही. मात्र स्वयंपाकघर आधुनिक केले गेले नाही.

## XXII

त्याची काय किंमत असेल, ते मला माहिती नाही. पण मी पॅरीसमधील हॉटेल कामगारांच्या आयुष्याबद्दल माझे मत सांगू इच्छितो. जेव्हा एखादा त्यासंबंधी विचार करायला लागतो, तेव्हा लक्षात येते की की या आधुनिक मोठ्या शहरातील हजारो लोकांनी त्यांचे झोपेतून उठल्यानंतरचे अनेक तास जमिनीखालील गरम गुहेत ताटल्या धुण्यात घालवावेत, हे विचित्र आहे. माझा प्रश्न असा आहे, की हे का चालू रहाते --- यामुळे काय साध्य होते? आणि कोणाला हे चालू ठेवायचे आहे? मी याविरुद्ध क्रांतिकारक, परिणामकारक दृष्टीकोन का घेत नाही? मी हॉटेल कामगारांच्या आयुष्याबद्दलची सामाजिक बाजू मांडायचा प्रयत्न करतो आहे.

मला वाटते एखादा अशी सुरवात करेल, की हॉटेल कामगार हा आधुनिक जगातील गुलाम आहे. त्याच्याविरुद्ध काही आवाज उठवण्याची गरज नाही. कारण इतर सटर फटर कामे करणाऱ्यांपेक्षा, तो बरा आहे. पण तरीही त्याला आणून विकले गेले असते, तर तो जास्त मोकळा नसता. त्याचे काम काही कसब न दाखवता, दुसऱ्यांना खूश करण्याचे आहे. तो जिवंत राहू शकेल, एवढाच पगार त्याला देण्यात येतो. त्याची सुट्टी म्हणजे हकालपट्टी. त्याला लग्न करायला परवानगी नाही आणि त्याने ते केलेच, तर त्याच्या बायकोनेही काम केले पाहिजे. फक्त तो नशीबवान असेल, तर त्याला या आयुष्यापासून, तुरुंगवासाशिवाय सुटका नाही. या घडीला विद्यापीठाची पदवी घेतलेली माणसे, पॅरीसमधील हॉटेलात दिवसातील दहा ते पंधरा तास ताटल्या धूत आहेत. ही त्यांच्या बाजूने आळशीपणाची गोष्ट आहे, असे कुणी म्हणू शकणार नाही. कारण आळशी मनुष्य हॉटेल कामगार होऊच शकणार

नाही. ते कामगार विचारप्रक्रिया बंद करणाऱ्या एका दुष्ट चक्रात अडकले आहेत. जर ते विचार करू लागले, तर त्यांनी फार पूर्वीच त्यांचा गट स्थापन केला असता व त्याना चांगली वागणूक मिळावी, म्हणून संपावर गेले असते. पण ते विचार करू शकत नाहीत, कारण त्यांना तेवढी फुरसतच नसते. त्यांच्या आयुष्याने त्यांना गुलाम बनवले आहे.

प्रश्न असा आहे, की ही गुलामगिरी का चालू रहावी? लोक हे गृहीत धरतात, की सर्व काम हे चांगल्या उद्देशानेच केले जाते. ते इतर कोणाला मान्य न होण्यासारखे काम करतांना बघतात आणि ते काम करणे गरजेचे आहे असे म्हणत, ते तो प्रश्न निकालात काढतात. उदाहरणार्थ, कोळशाच्या खाणीतील कामगार, हे खूप कष्टाचे काम आहे. आपल्याला त्यांनी ते करायची गरज असते, कारण आपल्याला कोळसा हवा असतो. गटारात काम करणेदेखील त्रासदायक असते. पण कुणीतरी ते काम करायलाच हवे. त्यासाठी कामगार हवेतच. काही लोक हॉटेलमध्ये खाणारच. मग त्यांच्या उष्ट्या ताटल्या साफ करायला आठवड्याला ऐंशी तास काम करणारे कामगार लागणारच. हे संस्कृतीरक्षक असे काम आहे.

म्हणून त्याबद्दल प्रश्न करणे अप्रस्तुत आहे. हा मुद्दा विचारात घेण्या सारखा आहे. खरेच अशा कामगारांची पिळवणूक करणारे काम संस्कृती जोपासण्यासाठी आवश्यक आहे का? आपल्याला असे वाटते की, हे काम

प्रामाणिक असले पाहिजे. कारण हे कठीण आणि दुमत असणारे आहे, की आम्ही या श्रमाच्या कामाचे नको इतके स्तोम माजवले आहे. आपण एक माणूस झाड तोडतांना बघतो आणि आपण म्हणतो की हे समाजासाठी आवश्यक असेल. कारण तो जोर लावून काम करत असतो. पण आपल्याला

हे कळत नाही, की तो सुंदर झाड तोडून, कुरूप पुतळ्यासाठी जागा करत असतो. मला वाटते हॉटेल कामगारांचेही असेच आहे. तो घाम गाळून त्याचे पोट भरतो. पण असे समजणे गरजेचे नाही, की तो काही उपयुक्त करत आहे. तो फक्त लोकांना ऐषोआराम मिळवून देत असेल, जो खरे तर ऐषोआराम नाहीच आहे.

म्हणजे मला असे म्हणायचे आहेः युरोपमध्ये सहसा न दिसणारे, एक टोकाचे उदाहरण घेऊ. भारतीय सायकल रिक्षावाल्याचे किंवा टांग्याचे तट्टू घ्या. शेकडो काळे, किरकोळ वजनाचे गरीब रिक्षावाले, त्यातील काही आजारी, काही वयस्क, रिक्षावाले, पावसात, उन्हात मान खाली घालून आरामात बसलेल्या गिऱ्हाईकाला ओढून नेत असतात. त्याच्या करड्या मिशांमधून घाम गळत असतो. जर ते फार हळू गेले तर त्याना शिव्या बसतात. त्याना महिन्याला तीस ते चाळीस रुपये मिळतात. काही वर्षांनी त्यांची फुप्फुसे निकामी होऊ लागतात.

टांग्याचे तट्टू वयामुळे व भुकेमुळे, दमलेले व आजारी दिसू लागतात. त्यांचे मालक चाबूक जणू अन्नाला पर्याय म्हणून वापरतात. जणू ते असे समीकरण दाखवून देतात, की चाबूक अधिक अन्न म्हणजे जोर. सहसा साठ टक्के चाबूक आणि चाळीस टक्के अन्न. कधीकधी त्यांच्या मानेवर, मोठी सूज आलेला गोल चट्टा दिसतो. कारण दिवसभर ते त्या जागेवर दाब देऊन काम करत असतात. काही वर्षांनी चाबूकही काम करेनासा होतो. तेव्हा ते तट्टू कसायाच्या हवाली केले जातात. ही गरज नसलेल्या कामांची उदाहरणे आहेत. कारण टांग्याची आणि सायकल रिक्षाची खरे तर गरजच नाही. ते अजून टिकून आहेत कारण काहीजणांना चालायला आवडत नाही. ती चैन आहे. त्यात बसणाऱ्यांना माहिती आहे, की त्यात बसून फारशी चैन

झाल्यासारखे वाटत नाही. थोडीफार सोय होते. पण त्याने माणसाची व पशूची झालेली हानी भरून येत नाही.

तसेच कामगारांचे आहे. वरील दोन उदाहरणांपेक्षा त्याची स्थिती राजासारखी म्हणावी लागेल. पण तो हॉटेलचा गुलामच आहे. आणि त्याची गुलामगिरी ही थोडीफार निरुपयोगी आहे. कारण शेवटी मोठ्या हॉटेलांची गरज काय आहे? ते लोकांना चैन करायला देतात. पण खरे तर ते स्वस्त आणि वाईट रीत्या चालवलेले असते. चैनीचा केवळ आभास देते. सगळेजण खरे तर हॉटेलचा दुस्वास करतात. काही हॉटेले इतरांपेक्षा बरी असतात. पण घरामध्ये त्या खर्चात जे जेवण मिळते, त्यापेक्षा चांगले जेवण कुठल्याही हॉटेलात मिळणे शक्य नाही. हॉटेले हवीत, हे ठीक आहे. पण त्यांनी हजारो कामगारांना गुलामासारखे राबवावे, हे गरजेचे नाही. त्यातील काम हे महत्वाचे नाही, तर त्यातील खरी नसणारी चैन ही जास्त महत्वाची आहे. चलाखपणा असेही त्याला म्हणता येईल. म्हणजे कामगारांना जास्त काम, गिऱ्हाईकाकडून जास्त पैसे आणि मालक सोडून कुणाचाच फायदा नाही. मालक छानछोकीचे घर घेऊ शकेल. चलाख हॉटेले ती, ज्यात त्यातील शेकडो कामगार राब राब राबतात, दोनशे गिऱ्हाईके परवडत नसतांना नको त्या पदार्थांसाठी जास्त पैसे देतात. जर हा प्रकार थांबला, साध्या रीतीने कारभार केला गेला, कामगारांना दिवसाला पंधराऐवजी फक्त सहा ते आठ तासच काम दिले, तर किती चांगले ठरेल!

जर असे मानले की कामगाराचे काम हे थोडेफार जरूर नसलेले आहे, तर मग प्रश्न येतो, की तो का राबत असतो? मी लगेच मिळणाऱ्या आर्थिक कारणांकडे जात नाही. आयुष्यभर ताटल्या धुणाऱ्या लोकांचा कुणी आनंदाने विचार करू शकेल का? कारण यात काही संशय नाही की पैसे बाळगणाऱ्या

लोकांना या विचारातून आनंद मिळतो.

मार्क्स म्हणतो, जेव्हा तो झोपलेला नसेल, तेव्हा गुलामाने काम करावे. ते काम गरजेचे आहे की नाही हा प्रश्न नाही आहे. त्याने काम करावे कारण काम करणे चांगले आहे --- निदान गुलामांसाठी. हा असा विचार अजून केला जातो. त्यामुळे राबवणूकीचे डोंगर उभे रहातात.

मला वाटते, हे निरुपयोगी काम चालू ठेवणे हे तळाशी आहे. साधी गर्दीची भीती आहे. गर्दी [ विचार सुरु रहातो. ] ही इतक्या खालच्या थरातील लोकांची आहे की त्याना रिकामा वेळ मिळाला तर ते धोकादायक ठरेल. त्याना विचार करायला सवड न देणे, हे सुरक्षित राहील.

बुद्धीने प्रामाणिक असणाऱ्या श्रीमंत मनुष्याला जर ही स्थिती सुधारायला सांगितले, तर तो असे म्हणेलः आम्हाला माहिती आहे की गरिबी दुःखदायक आहे, त्यामुळे आम्ही तिच्यापासून दूर राहून, तिचा विचारच करत नाही. आम्हाला त्यासाठी काही करायला सांगू नका. जसे त्वचारोग झालेले मांजर दयनीय आहे, तसेच हे खालच्या थरातले लोक आहेत. पण ते सुरक्षित आहेत. ही व्यवस्था आम्हाला ठीक वाटते. आम्ही तुम्हाला मोकळे सोडायचा धोका घेऊ शकत नाही. एखादा कामाचा तास वाढवला, तरी चालेल. तर मग माझ्या प्रिय भावांनो, तुम्ही आमच्या इटालीच्या ट्रीपसाठी घाम गाळला पाहिजे आणि तुम्ही तसेच करत रहा.”

हा विशेष करून बुद्धिवादी सुशिक्षित लोकांचा दृष्टीकोन आहे. शेकडो निबंधांमधून हा विचार तुम्ही वाचला असेल. अगदी कमी सुशिक्षित लोकांना वर्षाला चारशे पौंडांपेक्षा कमी पगार मिळतो आणि साहजिकच ते श्रीमंतांच्या बाजूला जातात. कारण ते कल्पना करतात, की गरीबांना कुठलीही मोकळीक दिली, की त्यांचे स्वतःचे स्वातंत्र्य जाते. याला पर्याय म्हणून मार्क्सच्या दृष्टीने

पुढे येणाऱ्या काहीशा उदास पण सर्व दृष्टीने एकदम योग्य स्थितीचा अंदाज घेऊन सुशिक्षित माणूस गोष्टी जशा आहेत, तशाच ठेवणे पसंत करतो. सहसा त्याला त्याच्याबरोबरचे श्रीमंत लोक आवडत नाहीत. पण त्यातील सर्वात हीन अभिरुचीचे लोकही त्याचा आनंद नष्ट करणारे नसतात. गरीबांपेक्षा बरेचसे त्याच्यासारखे असतात. त्यामुळे तो श्रीमंतांच्या बाजूने उभा रहातो.

ही बहुधा धोकादायक गर्दीची भीती असावी. ती जवळजवळ सर्व बुद्धिमान लोकांना पारंपारिक मूल्यांपासून ढळू देत नाही.

गर्दीची भीती ही अनाठायी आहे. ती या कल्पनेवर अवलंबून आहे, की जसे काही गरीब आणि श्रीमंत या दोन वेगळ्या जाती आहेत व त्यांच्यात गोरे लोक व निग्रो यांच्यासारखा काही गूढ, पायाभूत फरक आहे. पण खरे तर असा काही फरक नाही. फक्त त्यांच्याकडे असलेल्या पैशांवरून त्यांच्यात फरक केला जातो. सर्वसाधारण लखपती हा सर्वसाधारण ताटल्या धुणारा कामगार असतो. फक्त त्याने नवीन सूट घातलेला असतो. जागा बदला आणि मग सोयीस्कर व उपयुक्त दृष्टीने कोण न्यायी आहे आणि कोण चोर आहे, हे ठरवा. गरिबांशी मिळून मिसळून वागणाऱ्याला हे माहिती आहे. पण त्रास असा आहे की बुद्धिमान, सुशिक्षित लोक, जे उदारमतवादी असू शकतात, ते कधीच गरीबांशी मिळून मिसळून वागत नाहीत. कारण सुशिक्षित लोकांना गरीबीबद्दल काय माहिती असते? खालील ओळीचे स्पष्टीकरण द्यावे, असे व्हीलॉनच्या कविता छापणाऱ्या संपादकाला खरेच वाटलेः ‘दुकानांच्या शोकेसमध्ये ठेवलेला पाव फक्त बघणारे’ अशी तळटीप त्याने दिली. म्हणजे सुशिक्षित माणसांच्या अनुभवापासून भूकही फार लांब आहे. या दुर्लक्ष करण्यातून गर्दीची अविश्वासार्ह भीती सहजपणे येणारी आहे. सुशिक्षित माणूस मूर्ख माणसांच्या मोठ्या गटाचे चित्र फक्त एक दिवस त्याचे घर हिसकावून

घेण्याच्या, त्याची पुस्तके जाळण्याच्या आणि त्याला मशीनसारखे काम करायला लावण्यासाठी व शौचालये स्वच्छ करायला लावण्याच्या स्वातंत्र्यासाठीच काढतो. तो विचार करतो, काहीही बरे. गर्दीने काही गमावण्यापेक्षा, कुठल्याही प्रकारचा अन्याय बरा, असे त्याला वाटते. त्याला हे जाणवत नाही, की श्रीमंत व गरीब यांच्या मासात काही फरक नाही, मग गर्दीला मोकळे सोडायचा प्रश्नच कुठे येतो? खरे तर गर्दी मोकळीच असते. आणि श्रीमंत मनुष्याने त्याच्या ताकदीचा उपयोग करून, कंटाळ्याची मोठी चक्रे फिरत ठेवली आहेत. जसे की चटपटीत हॉटेले.

थोडक्यात, हॉटेल कामगार हा गुलाम आहे, मूर्खासारखे व गरज नसलेले काम करणारा, फुकट गेलेला कामगार आहे. त्याला रिकामा वेळ मिळून दिला तर तो धोकादायक होईल, हे फुकटचे वाटणे आहे. सुशिक्षित लोक खरे तर त्याच्या बाजूने असायला हवेत पण ते नाईलाजाने असे कबूल करतात. कारण त्यांना त्याच्याबद्दल काहीही माहिती नाही. आणि ते त्याला घाबरून असतात. मी हे हॉटेल कामगारांबद्दल म्हणतो आहे, पण हे इतर अगणित कामगारांना लागू पडेल. या फक्त कामगाराच्या आयुष्यातील पायाभूत गोष्टी आहेत. नजीकच्या काळातील आर्थिक समस्यांचा विचार न करता, नैतिक अधिष्ठान असलेल्या माझ्या स्वतःच्या कल्पनाआहेत. हॉटेलात काम करून एखाद्याच्या डोक्यात आलेले विचार मी एक नमुना म्हणून मांडले आहेत.

## XXIII

ऑबर्ग डे जेहान कोटार्ड सोडल्याबरोबर मी झोपलो आणि तेवीस

तास झोपलो. मग पंधरा दिवसात पहील्यांदा मी दात घासले. अंघोळ केली आणि केस कापले. माझे गहाण ठेवलेले कपडे सोडवून आणले. आळशीपणाने मला दोन तेजस्वी दिवस घालवता आले. मी माझा सर्वात चांगला सूट घालून ऑबर्गमध्ये गेलो व बारमध्ये जाऊन, पाच फ्रँक्सची इंग्लिश बिअरची बाटली घेतली. जिथे तुम्ही गुलामांचे गुलाम होतात, तिथे गिऱ्हाईक बनून जाणे ही मोठी विशेष गोष्ट होती. कामावर असतांना व पैसे मिळवण्याची संधी असतांना, मी ते काम सोडले, म्हणून बोरीसला वाईट वाटले. मी त्याच्याबद्दल ऐकले व त्यानेही सांगितले, की तो दिवसाला शंभर फ्रँक्स मिळवतो व त्याने एक खूप प्रामाणिक व लसणीचा वास न येणारी मुलगी ठेवली आहे. मी आमच्या परिसरात फिरण्यात एक दिवस घालवला. प्रत्येकाचा निरोप घेतला.

या आजच्या दिवशी चार्लीने मला एके काळी इथे रहाणाऱ्या चिक्कू, म्हाताऱ्या रुकोलचा मृत्यू झाल्याचे सांगितले. नेहमीप्रमाणे चार्ली थाप मारत असणार असे मी समजलो. पण ती चांगली गोष्ट होती. त्यावेळी रुकोलचे वय चौऱ्याहत्तर होते. एक दोन वर्षांपूर्वी मी पॅरीसला गेलो होतो. पण मी तिथे असतांना देखील लोक त्याच्याबद्दल बोलत असत. तो नर्तक डॅनिएल किंवा तत्सम कुणासारखा नव्हता. पण तो रुचीपूर्ण वल्ली होता. तो रोज सकाळी खराब भाज्या गोळा करण्यासाठी, लेस हॉलेसला जायचा. मांजराचे मास खायचा आणि आतल्या कपड्यांऐवजी वर्तमानपत्र वापरायचा. तो त्याच्या खोलीच्या भिंतीची खालील लाकडे शेकोटीसाठी वापरायचा. त्याने बॅगेच्या पुठ्ठ्याची पँट स्वतःसाठी शिवली होती --- या सर्वासाठी त्याने अर्धा लाख फ्रँक्स खर्च केले होते. मला त्याची ओळख करून घ्यायला फार आवडले असते. इतर अनेक चिक्कू माणसांप्रमाणे त्याने त्याचे पैसे हडप करणाऱ्या अनैतिक योजनेत गुंतवले होते. एक तरुण, व्यावसायिक दिसणारा ज्यू

इंग्लंडमध्ये कोकेन चोरून विकायची पहिल्या दर्जाची योजना घेऊन आला होता. पॅरीसमध्ये कोकेन विकत घेणे सोपे होते. आणि चोरटा व्यापारही फारसा कठीण नव्हता. फक्त हा बेत कस्टम्सला किंवा पोलिसांना सांगणारा कुणी हेर नेहमीच असतो. असे म्हटले जाते, की हे कोकेन विकणाऱ्यांकडूनच सांगितले जाते, कारण चोरटा माल विकणाऱ्या मोठ्या टोळया असतात व त्यांची आपापसात स्पर्धा असून, ते एकमेकांचा काटा काढायला टपलेले असतात. तो ज्यू मात्र शपथेवर असे सांगत होता, की यात काही धोका नव्हता. त्याला व्हिएन्नाहून परस्पर [नेहमीच्या मार्गाने नव्हे] कोकेन आणायचे रस्ते माहिती होते. त्यात पैशांसाठी ब्लॅकमेल केले जात नसे. जर रुकोलने सहा हजार फ्रँक्स घातले, तर सॉर्बोनचा एक तरुण विद्यार्थि चार हजार घालायला तयार होता. त्यातून ते दहा पौंड कोकेन विकत घेऊ शकले असते. ते इंग्लंडमध्ये विकून त्यांचे नशीब फळफळले असते. तो तरुण आणि ज्यू यांना रुकोलकडून पैसे काढायला, प्रचंड झगडा करावा लागला. सहा हजार फ्रँक्स म्हणजे काही फार नव्हते --- त्यापेक्षा जास्त पैसे रुकोलच्या खोलीतील गालीच्यात गुंडाळून त्याने ठेवलेले होते --- पण त्यातील एक पैदेखील खर्च करणे म्हणजे त्याच्यासाठी मोठे दुःख होते. शनिवार रविवार तो तरुण व ज्यू त्याच्याकडे गेले व त्याच्याबरोबर वाद घालून, त्याला स्पष्ट करून, त्याच्यासमोर शरणागती पत्करून, त्याचा छळ करून त्याने पैसे द्यावे, म्हणून फारच मागे लागले. तो म्हातारा बिचारा भीती आणि लोभाने अर्धमेला झाला. कदाचित पन्नास हजार फ्रँक्सचा फायदा होण्याच्या शक्यतेने त्याला फारच लालसा सुटली. तरीही तो धोका घ्यायला तयार नव्हता. तो हातात डोके खुपसून, कोपऱ्यात, घशातून आवाज काढत, बसून राही. डोके टेकवून, [ तो धर्मभीरु असल्याने ] शक्ती मिळण्यासाठी प्रार्थना करत राही. पण तरी त्याने त्या योजनेत पैसे घातले नाहीत. पण शेवटी कुठल्याही इतर कारणापेक्षा दमून,

अचानक त्याने गालिचा उघडला व सहा हजार फ्रँक्स त्या ज्यू ला दिले.

त्याच दिवशी ज्यू ने म्हाताऱ्याला कोकेन दिले आणि झटपट नाहीसा झाला. त्यानंतर रुकोलने जे काही पाऊल उचलले, त्याबद्दल त्या भागात सर्वत्र चर्चा सुरु झाली. दुसऱ्याच दिवशी पोलिसांची धाड पडली व शोधाशोध सुरु झाली. रुकोल व तो तरुण चिंतेत पडले. पोलीस प्रत्येक खोलीचा शोध घेत पोलीस खालील मजल्यावर पोचले आणि कोकेनचे पाकीट लपवायला जागा नसल्याने व आता जिना उतरणेही शक्य नसल्याने, ते टेबलावरच पडले होते. तो तरुण ते खिडकीतून बाहेर फेकायच्या बेतात होता, परंतु म्हातारा त्यासाठी तयार नव्हता. चार्लीने मला सांगितले होते, की या दृष्याच्या वेळी तो हजर होता. चार्ली मला म्हणाला, की जेव्हा त्यांनी रुकोलकडून ते पाकीट घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा त्याने ते छातीशी कवटाळून धरले आणि जरी तो चौऱ्याहत्तर वर्षांचा असला, तरी त्याने एखाद्या वेड्यासारखा प्रतिकार केला. तो घाबरून रानटीपणा करत होता. त्याचे पैसे सोडण्यापेक्षा, तो तुरुंगात गेला असता.

शेवटी पोलीस जेव्हा खालील मजल्यावर पोचले, तेव्हा कुणाला तरी एक युक्ती सुचली. रुकोलच्या मजल्यावरील एक मनुष्याजवळ तोंडाला लावायच्या पावडरचे डझनभर टीनचे डबे होते, जे तो कमिशन घेऊन विकत होता. त्या डब्यांमध्ये कोकेन भरून पावडरऐवजी पाठवले जावे, असे सुचवण्यात आले. घाईघाईने पावडर खिडकीबाहेर फेकण्यात आली आणि त्यात कोकेन भरून, ते डबे रुकोलच्या टेबलावर ठेवण्यात आले, जसे काही त्यात लपवण्यासारखे काही नव्हतेच. काही मिनिटांनी पोलीस रुकोलच्या खोलीची तपासणी करण्यास आले. त्यांनी भिंती ठोकून पाहिल्या. धुराड्यात पाहिले. खण बघितले. जमिनीवरील तक्तपोशी बघितली. आणि ते आता

काही न सापडल्याने, त्यांचे प्रयत्न सोडून देणार तोच इन्स्पेक्टरची नजर टेबलावरील डब्यांकडे गेली. तो ओरडला, “पकडा, ते डबे बघा. ते आधी लक्षात आले नाहीत. त्यात काय आहे?”

तो तरुण शांतपणे म्हणाला, “तोंडाला लावायची पावडर.”

पण त्याच वेळी रुकोलने घशातून मोठा आवाज काढला. ताबडतोब पोलिसांना सावध होऊन, संशय आला. त्यांनी एक डबा उघडला आणि आत काय आहे, हे वास घेऊन बघितले. त्यानंतर इन्स्पेक्टर म्हणाला की, त्याला ते कोकेन वाटते आहे. रुकोल आणि तो तरुण शपथेवर सांगू लागले, की ती तोंडाला लावायची पावडरच आहे. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. दोघांना पकडून पोलीस स्टेशनला नेण्यात आले. त्यांच्या मागोमाग लोकांचा घोळका आला.

पोलीस स्टेशनमध्ये रुकोल आणि तो तरुण यांना कमिशनरने प्रश्न विचारले. एक डबा त्यातील मालासकट तपासणीसाठी पाठवण्यात आला. चार्ली म्हणाला, रुकोलने तिकडे वर्णन करता येणार नाही, एवढा तमाशा केला.

तो रडला, भेकला, प्रार्थना केली. त्याने विरोधभासात्मक विधाने केली. खूप लांबवर ऐकू जातील, अशा आवाजात त्या तरुणावर बरेच आरोप केले. पोलीस त्याला हसू लागले.

एका तासाने एक पोलीस कोकेनच्या डब्यासकट आला आणि तपासणीच्या अहवालाची चिठ्ठी घेऊन आला.

तो म्हणाला, “मिस्टर, हे कोकेन नाही.”

कमिशनर म्हणाला, “काय, कोकेन नाही? एवढेच? मग ते काय आहे?”

“ती तोंडाला लावायची पावडर आहे.”

रुकोलला व त्या तरुणाला लगेच काहीही आरोप न करता, रागारागाने सोडून देण्यात आले. ज्यूने त्यांना फसवले होते. कोकेनऐवजी तोंडाला लावायची पावडर दिली होती.

नंतर जेव्हा प्रकरण शांत झाले, तेव्हा असे समजले, की त्या ज्यूने तिथे रहाणाऱ्या अजून दोघांवरदेखील असा प्रयोग केला.

जरी त्याचे चार हजार फ्रँक्स तो घालवून बसला, तरी तो सुटला म्हणून तरुणाला आनंद झाला. पण बिचारा म्हातारा रुकोल पार मोडून पडला. त्याने लगेच अंथरूण धरले आणि दिवसरात्र तो काठी बडवत राहिला. गोंधळलेल्या अवस्थेत शिव्याशाप देत राहिला. उच्च रवात ओरडत राहिला. “सहा हजार फ्रँक्स!”

चार्ली म्हणाला, तीन दिवसांनी त्याला कसला तरी धक्का बसला

आणि पंधरा दिवसांनी तो हृदयाच्या धक्क्याने वारला. येशू ख्रिस्ता रे! सहा हजार फ्रँक्स!

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५

# वृषाली जोशी यांची एक्केचाळीस पुस्तके

ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)













ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha*
*Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov




कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
Lamb to the Slaughter
रोआल्ड डाल
वृषाली जोशी
"Personally, I think it's...right under our noses."


वृषाली जोशी
मार्क ट्वेन







वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक


वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-२

वृषाली जोशी
विश्वकथा-३


वृषाली जोशी
विश्वकथा-४

वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा

वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE

वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद

वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे बेचाळीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही

अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३४), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल

जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (६), अरविंद बुधकर (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।